Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख २ माहे जुलै सन १९१७ ई० [अंक २६

## नोटीस

नोटीस बेशमी तुकाराम नागोजी तेली बोरगांवकर रा० आकोला

यांसः—

मी खालीं सही करणार नोटीस देतो कीं माझ्या अज्ञानपणी ह्मणजे सुमारे मी ६ महिन्याचा असतांना माझा बाप नामें गणू शंकर तेली हा मरण पावला. त्यानंतर माझी आई पाट करून गेली. मागें माझ्या बापाच्या मालकीचें घर नबाबपुरा शहर आकोला येथील ज्यांत हल्लीं गंगाराम शिंपी मुंडगांवकर राहतो ते तुमचे सासरे नामें "आनंदा" जानबा सोनटके यांचे कडे मुलगा ( मी ) सज्ञान झाल्यावर मला मिळावे या इरायानें भरंवशावर तिनें ठेवलें. मी अज्ञान होतो ह्मणून इतके दिवस मी त्याची विचारपूस केली नाहीं. पुढें वरील गृहस्थ ह्मणजे आनंदा जानबा हे वारले व त्यांचे इस्टेटीचे मुखत्यार ह्मणून ते माझे वडिलोपार्जित घर तुमचे ताब्यांत आहे. आतां मला त्याची जरूर असल्यानें तुह्माला नोटीस देतो कीं माझे वय सध्या २२ वर्षाचें आहे. आतां मला माझ्या इस्टेटीची व्यवस्था पाहिली पाहिजे करितां ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत वरील शिंपी यांस काढून माझें घर माझें ताब्यांत द्यावें. या प्रमाणें न केल्यास सरकार मार्फत योग्य तजवीज केली जाईल व मग त्यास लागणारा खर्च तुह्मास द्यावा लागेल क. ता. २६-६-१७ इ.

सही

भगवान वा जानू तेली द० खु०

नो. नं. २७७

## जाहीर नोटीस

चि. १ रामचंद वा मारोती खोंड
" २ यशवंता वा मारोती खोंड
" ३ दवलत वा मारोती खोंड

रा. मौजे कोद्री तालुका मळगांव जि. बुलडाना पोष्ट पातुरडा यांस व इतर साहुसावकार वगैरे

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मास लबाड लोकांनीं कांहीं थापा देऊन जिनगीसंबंधानें तुमच्यांत व मझ्यांत लढा उत्पन्न केला आहे. आपण सर्व एकत्र असून मी तुमचे सर्वांचें पालण पोषण उत्तम प्रकारें करतो असें असून तुह्मी मजला माझे माझे मालकीची शेती व जीनगी घरें वगैरे स्वसंपादीत व वडिलोपार्जित आहे ती वाटून मागतां. या साठीं तुह्मास कळवितो की तुह्मी सर्व मी जिवंत आहे तो पावेतों एकत्र राहून उपभोग घ्यावा व त्या जमीनीवर सावकाराचे कर्ज आहे ते फेडा. मी जीवंत आहे तोंपावेतो तुह्मास कांहीं देत नाहीं जर यदाकदाचित तुह्मी माझी शेतीची विल्हेवाट दुसऱ्यास गहाण खरेदी वगैरे देऊन तीजवर कर्ज वगैरे काढाल तर त्या कर्जाचा बोजा माझे मालकीचे जमीनीवर लादला जाणार नाहीं ते कर्ज बेकायदेशीर आहे व त्या संबंधी सर्व दस्तऐवजी लेख रद्द आहेत ही नोटीस दिली सही आकोला ता. २७-६-१७ इ.

सही

मारोती वल्दद संभाजी खोंड द. खु.

नो. नं. २७८

## नोटीस

रा. रा. गोविंदा वा बळीराम भट कृष्णपक्षी राहणार मौजे आगर तालुका आकोला जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझी बायको जनी मर्द नामदेव पांडे हिचे सख्ये भाऊ असून ता. १७-६-१७ रोजीं सायंकाळी येऊन रात्रभर मुक्काम करून ता० १८-६-१७ रोजी पहाटेस सरासरी सात वाजण्याचे सुमारास मी घरी नसून माझे पश्चांत माझी बायको जनी हिजला फुसलावून माझे संमती शिवाय घेऊन गेले. त्यावेळीं तिचे अंगावर खालीं लिहिले प्रमाणें दागीने होते तेः—

| | कि. रु. |
|---|---|
| गुंडवाळ्याचा जोड एक चांदीचा अजमास तोळे ४० | ४० |
| कोपरवाळ्या जोड एक चांदीचा अजमास तोळे २६ | २६ |
| सोन्याच्या कानांतील बाळ्या तीन अजमास तोळा १ | २५ |
| सोन्याच्या पुतळ्या तीन अजमास तोळा १ | २५ |
| चांदीचा गळ्यांतील गोफ एक अजमास तोळे ७ | ७ |
| चांदीचे पोल्हे दोन हातातील अजमास तोळे ३ | ३ |
| चांदीचे हातातील कडे दोन अजमास तोळे ८ | ८ |
| | १३४ |

येणें प्रमाणें दागीने आंगावर असून शिवाय घरांत तपास करितां घरातील रोख नगदी रुपये आठ असे घेऊन माझे पश्चात माझी बायको जनी हिजला फितूर देऊन घेऊन गेले तरी ही नोटीस पावले तारखे पासून आठ दिवसाचे आंत वरील दागीने आण रुपये या समेत जनी हीजला माझे घरीं आणून घालावे. जर तिजला न आणल्यास ती जितके दिवस राहील तितके दिवसांचा तिचा खावटीचा खर्च आमचे कडून न मिळतां कायद्या प्रमाणें योग्य तजवीज केली जाईल व त्याजबद्दल जो खर्च येईल तो आणि या नोटीशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावे ता० २२।६।१७ इ.

सही

नामदेव वा टिकाराम पांडे रा. चिंचोली कारफर्मा ता० खामगांव पो. शेगांव द० खु०

नो. नं. २७९

## जाहिर नोटीस

रा. रा. झ्यांगो वा टिकाराम पाटील रा० तांदळीबु॥ ता० बाळापूर

यांसः—

मी खालीं सही करणार नोटीस देते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्नास अंदाज १९ वर्षें झालीं. लग्न झाल्यापासून मी तुमचे येथें सुखानें संसार केला. परंतु अलीकडे सुमारें ४ वर्षांपासून तुह्मी स्वैर वर्तनी बनलां. मला मारहाण करतां, जिवापाड दुःख देता इतकेच नव्हे तर तुह्मी पलागढीवरून लोटून दिलीत. त्यानें मला फार इजा झाली. मला तुह्मी घेऊन जातां व अशा रितीनें इजा करून वारंवार माझ्या आईकडे पोचवितां. अशा रितीनें मला माझ्या जीविताची चिंता वाटते व तुह्मी काय कराल याचा भरंवसा नाहीं. ही गोष्ट गांवचे पंचांनाही माहीत आहे. तरी तुह्मास या नोटिशीनें कळविते कीं तुह्मी मला नोटीस पावतांच १५ दिवसांत फारकती द्यावी. नाहींपेक्षां मुदतींत तुह्मी असें न केल्यास मी जातगंगेच्या सल्ल्यानें वाटेल तो योग्य मार्ग पत्करीन. मग तुमचा मजवर नवरेपणाचा कोणताच हक्क राहणार नाहीं कळावें ता. २९।६।१७

सही

सरू मर्द झांगो पाटील रा. हल्लीं आईचे घरीं मु. सुकळी पो० पातूर हिचे करितां यादो तुकाराम पाटील द० खुद

नो० नं० २८०

## नोटीस.

अलीबक्स जमादार रा० मिड इंडिया मिल आकोला.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आकोला येथें रजपूत पुऱ्यांतील माझे मालकीचे घर दरमहा १॥ रुपयाप्रमाणें भाड्यानें राहण्यास घेतले आहे. त्या गोष्टीस सरासरी अजमास ८-९ वर्षे झालीं आहेत. व आतां तुह्मी अजमासे २१३ महिने झाले घरास तुमचे कुलूप लावून जवी मिल ( मिड इंडिया ) मिलमध्यें राहत आहां. व माझे घरांत राहण्यास ही बेत नाहीं. घराचे भाडे अजमासे १॥ वर्षांचे तुमचे कडेस येणें निघत आहे तें भाडे ही देत नाहीं व घर खालीं करून मागितले असतां तुह्मी साफ इनकार करितां यावरून आह्मास असें वाटतें कीं तुह्मास कोणीतरी लबाड लोकांनीं सल्ला दिली आहे व त्याप्रमाणें तुह्मी आह्मास थापा देत आहां. परंतु आतां ही नोटीस पावल्या पासून ३ दिवसाचे आंत आमचे मालकीचे घरास तुह्मी लावलेले कुलूप उघडून देऊन घर खालीं करुन द्यावे. व तुमचे कडसे आमचे अजमास १॥ वर्षाचे घरभाडे दरमहा १॥ रुपयाप्रमाणें एकंदर रुपये २७ घेणें आहेत. त्यापैकीं तुह्मी मला सदरहु रकमेंत रुपये आठ वसूल दिले आहे ते वजा जातां बाकी रुपये १९ आह्मास आणून द्यावे. व घर खाली करून द्यावे. असें न केल्यास आह्मी आमचे मोहल्ल्यांतील पंचासमक्ष सदरहु घरास तुमचे लावलेले कुलुप तोडून आह्मी आमचे घर खालीं करुन घेऊं. या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. भाड्याचे रकमेबद्दल रितीप्रमाणें दिवाणी कोर्टात दावा करुन रुपये वसूल केले जातील. कळावें तारीख २७।६।१९१७ इसवी

सही

लछमन वा बालैया धोबी रा० रजपुतपुरा अकोला वऱ्हाड

नो० नं० २८१

## नोटीस.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं भिरुबाई जवजे रामचंद्र पाटील भालेराव रा० बुटी प्रो० चांदुर ता० मलकापूर ही माझा सखा भाऊ रामचंद्र याची बायको आहे तो हल्लीं मरण पावला आहे. त्याला जवळचा वारस माझे शिवाय दुसरा कोणी नाहीं. त्याजवळ असलेली जिंदगी वडिलोपार्जित आहे. हल्लीं तिचा विचार जिंदगीची अफरातफर करण्याचा दिसतो. तरी सदरहु जिंदगी कोणी तिच्यापासून गाहाण, खरिदी, बक्षीस, अगर १ वर्षपेशां ज्यास्त दिवस पट्यानीं घेऊं नये. घेतल्यास त्या पैशाची जबाबदार मैताची जिंदगी होणार नाहीं कळावें ता. २९।६।१९१७ इसवी

दस्तुर त्रिंबक बळवंत.

सही

सुकदेव जानजी पाटील भालेराव रा. बुटी ता० मलकापूर

नो. नं. २८२

# काश्मीरी केशर.

पवित्र आणि असल १८८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १= कागजी बादाम ८९ पौंड, सेबाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५**

नो० नं० ९



अगोदर हे वाचा नंतर निराश व्हा.

## नशिबाची— परक्षा.

सवलत— पुढील पांच कामें एकावेळीं मागविणारास २॥. रुपयांत पाठवूं, किरकोळ एकेका कामास पुढील प्रमाणें फी पडेल )१) इच्छेप्रमाणें वाटेल त्या पांच प्रश्नांचे उत्तरास १।. रु. (२) एक वर्षाचे वर्ष फलास १॥ रु. (३) छापील फार्मावर सर्व माहिती सह पत्रिकेस १। (४) जन्म कुंडलीवरुन सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असेपर्यंतची फुलें लिहून पाठविण्यास १॥. रु. (५) इच्छित कार्यांत यश येऊन अनिष्ट ग्रहांची पीडा नि:सन व्हावी त्या करितां एका महान सिद्ध पुरुषाचा प्रासादिक ताविताস ३।. सूचना— ग्राहकानीं वरील कामा करितां साग्रजन्मकाल व प्रश्नवेळ व वय लिहून कळवावे. विशेष खुलासा पत्रद्वारें उत्तरास ८— आण्याच तिकिट पाठवावे.

ज्यो. डि. टि. मायधनी
म्या. ज्योतिषकार्यालय. चांदडकर पेठ— नाशिक

नो० नं० ७३


## नोटीस

मिरुबाई मर्द रामचंद्र जात कुणबी भालेराव रा. बुटी प्रो चांदूर ता॥ मलकापूर

इजला—


खालीं सही करणार सुकदेव वा॥ जानजी पाटील भालेराव याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझे सख्खांत भाऊ रामचंद्र याची बायको आहे- तो हल्लीं वारला आहे. त्यास संतान मुळींच नाहीं त्याजवळ जी इस्टेट आहे ती वडिलोपार्जीत आहे. तुझा हक्क निवळ खाण्याचा आहे, मालाचा अफरातफर करण्याचा नाही व शिवाय तुझे आंगावर अंदाज ५०० रुपये किंमतीचे डागिने आहे. असें असून तुझा विचार सदरहु मालाची अफरातफर करण्याचा दिसतो. तरी तूं आमचे घरांत कायम आहेस तोपर्यंत तूं जिंदगीचा उपभोग घ्यावा. त्याजला कर्ज आहे ते फेडावे व जमीनं कोणास गाहाण, खरिदी, बक्षीस एक वर्षावर कोणासें पट्यानीं वहितीस मजला विचारल्या शिवाय देऊ नये. याप्रमाणें तुला कबूल नसल्यास सर्व जिंदगी माझे ताब्यांत द्यावी व तूं खाण्याकारितां मजजवळून रुपये ६० साठ सालीना घेत जावे. याप्रमाणें न केल्यास तूं केलेले कर्जाबद्दल माझे भावाची जिंदगी जबाबदार होणार नाहीं. कळावें ता. २५-६-१७ इ.

सही

सुकदेव वा॥ जानजी पाटील रा० बुटी प्र. चांदूर नि. खुद

नो. नं. २८३


## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितिंतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिंहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात.

त्याचे दर–हात पेटी सिंगल रीड २० ते २५
" डबल रीड ३०-३५-४०-५०
तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५
पाय पेटी सप्तक ३। ६० ते ८० रु.
" " " ३॥ ८५ ते ९५ रु.
" " " ३॥। १०४-११५ रु.
" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु.

**पत्ता—रामचंद्र वीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० ( बुलडाणा )**

ना. नं. २८४


## नोटीस.

रा. रा. किसन वा॥ जानजी धोबी रा. बाळापूर ता. बाळापूर येथें पेठेंतें सयदपुऱ्यांत

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी बायको नामे बनी ही तुमची साक्षांत मुलगी असून ती सरासरी चार पांच महिन्यापासून तुमचे येथें लग्नाकरितां घेऊन गेले तेव्हांपासून तुह्मी अद्याप पाठवितो आणून घातली नाहीं आणि मी स्वतः दोन तीन वेळ नेण्याकरितां आलो असतां तुह्मी मजबरोबर पाठविली नाहीं. हल्लीं तिचे आंगावर असलेले डागिने खालीं लिहिलेप्रमाणें.

| | अ. व. तोळे | किंमत |
|---|---|---|
| गुंडवाळ्याचा जोड चांदीचा एक | ,, ,, ५० | ५० |
| दंडवाळ्या जोड चां. एक | ,, ,, २५ | २५ |
| गळ्यांतील चां. संरी एक | ,, ,, १५ | १५ |
| चांदीचे हातांतील कडे २ | ,, ,, १२ | १२ |
| सोन्याच्या बाळ्या चार | ,, ,, १ | २५ |
| मुरक्या चार सोन्याच्या | ,, ,, १ | २५ |
| सोन्याचें पदक १ जाळीचा मणी १ व डोरले एक | ,, ,, १ | २५ |
| | ७ | १७७ |

येणेंप्रमाणें दागिने तिचे आंगावर आहेत तरी ही नोटीस पावलेपासून आठ दिवसाचे आंत डागिन्यासुद्धां माझी बायको बनी हिजला घेउन यावे. न आणिल्यास ती जितके दिवस तुमचे येथें राहील तितके दिवसा बद्दलचा खावटीचा खर्च दिला जाणार नाहीं आणि तिजबद्दल योग्य तजवीज केली जाईल. त्याजबद्दल व या नोटीसीबद्दल जो खर्च येईल तो तुह्मास द्यावा लागेल कळावें ता. २६।६।१७ इसवी

सही

दुकडाजी वा॥ दगडू धोबी राहणार चिंचोलीकारफर्मा ता. खामगांव पोष्ट शेगांव दस्तुर खुद

नो. नं. २८५

## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

किर. दिवाणी मुकद्दमा नंबर ५३ सन १९१७ इ.

विद्यमान डिस्ट्रीक्ट जज साहेब यांचें कोर्ट

मुक्काम आकोला

नांव उदेभान
बापाचें नांव सिदाजी
जात कुणबी राहणार कारली
तहसील वाशीम जिल्हा आकोला
च्या अल्पवयी फकीरा वा॥ बालाजी
उमर वर्षें ४ अंदाज
राहणार कारली ता. वाशिम तहसिलीचे (२)
शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१)
नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं–

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अज्ञानयीचें ( २ ) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २८ माहे जुलै सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख २३ माहे जून सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही
W. R. Dhobley
डि. जज
पाश्चिम वऱ्हाड
आकोला

नो. नं. २८६

## नोटीस

नोटीस बेशमी पुंजाजी रामजी शिंपी रा० आकोला

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ता० २३।६।१७ च्या सहीनें ता० २५-६-१७ च्या वऱ्हाडसमाचार पत्रांत जी जहीर नोटीस नं. २९२ ची दिली आहे त्यांत म्हटले आहे कीं पुंजाजी रामेश्वर या नांवचे दुकानाचा आपसांत ता. २१-६-१७ रोजीं निकाल होऊन रामेश्वर यानें तें दुकान पुंजाजी याचे कबज्यांत दिलें आहे व सर्व लोकांस पुंजाजी रामेश्वर या दुकानांशीं कांहींएक व्यवहार करूं नये अशाबद्दल इशारत दिली आहे. तरी मी पुंजाजी रामेश्वर या दुकानचा भागीदार या नात्यानें या नोटिसीनें कळवितो कीं तुमचा व आमचा आपसांत निकाल मुळींच झाला नाहीं. दुकानच्या किल्या तुमचेजवळ असले कारणानें सदर्हु दुकान तुह्मी आपले कबज्यांत ठेविली आहे त्याअर्थीं आपला भागिदारीचा निकाल होई पर्यंत दुकानची सर्व प्रकारची जोखीम तुमचेवर आहे. तसेच नोटिसीत तुह्मी लिहिले कीं रा. रा. रतनलाल बालचंदजी यांचे कर्जाचा बोजा मी आपलेवर घेतला आहे हें खोटें आहे. तो बोजा भागीदारीचे दुकानावरच आहे. या तुमचे नोटिसीवरून तुमचे मनांत बेइमानी उत्पन्न झाल्याचे स्पष्ट दिसते आहे तरी ही नोटीस पावले तारखेपासून आठ दिवसाचे आंत पांच पंचासमक्ष आपसांत आपले भागीदारीचे दुकानचा हिशेब मजला चुकता देऊन माझी पावती घ्यावी. असें न केल्यास कायद्याप्रमाणें तुमचेवर दावा करावा लागेल व सर्व खर्चही तुह्मास भरावा लागेल. कळावें ता. २८-६-१७

सही

रामेश्वर भोलाराम मारवाडी मुक्काम आकोला द. खुद

नो. नं.२८७

## जाहीर नोटीस

विद्यमान सिनीयर सब जज साहेब कोर्ट आकोला

कि. दि .मु. नं. १५ सन १९१७

अर्जदार

तेजमल वा॥ गुलाबचंद मारवाडी रा. उंबर ता. आकोट

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येते कीं, मयत गुलाबचंद सग्रामदास मारवाडी हा तारीख २०-१२-१४ इ. रोजीं मु. उंबर ता. आकोट जि. आकोला येथें मयत झाला आहे. त्याचा वारस या नात्यानें मयताचा मुलगा अर्जदार तेजमल यानें वारसाचे सर्टिफिकीट मिळणे करितां आमचे कोर्टांत तारीख १८-६-१७ इ. रोजीं अर्ज दिला आहे. त्याची चौकशीची तारीख २५-८-१७ इ. ची नेमली आहे. तरी त्याचे विरुद्ध ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यांनीं नेमल्या तारखेस कोर्टांत हजर व्हावे ता.२५-६-१७

सही
N. G. Subhedar
Senior Sub Judge
Akola

N. N.288

## पत्रव्यवहार

### महाराष्ट्रीय वाङ्मय सूचि.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सा. न. वि. वि.

कृपा करून खालील ओळी आपल्या पत्रांत प्रसिद्ध करण्याची कृपा करावी.

मराठी भाषेत आह्मी ज्ञानकोश करावयाचा घातला आहे त्याची माहिती आज चोहोंकडे झालीच आहे.

ज्ञानकोशाच्या लेखकांसाठीं आह्मीं मुद्दाम एक वाङ्मय सूचि तयार करण्यास घेतली व ती आतां तयार होत आली आहे. त्या वाङ्मय सूचीमध्यें आह्मी सन १८१३ पासून आतांपर्यंत मराठींत छापलेले सर्व ग्रंथ, आणि मासिकांतील महत्वाचे लेख यांची यादी केली आहे. ही सर्व यादी विषयवार वर्गीकरण करून छापण्यांत येईल. विषयवार वर्गीकरण ह्मणजे केवळ निबंध, इतिहास असें स्थूलमे. [illegible]रण करावयाचें नाहीं तर शास्त्रीय तऱ्हेचें वर्गीकरण तयार होईल. उदाहरणार्थ "साप चावल्यावर उपाय" ह्मणून कोठें मासिकांतून लहानसा लेख आला तर तो वैद्यक सदराखालीं विषवैद्यक ह्मणून उपवर्ग असेल तेथें तो नोंदला जाईल. इसाबनीति हें पुस्तक "ग्रीक वाङ्मय" या सदराखालीं जाईल. आणि स्टवार्जीराव दमले, शूर रायबा, जयध्वज इत्यादि पुस्तकें केवळ नाटकें या सदराखालीं न घालता फ्रेंच वाङ्मय या सदराखालीं नाटकें व प्रहसनें हे छोटें सदर राहून त्या खालीं येतील.

वाङ्मय सूचि स्वतंत्र छापून काढावयाचें काम आह्मास करावें लागलें याची मुख्य कारणें येणें प्रमाणें.

(अ) आमच्या शास्त्रीय विषयावरील लेखामध्यें ज्या शास्त्रीय संज्ञा घालावयाच्या त्या होईल तितकें करून दुसऱ्या लेखकांनीं वापरलेल्या घालाव्यात असा आमचा नियम झाला आहे. प्रत्येक लेखकास आपापल्या विषयावरील पुस्तकांची व त्यावर झालेल्या मराठी लेखांची यादी तयार करण्यास फारच त्रास पडेल ह्मणून आह्मीच त्यांस यादी पुरविण्याचें ठरविलें आहे. शास्त्रीय विषयावरील लेखक उत्तम शास्त्रज्ञ असला तरी त्यास मराठींत कोठें काय आलें आहे हें कोठून ठाऊक असणार?

(आ) आमचें यादी करण्याचें दुसरें कारण हटलें ह्मणजे हा ज्ञानकोश महाराष्ट्रीय वाङ्मयामध्यें धूमकेतु प्रमाणें न होता हा महाराष्ट्रीयांच्या पूर्व ज्ञानाचें परिणत स्वरूप झाला पाहिजे आणि यासाठीं प्रत्येक लेखकानें आपापल्या विषयावर महाराष्ट्रांत असलेलें ज्ञान व अज्ञान लक्षांत घेऊन लेख लिहिला पाहिजे. चुकीच्या कल्पना कोठें व्यक्त झाल्या असल्या तर त्या अत्यंत संक्षेपानें उल्लेखिल्या पाहिजेत.

वाङ्मय सूचीमध्यें सुमारें २०००० पुस्तकांची व लेखांची यादी येणार आहे. आणि ती छापून प्रसिद्ध केल्यास सुमारें सुपर रायल अष्टपत्री (कै. वा. शि. आपटे यांच्या संस्कृत इंग्रजी कोशाच्या आकाराचीं) ४०० पृष्ठे होतील असा अदमास आहे. ही सूची करण्यासाठीं रा. रा. यशवंत रामकृष्ण दाते बी. ए. एल एल. बी. व रा. रा. रामचंद्र त्र्यंबक देशमुख बी. ए बी. या अत्यंत मेहेनती पदवीधरांची नेमणूक करून त्यांस हें काम करण्यासाठीं मुंबई व पुणें येथें काम करण्यास पाठविलें. या दोघा तरुण पदवीधरांनीं केवळ आठ कारकुनांच्या सहायानें हें काम केलें. आजपर्यंत झालेला व पुढें छपाईसाठीं होणारा खर्च लक्षांत घेतां आह्मांस याबद्दल पंधराशें रुपये खर्च येणार आहे. हें काम आह्मांस तांतडीनें केल्याशिवाय गत्यंतर नाहीं कां कीं आह्मांस लेखकांस हीं पुस्तकें होईल तितकीं ताबडतोब दिलीं पाहिजेत.

या पुस्तकाच्या आह्मी २९० प्रती काढणार आहोत. सध्यांच्या कागदाच्या महागाईच्या दिवसांत खपाची खात्री असल्या शिवाय आह्मांस कागदांत भांडवल घालून ठेवण्याची इच्छा नाहीं. जर आह्मांस कांहीं मागण्या ताबडतोब आल्या तर आह्मी जास्त प्रती काढण्याचा विचार करूं. प्रत्येक प्रतीची किंमत आगाऊ मागणी करणारांस फक्त पांच रुपये राहील. तर वाचकांनीं आणि लायब्ररयांनीं आपली मागणी ताबडतोब नोंदवावी. १९ जुलैच्या सुमारास पहिला फार्म छापला जाईल. कळावें हे विनंती.

श्रीधर व्यंकटेश केतकर

---

वऱ्हाडसमाचार

आषाढ शु॥ १२ पिंगल संवत्सर १८३९

### हिंदुस्थानचे जन्मसिद्ध पुढारी.

हिंदुस्थानांत राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेनें राज्य कारभारांत हिंदी लोकांचें अंग असावें ह्मणून अनेक वर्षे खटपट करून व ब्रिटिश जनतेस जागृत करून तिच्या पुढें आपली न्यायाची मागणी मांडली, व ती देण्याचा त्या जनतेचा कल दिसूं लागला कीं सुशिक्षित हिंदी लोक ज्यांच्या डोळ्यांत सलतात असे अधिकारी व इंग्रज पत्रकर्ते या सुशिक्षित हिंदी लोकांच्या पदरांत सदर हक्क पडण्याचे मार्गांत अडवे येऊन हिंदुस्थानांत 'बडेबापके बेटे' ह्मणून जो एक वर्ग आहे त्याला हाताशीं धरून या देशाचे 'जन्मसिद्ध पुढारी' ह्मणून कौंसिलांत वगैरे त्यांना पुढें करीत असतात. ह्या वर्गांत देशी संस्थानिक, जमीनदार, जहागिरदार वगैरे लक्ष्मीपुत्र बहुधा असतात. त्यांना लोकनायकत्वाचा हक्क शिक्षणाचा संस्कार किंवा रयतेच्या हितासाठीं केलेले कळकळीचे प्रयत्न इ. गोष्टीमुळें प्राप्त झालेला नसतो, तर केवळ 'बडे बापके बेटे' पणामुळें किंवा 'जो हुकुम'पणाच्या गुणामुळें जन्मताच प्राप्त झालेला असतो. हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या सुधारणेचा प्रश्न ज्या ज्या वेळीं उपस्थित होतो त्या त्या वेळीं या 'जो हुकुम' जन्मसिद्ध पुढाऱ्यांना पुढें करण्यांत येत असतें. मार्ले—मिंटो सुधारणेच्या वेळीं हाच अनुभव आला; आतां युद्धानंतर हिंदुस्थानला जे कांहीं विशेष हक्क प्राप्त होण्याची आशा वाटत आहे त्यावेळीं ही सुधारणारूपी दुधांत या जन्मसिद्ध पुढाऱ्यांचा मिठाचा खडा टाकण्यास सरकारी अधिकारी चुकावयाचे नाहींत अशी भीती वाटूं लागली आहे. हिंदुस्थानांत कौंसिलें प्रथम स्थापन झालीं तेव्हां त्यांच्यांत अशाच जन्मसिद्ध पुढाऱ्यांच्या नेमणुका सरकारकडून होत असत, व अजून ही कौंसिल ऑफ नोटेबल्स (नॉट एबल्स) स्थापन करून त्यांच्या सल्यानें राज्यकारभार चालवावा अशा सूचना मधून मधून होत असतात. हिंदुस्थान रिव्ह्यूमध्यें देशी संस्थानिकांचा दर्जा वाढवून त्यांचे अधिकार वाढविण्यासंबंधानें जो एक लेख नुकताच आला होता व ज्याच्या उत्तरादाखल लेख माला लिहून देशी संस्थानिकांच्या कारभाराचें आविष्करण आह्मी नुकतेंच केलें होतें तो लेख अशाच जन्मसिद्ध पुढारीपणाच्या तत्त्वाचें समर्थन करणारा होता. हें जन्मसिद्धत्वाचें खूळ इतकें मूर्खपणाचें व हिंदुस्थानच्या प्रगतीला प्रतिबंधक व हानिकारक आहे कीं त्याचें हिडिस स्वरूप हिंदुस्थानच्या व ब्रिटिश जनतेच्या नजरेस जितकें लवकर येईल तितकें इष्ट आहे. या दृष्टीनें 'न्यू इरा' (नवयुग) नांवाच्या इंग्रजी पत्रांत 'बांबूक' नामाभिधान धारण करणारानें जन्मसिद्ध पुढाऱ्याचें शद्बचित्र रेखाटून हिंदुस्थानची मोठी सेवा केली आहे असें ह्मटलें पाहिजे. बांबूक याच्या शद्बचित्राची रूपरेखा थोडक्यांत अशी आहे. तो लेखक ह्मणतो—

जन्मसिद्ध पुढारी हा प्राणी अलीकडच्या ह्मणजे ब्रिटिश काळांतलाच आहे. अकबर बादशहाच्या वेळीं तो नव्हता; असता तर हत्ती, खेचरें, गाढवें यांचा सुद्धां आपल्या ग्रंथांत उल्लेख करणाऱ्या अबुलफजल सारख्या फारशी इतिहासकाराच्या बारीक दृष्टींतून येवढा मोठा प्राणि सुटला नसता. हा प्राणी अधिकाराभिलाषी सरकारी अधिकाऱ्यांच्या सुपीक मेंदूंतल्या कल्पनेनें प्रसवलेला दिसतो. हिंदुस्थानच्या सुशिक्षित पुढाऱ्यांना 'तोडीस तोड' करण्याच्या हेतूनें ही विश्वामित्री सृष्टि झालेली आहे. या प्राण्याचें बालपण कधींच संपत नाहीं. हा वयानें मोठा झाला तरी अंगावर अलंकार घालण्याची, वेडे वेडेचार करण्याची, व आपल्या खऱ्या हिताची गोष्ट न ऐकतां नुसत्या वरवरच्या भपक्याला भुलण्याची याची हौस किंवा खोड कधीं जात नाहीं. याला स्वतःची बुद्धि अशी नसतेच. याला शिकावें असें कधीं वाटत नाहीं. याची विवेकबुद्धि अर्थात् कधींच जागृत होत नाहीं. याला आपल्या जन्माचें सार्थक एकाच गोष्टींत वाटतें, आणि ती गोष्ट ह्मणजे अधिकारी वर्गाच्या दुर्भेद्य किल्यावर सलाम, खुशामत व नजराण्याच्या डाल्या यांचा भडिमार करून तो किल्ला सर करणें ही होय. वरच्यांची खुशामत करणें व खालच्यांकडून ती करवून घेणें, वरच्यांच्या लाथा खाणें व खालच्यांना त्या देणें, पदव्या व मानमरातब मिळविण्यासाठीं द्रव्याचा व्यय करणें, इ० गोष्टींत त्याचें सगळें आयुष्य जातें. हा बहुधा कर्जबाजारी असावयाचा; पण सावकारांना कोकलत ठेवून तो गार्डन पार्ट्या देण्यांत व डाल्या वगैरे गोष्टींतच तो आपलें उत्पन्न खर्चीत असतो. तो कोणत्याही सार्वजनिक सभेला जावयाचा नाहीं. त्यांतल्यात्यांत राजकीय सभांपासून तर शेंभर हात दूर पळावयाचा. कौंसिलासारख्या सभांत खुर्ची मिळण्याचें भाग्य प्राप्त झालें तर जिवंतपणींच स्वर्गप्राप्तीचें सुख मिळाल्याइतका हर्ष त्याला होतो; आणि तेथें तो जें भाषण अडखळत वाचतो, त्याचा अर्थ तरी त्याला कळतो कीं नाहीं याची शंकाच! मला वाचतां येणार नाहींत असे अगडबंब शद्ब तूं भाषण लिहितांना कां घातलेस असा ताशेरा कौंसिलच्या सभेंतून घरीं येताच सेक्रेटरीवर झाडण्यास तो कधीं चुकावयाचा नाहीं. अंगावरचा पोषाख व अलंकार वगैरे साज पाहून आणि कौंसिलांत तो ज्या प्रकारें मान डोलावीत असतो तो प्रकार पाहून एखादा मनुष्य त्याला नंदी बैल समजेल. हा नेहमीं सुस्त व गुंगलेला असावयाचा; कौंसिलांत स्वतःचें भाषण वाचण्यापुरता काय जागा राहील तेवढाच. त्याचे अंगीं एक विशिष्ट प्रकारचें मनोधैर्य असतें, लोकानियुक्त सभासदांचें ह्मणणें समजून घेण्याचे भानगडींत न पडतां ते ह्मणतील त्याच्या उलट बाजूला मत द्यायचें हें एकमार्गी धोरण स्वीकारण्यास लागणारें मनोधैर्य त्याचे अंगीं भरपूर भरलेलें असतें तो अधिकारीवर्गाची जी एकनिष्ठेनें आराधना करीत असतो तिचें फळ मिळण्यासाठीं त्याला परलोकाकडे पहावें लागत नाहीं. याच जन्मीं व याच लोकीं तें त्याला मिळतें. त्याला दरबारांत मानपान तर मिळतोच, पण बाह्यजगांत ही त्याची पाठ थोपटण्यास आंग्लो इंडियन पत्रकर्ते तयार असतात. देशी पत्रकर्त्यांनीं त्याची कणीक कितीही तिंबली तरी त्याची तो पर्वा करीत नाहीं.

वर दिलेलें शद्बचित्र इतकें हृदयंगम आहे कीं असा प्राणी सरकारानें कौंसिलचेंबरमध्यें ठेवण्यापेक्षां एखाद्या प्राणीसंग्रहालयांत ठेविल्यास त्याला पाहण्यास लोकांच्या झुंडीच्या झुंडी गोळा होतील व कदाचित् एखादा शास्त्रज्ञ त्याच्या विचित्र मनोरचनेचें गूढतत्त्व अत्यंत परिश्रमपूर्वक शोधून काढून शास्त्रीय ज्ञानांत आपल्या शोधानें महत्त्वाची भर ही टाकील असें आह्मांस वाटतें.

---

### शेतकऱ्यांनो, इकडे लक्ष द्या.

मुंबई इलाख्याच्या शेतकीखात्यानें नं. ७ चें हस्तपत्रक मराठींत काढलें आहे तें शेतकऱ्यांच्या विशेष उपयोगाचें असल्यामुळें तिकडे त्याचें आह्मी लक्ष वेधतों. हल्लीं मजुराची टंचाई होऊन मजुरीचे दर वाढल्यामुळें शेतकामासाठीं मजूर मिळण्यास अड चण पडते. अशावेळीं खुरपणीसारखीं कामें माणसाकडून न घेतां बैलांकडून घेतां आलीं तर शेतकऱ्यांचा फायदा होईल. अलीकडे कोळपणी करण्याचें काम कित्येक ठिकाणीं बैलांच्या जोडीकडून करविण्यांत येतें. पण दोन बैलांकडून दोन कोळपीं चालविण्यांत पिकाचें नुकसान होण्याचा संभव असतो. एक बैलाचें जूं निघालें तर हें नुकसान टाळतां येईल. पुष्कळ प्रयोगाअंतीं

पुण्यानजिक मांजरी फार्मवर असें जूं तयार करण्यांत आलें आहे. निरनिराळ्या बैलांच्या उंचीला हें जुळवितां येतें. बाभळीच्या अगर दुसऱ्या चिवट लाकडापासून हें तयार करतात. सुपरिंटेंडेंट मांजरी फार्म जि. पुणें यांजकडे यासंबंधाची माहिती मिळते. हें जूं तेथें विक्रीसाठीं ह्मां ठेविलें आहे. जसा प्रसंग येईल त्याप्रमाणें शेतकामाच्या पद्धतींत सुधारलेल्या यंत्राचा उपयोग करण्यास शिकल्यावांचून आमच्या शेतकरी वर्गास आतां तरणोपाय नाहीं हें लक्षांत घेऊन आमचे शेतकरी बंधु या माहितीचा उपयोग करून घेतील अशी आह्मी आशा करतों, आणि या नव्या शोधाबद्दल मुंबईसरकारच्या शेतकीखात्यास धन्यवाद देतों.

## महायुद्धाची प्रगति.

मेसाइन्स येथील लढाईत ब्रिटिशांना जो अत्यंत महत्वाचा विजय प्राप्त झाला त्यानंतर बरेच दिवसांत तसा विजय कोणत्याही पक्षाला मिळाल्याची खबर आली नाहीं; पण त्यावरून ब्रिटिश फौज स्थगित झाली आहे असें मात्र ह्मणतां येत नाहीं. शनैः शनैः त्या फौजेचें पाऊल पुढेंच पडत आहे. जर्मनशत्रूचे फ्रेंच हद्दीवरच हल्ले ही त्याबरोबर सुरू आहेत. हे हल्ले करण्यांत जर्मनशत्रूंचा उद्देश स्पष्टच आहे. तो हा कीं जर्मनांच्या डिफेन्सिव्ह लाईनीपाशीं फ्रेंच लोक जाऊन पोचलेले पाहून जर्मनांना स्वतःच्या सुरक्षितपणाविषयीं भीती वाटूं लागली होती. तेव्हां फ्रेंच लोकांना कोणीकडून तरी गुंतवून ठेवण्यासाठीं हे हल्ले जर्मन लोक करीत आहेत. सारांश जर्मनीची स्थिति त्यांची त्यांनाच मोठी धोक्याची वाटत आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. जर्मन लोक मागें हटत आहेत अशा बातम्या वरचेवर येत आहेत, आणि समुद्रापासूनची सबंध लाईन इंग्रजांचे हातांत आहे ही एक गोष्ट, व त्याच प्रमाणें आस्टेंड बंदरांतून जर्मन लोकांनीं आपलीं सगळीं जहाजें काढून नेलीं ही दुसरी गोष्ट, यांचा संयुक्त विचार केला ह्मणजे सदर बातम्यांत बराच तथ्यांश असला पाहिजे असें दिसतें. आतां याच्या पुढें बेलज्यममध्यें ब्रिटिश आणि जर्मन यांचें युद्ध जुंपून तें रंगास येईल अशी पुष्कळांची अटकळ आहे. ती कितपत खरी ठरतें तें पहावें.

## बेलज्यम.

ही अटकळ करण्यास तशीं कांहीं कारणें ही आहेत. जर्मन लोकांनीं सबमरीनचा जो धुमाकूळ मांडला आहे व इंग्लंडच्या किनाऱ्यावर त्यांचे जे वरचेवर हल्ले होत असतात, त्यांचा उगम बेलज्यमचा किनारा हा आहे. हा किनारा असे हल्ले करण्यास जर्मन लोकांना मोठा सोयीचा झाला आहे. याच किनाऱ्यापासून शत्रूचीं विमानें इंग्लंडवर हल्ला करण्यासाठीं प्रयाण करीत असतात. अर्थात् जर्मन शत्रूच्या या हल्ल्यांचा बंदोबस्त करण्यास तो किनारा हस्तगत करण्याची अवश्यकता इंग्रजांना दिसणें स्वाभाविक आहे. याच्यापुढें बेलज्यम हें मुख्य रणांगण होईल अशी जी अटकळ करण्यांत येत आहे तिच्या मुळाशीं ही कारणें आहेत, व हीं कारणें कोणालाही सयुक्तिक वाटण्यासारखीं आहेत.

## जर्मन सबमरीन बोटींची चळवळ.

गेल्या दोन तीन महिन्यांत जर्मन सबमरीन बोटींनीं ब्रिटिश जहाजांचे केलेल्या नुकसानीचे आंकडे पाहिले तर त्यांत विलक्षण रीतीचा चढउतार झालेला दिसून येईल. एप्रिलच्या अखेरच्या आठवड्यांत हा नुकसानीचा आंकडा बराच ठळक होता. पुढें हळूं हळूं तो उतरत उतरत जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत तो बराच खालीं आला होता. पण तेव्हांपासून तो पुनः सारखा चढत चाललेला पाहून ब्रिटिश साम्राज्याच्या हितचिंतकांच्या मनांत पुनः काळजी उत्पन्न झाली आहे असें विलायतच्या पत्रांवरून दिसतें. फ्रेंच आरमार खात्यावरील अधिकाऱ्यांनीं या नुकसानीचा जो अंदाज केला आहे तो पाहिला तर असें दिसतें कीं या वर्षाच्या आरंभीच्या चार महिन्यांत नुकसानीचें जें प्रमाण होतें तें तसेंच पुढें चालूं राहिलें असतें तर एकावर्षांत ४० लक्ष टनाची हानि झाली असती आतां प्रश्न हा आहे कीं येवढी जंगी हानि होत असतां ब्रिटिश अधिकाऱ्यांचे हातून ती बंद करण्याचे यशस्वी प्रयत्न कसे होत नाहींत? या संबंधांत विलायतेंतलीं पत्रें सगळा दोष ब्रिटिश आरमारावरील अधिकाऱ्यांना देत आहेत. ब्रिटिश आरमार इतर कोणत्याही युरोपियन राष्ट्राच्या आरमारापेक्षां ज्यास्त श्रेष्ट व प्रबळ असतां जर्मन सबमरीनचा बंदोबस्त त्याला करतां येत नाहीं. तेव्हां आरमार खातें खरोखरच कमकुवत असलें पाहिजे किंवा निदान त्याच्या अंगीं उरक कमी असला पाहिजे असें विलायती पत्रांचें ह्मणणें आहे. युद्धाला नुकतीच सुरुवात झाली होती त्यावेळीं ब्रिटिश फौजे संबंधानें ही अशीच टीका करण्यांत आली होती, पण थोड्याशा ठेंचा खाल्ल्यावर तरी लष्करी खातें शहाणपण शिकलें. ब्रिटिश आरमार खात्याच्या सुधारणेसाठीं असेच प्रयत्न आणि तेही तत्काळ होणें किती अवश्य आहे तें निराळें सांगण्याची अवश्यकता नाहीं.

## रशियांतील गडबड.

आज कित्येक दिवसांपासून रशियाच्या स्थितीसंबंधानें मित्रराष्ट्रसंघाच्या हितचिंतकांस काळजी वाटत होती. रशियाच्या राजकीय नभोमंडळाला अंतःस्थ भेदरूपी मेघांनीं बरेंच व्यापून टाकिलें होतें. पण तेथील स्थिति प्रत्यक्ष अवलोकन करून आलेले फ्रेंच दारूगोळा खात्यावरील प्रधान मॉ. थॉमस यांनीं एका मुलाखतीचे प्रसंगीं जें सांगितलें त्यावरून काळजी करण्याचें कारण उरलें नाहीं, इतकेंच नाहीं, तर उलट फार उमेदजनक स्थिति आहे असें दिसतें. रशिया शत्रूंशीं स्वतंत्र तह करण्यास तयार होईल ही कल्पना सुद्धां मनांत आणूं नये. तेथील नव्या सरकारी अधिकाऱ्यांचे पाय आपल्या पदांवर मजबूत रीतीनें बसले आहेत, सैन्याची व्यवस्था सुव्यवस्थित आहे, आणि नुसते शत्रूपासून स्वतःचा बचाव करण्याचेंच नव्हे, तर शत्रूवर चालून जाण्याचें सुद्धां सामर्थ्य रशियन फौजेच्या ठायीं आलेलें आहे व रशियानें चाल करतांच जर्मानिशाची फौज ही शत्रूचा समाचार घेण्यास पुढें सरसावून अनेक आश्चर्योत्पादक पराक्रम करून दाखवील अशी खात्री मॉ. थॉमस यांस वाटत आहे. कोसाक ( रशियन शिपाई ) यांची परिषद नुकतीच भरली होती. ते वेळीं रशियन शिपायांच्या अंगची विलक्षण तेजस्विता त्यांच्या भाषणांतून प्रकट झाली. लेनिन याचे अनुयायी देशद्रोही असल्यामुळें त्यांना योग्य दंड झाला पाहिजे अशी मागणी अनेक लष्करी प्रतिनिधींनीं यावेळीं केली, आणि त्याबरोबर देशसेवेप्रीत्यर्थ रणांगणावर स्वतःच्या प्राणांची आहुति देण्यास आपण तयार आहों असें कोसाकनीं सांगितलें. पूर्वीच्या कारकीर्दींतल्या जुलमानें निष्कारण हद्दपार केलेले शेकडों रशियन आपल्या देशास परत येत आहेत. रशियांत प्रजासत्ताक पद्धति पूर्णपणें स्थापित व्हावी, व राजसभेंत रशियन शेतकरी वर्ग सुद्धां अंतर्भूत व्हावा, सोशियालिस्ट प्रधान या राजसभेला जबाबदार असावा आणि मित्रराष्ट्रसंघाशीं संयुक्त राहून शत्रूवर रशियानें चाल करावी अशी मागणी अखिल रशियन कामकरीसंघानें केली आहे मास्को येथील मजूर वर्गानें आपल्या मजुरींत वाढ होण्याविषयींची केलेली मागणी सरकरनें कबूल केल्यामुळें त्यांचा संप मोडला आहे स्विझर्लंडच्या मंत्र्यांनीं मध्यंतरी स्वतंत्र तह रशियानें करावा अशाविषयीं जी लुडबुड मांडली होती ती अर्थात् बंद पडून या प्रकरणाच्या मुळाशीं कोण कोण आहेत व ती करण्यांत त्यांचे हेतु काय होते वगैरे गोष्टींची चौकशी स्वित्झर्लंडांत लवकरच होणार आहे.

## ग्रीसचा शहाणपणा.

ग्रीसचा राजा पदच्युत होतांच त्या देशाची गेलेली अक्कल परत आली आहे. व्हेनेझूलोस सारख्या शहाण्या दूरदर्शी, व योक्त मंत्र्यावर दुर्दैवानें आलेली साडेसाती संपून त्याची पुनः मुख्य मंत्र्याचे अधिकारावर प्रस्थापना झाली आहे. आतां जी गोष्ट घडली तीच वर्ष दीडवर्षापूर्वी घडली असती तर युद्धाला कांहीं निराळेंच स्वरूप आलें असतें यांत शंका नाहीं. आतां व्हेनेझुलोस हे ग्रीसच्या राज्यपद्धतीची व धोरणाची घडी पुनः नीटपणें बसवितील व मित्रराष्ट्रसंघाला योग्य प्रकारें मदत करून युद्धाचा शेवट अलीकडे ओढण्यास कारणीभूत होतील अशी उमेद मित्रराष्ट्रांना वाटूं लागली आहे. व्हेनेझुलोस यांच्या आगमनाची वार्ता कळल्यापासूनच बल्गेरियाच्या उरांत धडकी भरलेली दिसत आहे.

## इतर बातम्या.

मद्रासससरकारनें मिसेस बिझांट, मि. वाडिया व मि. अरंडेल यांना अटकेंत ठेवल्यामुळें सगळ्या देशांत उत्पन्न झालेली क्षुब्धता शांत करण्यासाठीं लॉर्ड चेम्सफोर्ड यांनीं सरकारनियुक्त अधिकारी व कांग्रेस आणि मुस्लीमलीग यांचे प्रतिनिधि यांचें एक संयुक्त कॉनफरन्स बोलवावें व सर्वांच्या विचारानें हिंदुस्थानला कोणत्या राजकीय सुधारणा सध्या अवश्य आहेत या प्रश्नाची चर्चा करून कांहीं एक योजना निश्चित करावी अशी योग्य सूचना नाशिकचे वकील व 'भारत सेवक' चे संपादक रा. प्रधान यांनीं वर्तमानपत्रद्वारें केली आहे.

कोणत्या ही गोष्टींत पुढाकार घेण्याच्या पुणेकरांच्या उत्सुकतेमुळें गेल्या सोमवारीं व मंगळवारीं पुणेकरांच्या हातून एक अक्षम्य व अत्यंत खेदजनक अशी चूक घडली. डॉ. दादाभाई नौरोजी यांच्या मरणाची शोकजनक वार्ता कोणी तरी आणिल्यावरून तेथील बार असोसिएशननें लागलीच सभा भरवून शोकप्रदर्शक ठराव करून टाकिला. सुदैवानें तो महर्षींच्या कुटुंबीय मंडळीस पाठविण्याचें राहिलें. मंगळवारचा दिवस उजाडला तोंच केसरीच्या अंकांत महर्षींचें चित्र व मृत्युलेख अग्रस्थानीं पाहून पुण्याच्या शिक्षणसंस्थांनीं ती बातमी खरी समजून कॉलेजें, व शाळा यांचें काम शोकप्रकाशनार्थ व महर्षींच्या सन्मानार्थ बंद ठेवून सुट्या दिल्या. तिसरे प्रहरीं त्याच्या पुनः बातमी आली कीं महर्षींची प्रकृति अत्यवस्थ आहे खरी; तथापि सुदैवानें ते जीवमान आहेत. 'अतिशहाणा त्याचा बैल रिकामा' ही ह्मण खरी ठरली!

हिंदुस्थानच्या सरहद्दीवर महसुद लोकांनीं गेल्या तीन महिन्यांपासून हिंदुस्थानसरकारला त्रास देण्याचें काम चालू ठेविल्यामुळें त्यांची खोड मोडण्यासाठीं विशेष तजविजी करणें हिंदुस्थानसरकारला भाग झालें आहे, व त्या तजविजींना यश ही येत आहे.

लखनौ कांग्रेसनें स्वराज्यासंबंधानें केलेला ठराव आपण पाहिलेला नाहीं असें मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड पेटलंड यांनीं मिसेस बिझांट बाईशीं झालेल्या मुलाखतींत सांगितलें. हिंदुस्थानच्या लोकसमाजांत राजकीय विचाराचे कोणते प्रवाह जोरानें वाहत आहेत याविषयींचें राज्यकर्त्यांच्याठायीं इतकें अज्ञान हिंदुस्थाना बाहेर कोठें खपलें असतें कीं काय याची शंकाच आहे. हिंदुस्थानांतल्या सगळ्याच गोष्टी विचित्र!

युद्धांमुळें लोकांचें शिक्षण किंवा इतर सुधारणा यांच्या सुधारणा करण्यास किंवा लोकांच्या दुःखनिवारणास लागणारा पैसा व फुरसत सरकारास नाहीं असें इकडे खुशाल सांगण्यांत येते व अवश्य खर्चाला ही काट देण्यांत येतो. पण युद्धाचा पहिला धक्का ज्या इंग्लंडला बसला व त्याबद्दलचा मुख्य बोजा ज्याला सहन करावा लागला त्या इंग्लंडमध्यें शिक्षणविषयक व कृषिविषयक सुधारणेसाठीं प्रचंड रकमांच्या खर्चास सरकारकडून मंजुरी मिळत असून आयर्लंडचें स्वराज्य, मतवादी स्त्रियांची मागणी, पार्लमेंटच्या निवडणुकीच्या तत्वांत सुधारणा करण्याविषयींचें बिल इ. अनेक वादग्रस्त व नाजूक प्रश्नांचा विचार सरकारी अधिकारी विशेष आस्थेनें करून कोणता ही पक्ष असंतुष्ट न राहील या विषयीं विशेष दक्षता ठेवीत असल्याचें दिसतें. हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामध्यें इतका फरक कां असावा?

कराची येथील न्यू हायस्कूलचे हेडमास्तर मि. ताराचंद व त्यांचे एक मदतनीस शिक्षक हे स्वतःला व मुलांना देवी टोंचून घेण्यास नाकबूल झाल्यावरून तेथील म्याजिस्ट्रेटानें त्यांस अनुक्रमें ६० व २६ रु.

दंड केला. कायद्याप्रमाणें हें योग्य झालें पण ज्या देवी टोचण्यासंबंधाने पाश्चात्य शास्त्रज्ञांत सुद्धां मतभेद आहे त्यासंबंधानें इकडे सक्ती करणारा कायदा या विसाव्या शतकाला शोभणारा नाहीं हें लक्षांत घेऊन तो रद्द करण्याविषयीं कोणी चळवळ कां करीत नाहीं?

## मि. चेंबर्लेन आणि अटकेचा प्रश्न.

मिसेस बिझांट, मि. वाडिया, आणि मि. अरंडेल यांना मद्राससरकारानें केलेल्या अटकेविषयीं पार्लमेंटांत लवकरच प्रश्नोत्तरें होतील व त्यावरून सदर अटकेच्या कारणांचा खुलासा होईल अशी लोकांची अटकळ होती व ती अंशतः खरी ठरली. अटक झाल्यानंतर तीन चार दिवसांतच पार्लमेंटांत प्रश्न विचारण्यांत आला व त्याला स्टेटसेक्रेटरी मि. चेंबर्लेन यांच्याकडून जें उत्तर देण्यांत आलें त्यावरून येवढें स्पष्टपणें कळलें कीं मद्राससरकारनें ही गोष्ट स्वतःच्या जबाबदारीवर कलेली नसून त्यासंबंधानें इतर प्रांतिक सरकार व बहुधा हिंदुस्थान सरकार व खुद्द स्टेटसेक्रेटरी या सर्वांच्या अनुमतीनें ती झाली. मि. चेंबर्लेन यांच्या उत्तरावरून त्यांना इकडची खरी स्थिति कळविण्यांत आली नसावी, किंवा निदान ती अन्य प्रकारें तरी कळविण्यांत आली असावी असें दिसतें. कारण ते ह्मणतात कीं मिसेस बिझांट यांच्या चळवळीनें देशांत अस्वस्थता उत्पन्न झाली होती व सध्याच्या काळीं ती अस्वस्थता सहज भयप्रद होण्याचा संभव होता. या उत्तरावरून ती आज भयप्रद झाली आहे अशाविषयीं खुद्द मि. चेंबर्लेन यांची खात्री नाहीं हें उघड दिसतें. पण मद्राससरकार अटकेबद्दलच्या हुकुमांत स्पष्टपणें ह्मणत आहे कीं 'मिसेस बिझांट यांनीं सार्वजनिक सुरक्षितपणाला हानि पोचेल अशा रीतीचें कृत्य केलें आहे व करण्याच्या बेतांत त्या आहेत त्या अर्थी' इ. स्टेटसेक्रेटरी व मद्रास सरकार यांच्या समजुतींतला फरक कोणाच्या ही लक्षांत सहज येण्यासारखा आहे. मद्रास सरकार ह्मणतें कीं गुन्हा घडला आहे व पुढें ही तो करण्याचा मिसेस बिझांट यांचा विचार आहे. मि. चेंबर्लेन ह्मणतात कीं आज नुसती अस्वस्थता उत्पन्न झाली, पण लवकरच तिला भयंकर स्वरूप प्राप्त होण्याचा संभव होता. गुन्हा घडला आहे अशी मद्रास सरकारची खात्री होती तर तो कोणत्या कृत्यांनीं हें दाखविण्याची जबाबदारी, अर्थात् त्यांच्यावर होती व आहे. पण त्या कृत्याचा नामानिर्देश करून लोकांच्या मनांत स्वस्थता स्थापित करण्याचा यत्न तें सरकार अद्याप कां करीत नाहीं तें कळत नाहीं. बाईच्या चळवळीमुळें अस्वस्थता उत्पन्न झाली व तिला भयंकर स्वरूप प्राप्त होण्याचा संभव होता असें मि. चेंबर्लेन यांनीं सांगितलें, पण या अनुमानास आधार काय तें त्यांनीं ही सांगितलें नाहीं सारांश, मि चेंबर्लेन यांनी आयतवेळीं जें सुचलें तें कांहीं तरी उत्तर देऊन टाकिलें, या पक्षीकडे त्यांना या अतिशय खळबळ करून सोडणाऱ्या प्रश्नाचें महत्त्व वाटलें नसावें असें दिसतें. अजून ही यासंबंधानें पार्लमेंटांत प्रश्नोत्तरें होण्याचा संभव दिसतो तेव्हां तरी सत्य बाहेर येईल अशी आह्मी आशा करतों.

## गोष्त बाजार.

मांस विक्रयाची जागा आमच्या येथें अगदीं बाजूला आहे, पण ती जागा बदलून बाजारच्या पद्धतीवर एक निराळा भाग गोष्त बाजारासाठीं ठेवावा ह्मणून येथील म्युनिसिपालिटीनें विचार केला आहे. आणि त्या कामानिमित्त हल्लीं सभापतीच्या कंपौंडाच्या पश्चिम भागाचा कांहीं भाग हमरस्त्याला लागून या बाजारासाठीं द्यावा असा विचार ठरत आहे. पण ही जागा येथील मारवाडी, कच्छी, गुजराथी, भाटे वगैरे सर्व हिंदू मंडळीस नापसंत आहे. तेव्हां या बाबतींत गेल्या ३० मे रोजीं कॉटन मार्केटमध्यें शेट सूरजमल यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली होती व या सभेचा अभिप्राय ह्मणून मेहेरबान कमिशनर साहेबांस म्युनिसिपालिटीनें पसंत ठरविलेल्या जागेविषयीं लोकांचे आक्षेप कळविले आहेत. तेव्हां आह्मास उमेद आहे कीं लोकांच्या या योग्य व यथोचित विनंतीला कमिशनर साहेब मान देऊन गोष्त बाजारचें ठिकाण अगदीं एका बाजूला काढून देतील.

## मुनासिपल घोटाळा

या सदरा खालीं एक 'नागारिक' खालील प्रश्न विचारीत आहेः—

१ यंदा एका डिव्हिजन मधील, घरावरील कराची आकरणी बेसुमार वाढली आहे, व तीही बऱ्याच अंशीं एका विवक्षित वर्गावर आहे, अशी ओरड ऐकू येत आहे हें खरें आहे काय? याचा खुलासा जर कुणाकडून होईल तर त्याचे आह्मा नागरिकावर महदुपकार होतील.

२ त्याच प्रमाणें 'प्लेगचे टीन' प्लेगमध्यें गरीबास फुकट वाटून दिले जातात ते सुद्धां एका विवक्षित वर्गासच विशेषतः मिळतात अशी तक्रार आहे. हें खरें आहे काय?

३ घाणी संबंधीं होणारे मुकदमे एका विवक्षित वर्गावरच होतात व ह्यांतून एक वर्ग बहुतेक अंशीं सुटतो हें खरें आहे काय? असल्यास याला जबाबदार कोण?

४ ह्याच प्रमाणें म्युनिसिपालटीची कंत्राटें देतांनाही बराच घोटाळा आहे, अशी संशयास जागा आहे. केव्हां केव्हां दुसरी टेन्डरें मागाविल्याखेरीज, महत्वाचीं कंत्राटें कांहीं मेहरबानींतील लोकांस दिलीं गेलीं आहेत हें खरें आहे काय?

५ गांवांत बरेच टांगे खराब आहेत त्यांतील कांहीं टांगे खराबीमुळें सध्याचे सेक्रेटरी ह्यांनीं सस्पेंड केल्याचें एकिवात आहे. या बाबतींत मुकदमे का भरले जाऊं नयेत हें समजणें कठीण आहे.

वरील पांच बाबी शिवाय पुढील तक्रारी 'नागारिक' मागाहून पुढें आणणार आहे.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—पावसानें मोठी बहार केली हा आर्द्रा नक्षत्राचा एकेक अमृत बिंदू भावी पिकांची समृद्धी करणारा असून आमच्या आशा सुवर्णमय करीत आहे. आतां तहकूब राहिलेले कपाशीचे व ज्वारीचे पेरेही संपूर्ण होतील. रोगराई नसून लोक पर्जन्यकाळचीं सुखें अनुभवीत आहेत.

**शिष्टागमन**—आलिशान नामदार चीफ कमिशनर सर बेंजामिन राबर्टसन हे आज सायंकाळीं खांडव्याहून निघून उद्या सूर्योदयापूर्वीं ३ वाजतां खामगांवास दाखल होतील. खामगांवच्या हायस्कूलचा वास्तुसमारंभ यांच्या यशस्वी हातानें संपूर्ण झाल्यानंतर त्याच दिवशीं ९॥ च्या स्पेशल गाडीनें निघून सर साहेब उद्या दिवसा १२ वाजतां आकोल्यास येतील. आकोल्यास एक दिवस मुक्काम करून नागपूर मेलनें गुरुवारीं नागपुरास जाऊन दाखल होतील.

**आय. सी. एस्**—मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून २२५० रुपये पगाराचे ११ डेप्युटि कमिशनर, १८०० रुपये पगाराचे १२, व १५०० रुपये पगाराचे १२ आणि ९०० पगाराचे ९ असिस्टंट कमिशनर, ७०० पगाराचे ९ आणि ५०० पासून ४०० पगारापर्यंतचे १९ असिस्टंट कमिशनर मिळून हे सर्व राज्यकारभार हाकणारे अधिकारी आय. सी. एस. च आहेत. फक्त २४ नांवें याला बाधक येतील. जेथें मुख्य मुख्य अधिकार या प्रमाणें विलायतेहून येणाऱ्या सिव्हिल सर्व्हंटांच्या हातीं नांदतात तेथें स्वराज्य संघ ते काय करणार? किंवा स्वराज्याच्या गोष्टी कशा विजयी होणार बरें! आमच्या इकडील हिंदी सिव्हिल सर्व्हंट ह्मणून विलायतेला जर राज्य कारभार हाकण्याला जातील तर आमच्या दुःखाची व स्वराज्याची कहाणी सरकारला नीट कळून येईल.

रा. रा इंदुलाल सेवकलाल दवे एम. बी. बी. एस. यांस आकोला येथें टेंपररी असिस्टंट सर्जन वर्ग २ चे नेमण्यांत आलें आहे.

**होतकरू कौंसिलदार**—जिल्हा बोर्डातर्फे प्रांतिक कौंसिल्दारीसाठीं राव बहादुर मुंडले यवतमाळ व रावसाहेब रामचंद्र विष्णु महाजनी आकोला हे दोघे उमेदवार निवडणुकसाठीं येत आहेत. अर्थात रावबहादुर मुंडलें यांच्यापेक्षां आमच्या स्थानिक तरुण जोमदार व पीळदार रावसाहेबाकडेच आमचा ओढा स्वाभाविकपणेंच विशेष आहे.

रा. रा. बळवंत गणेश खापर्डे हे वाशिमास जाहिर सभेंत व्याख्यान देण्याकरितां मुद्दाम गेले आहेत. प्रस्तुतच्या राजकीय विषयावर काल त्यांचें व्याख्यान होतें. स्वराज्याची चळवळ अधिक उपयुक्त करण्याला अशीं व्याख्यानें मोठी मदत करितात. तेव्हां वाशिमकडील लोक पुष्कळसे स्वराज्य संघाचे सभासद होतील यांत नवल नाहीं.

रा. रा. श्रीपाद गोविंद बापट सब जज्ज उमरावती यांस तेथील स्माल्काज कोर्टावर नेमून रा. रा. जवाहिरलाल मुन्सफ यांस उमरावतीस सबजज्ज नेमण्यांत आलें आहे.

# नोटीस.

## शत्रूच्या मालमत्तेच्या नोंदणीच्या नियमांबाबत.

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं शत्रूच्या मालमत्तेच्या नोंदणीच्या नियमां अन्वयें

(१) शत्रू व शत्रूंची प्रजा आणि कंपन्या मग ते कोठेंहि राहणारे अगर व्यापार करणारे असोत, आणि

(२) शत्रूंच्या देशांतील कोणत्याहि राष्ट्राचे लोक अथवा त्यांच्या कंपन्या,

यांच्या करिता व तर्फेनें पैसे, शेअर, कर्जरोखे, इत्यादि प्रकार कोणतीही मालमत्ता ज्याचेपाशीं असेल त्यानें 'शत्रूच्या मालमत्तेचे कस्टोडिअन' मुंबई व मध्यप्रांत याजकडे 'कानडा बिल्डिंग्ज होम स्ट्रीट फोर्ट मुंबई' या ठिकाणीं ताबडतोब तिची नोंदणी करून घेतली पाहिजे.

नोंदणी विशिष्ट नमुन्यावर केली पाहिजे व हे नमुने कस्टोडिअनकडे अर्ज केल्यास मिळतील.

कोणाजवळ शत्रूची मालमत्ता असून तिजवर जर त्याचा कांहीं हक्कसंबंध पोंचत असेल तर नोंदणीचे नियमांपासून त्याची मुक्तता होणार नाहीं. परंतु त्यानें कस्टोडिअनला खऱ्या गोष्टी कळविल्या पाहिजेत. जो कोणी नोंदणी करणार नाहीं तो सहा महिन्याच्या कैदेच्या शिक्षेस अथवा एक हजार रुपये दंडास अगर दोहोंस पात्र होईल.

(सही) पी. एस्. मेलॉर,
शत्रूच्या मालमत्तेचे कस्टोडिअन
मुंबई व मध्यप्रांत.

नो. नं २८९

## विद्यार्थ्यांची सोय.

### (धि. आकोला कोचिंग क्लासेस)

गुदस्त सालाप्रमाणेंच यंदाहीं ता. ५ जुलै सन १९१७ पासून इंग्रजी पाचवीचा वर्ग सुरू होईल. ज्या विद्यार्थ्यांची इंग्रजी चवथी इयत्ता पास होऊन, पांचव्या इयत्तेमध्यें स्थलसंकोचामुळें हायस्कुलमध्यें सोय होणार नाहीं अशा विद्यार्थ्यांकरितां ही व्यवस्था आहे. तरी अशा विद्यार्थ्यांनीं ताबडतोब आमचेकडे खालील पत्त्यावर येऊन नांवें नोंदवावी.

इंग्रजी सहावी इयत्ताही यंदा सुरू करण्याचा विचार आहे. पण निदान सात विद्यार्थी सदरहु क्लासांत येण्यास तयार झाल्याशिवाय आह्मी हमी घेऊं शकत नाहीं.

ताजनापेठ अकोला १-७-१७ — मो. ग. ठकार वकील, हेड म्यानेजर धी अकोला कोचिंग क्लासेस

नो. नं. २९०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं द. हां. ........२ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीसं सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई न्य।केची सेव्हिंग ब्यांक.**

या बॅंकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट
नो नं १

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें टिकाऊ पक्का रंग किंमत ॥।, १, १। १॥, २, २॥, ते ९ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ।॥ १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ।॥, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विक तावडतोब दूर होतात किं रु. १०८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचींफुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें साखळ्या व बागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्या माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोन्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमार्शियल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि. मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमार्शियल अशूअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

मराठी भाषेंत अशा प्रकारचें हें पहिलेंच अपूर्व साहस !
वा. वर्गणी १२ आणे व्ही.पी, नें १४ आ.

## पूर्णानंद

स्वस्त आणि उपयुक्त सचित्र मासिक पुस्तक.

अत्यंत अल्प किंमतीत इतकें उपयुक्त, इतकें मनोरंजक, इतकें चित्रपूर्ण मासिक आजपर्यंत कोणीही दिलेले नाहीं. नमुन्याचा अंक २ आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

पत्ताः—पूर्णानंद-कार्यालय, बेळगांव,

नो. नं. २९९

## रोल्डगोल्ड सोन्याचे

कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३–४; गोट जोडी २–२॥; पाटल्या जडी २–२॥; वज्रटीका ३–४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४–५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सराची २–३–४; अंगठी १; सल्लि अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २–२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के आणि कंपनी
गिरगांव- मुंबई
नो० नं० ५

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी सुरकलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, सुकांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु० १६९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ५९० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगींस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सकाच, पुपस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० बे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

} कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

नो० नं० २२

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख ९ माहे जुलै सन १९१७ ई० [अंक २७

## नोटीस.

### शत्रूच्या मालमत्तेच्या नोंदणीच्या नियमांबाबत.

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं शत्रूच्या मालमत्तेच्या नोंदणीच्या नियमांअन्वयें

(१) शत्रू व शत्रूंची प्रजा आणि कंपन्या मग ते कोठेंहि राहणारे अगर व्यापार करणारे असोत, आणि

(२) शत्रूंच्या देशांतील कोणत्याहि राष्ट्राचे लोक अथवा त्यांच्या कंपन्या,

यांच्या करितां व तर्फेनें पैसे, शेअर, कर्जरोखे, इत्यादि प्रकार कोणतीही मालमत्ता ज्याचेपाशीं असेल त्यानें 'शत्रूच्या मालमत्तेचे कस्टोडिअन' मुंबई व मध्यप्रांत याजकडे 'कानडा बिल्डिंग्ज होम स्ट्रीट फोर्ट मुंबई' या ठिकाणीं तात्बडतोब तिची नोंदणी करून घेतली पाहिजे

नोंदणी विशिष्ट नमुन्यावर केली पाहिजे व हे नमुने कस्टोडिअनकडे अर्ज केल्यास मिळतील.

कोणाजवळ शत्रूची मालमत्ता असून तिजवर जर त्याचा कांहीं हक्कसंबंध पोंचत असेल तर नोंदणीचे नियमांपासून त्याची मुक्तता होणार नाहीं. परंतु त्यानें कस्टोडिअनला खऱ्या गोष्टी कळविल्या पाहिजेत. जो कोणी नोंदणी करणार नाहीं तो सहा महिन्याच्या कैदेच्या शिक्षेस अथवा एक हजार रुपये दंडास अगर दोहोंस पात्र होईल.

(सही) पी. एस्. मेलॉर,
शत्रूच्या मालमत्तेचे कस्टोडिअन
मुंबई व मध्यप्रांत.

नो. नं. २८९

---

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि असल १८८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १= कागजी बादाम ८९ पौंड, सेबाचा मुरब्बा २ पौ. टिन १।

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो० नं० ९

## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर—हात पेटी सिंगल रीड २० ते २५
" डबल रीड ३०-३५-४०-५०
तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५
पाय पेटी सप्तक ३। ६० ते ८० रु.
" " " ३॥ ८५ ते ९५ रु.
" " " ३॥। १०४-११५ रु.
" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु.

पत्ता—रामचंद्र बीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० (बुलडाणा)

ना. नं. २८४

---

अगोदर हे वाचा नंतर निराश व्हा.

## नशिबाची— परीक्षा.

सवलत— पुढील पांच कामें एकावेळीं मागविणारास २॥ रुपयांत पाठवूं, किरकोळ एकेका कामास पुढील प्रमाणें फी पडेल (१) इच्छेप्रमाणें वाटेल त्या पांच प्रश्नांचे उत्तरास १। रु (२) एक वर्षाचे वर्ष फलास १॥ रु. (३) छापील फार्मावर सर्व माहिती सह पत्रिकेस १। (४) जन्म कुंडलीवरून सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असेपर्यंतची फुलें लिहून पाठविण्यास १॥. रु. (५) इच्छित कार्यांत यश येऊन अनिष्ट ग्रहांची पीडा निरसन व्हावी त्या करितां एका महान सिद्ध पुरुषाचा प्रासादिक ताईत ३।. सूचना— ग्राहकांनीं वरील कामा करितां साग्रजन्मकाल व प्रश्नवेळ व वय लिहून कळवावे. विशेष खुलासा पत्रद्वारें उत्तरास ८- आण्याचे तिकिट पाठवावे.

ज्यो. डि. टि. मायधनी
म्या. ज्योतिषकार्यालय. चांदवडकर
पेठ— नाशिक

नो० नं० ७३

---

## नोटीस

नोटीस बेशमी महमद हाशम वा। शेखमनु जहागिरदार हल्लीं मु० कुरणखेड ता० आकोला

यांसः—

मी खालीं सही करणार नोटीस देतो मी तुह्मास कचेरी वगैरेचे कामाकरितां दोन वर्षापूर्वीं ५ पांच रुपयांचे कागदावर कुलमुखत्यारपत्र नोंदून दिले होते. ते तुह्मी अलीकडे आमचे काम बरोबर करीत नसल्यानें ते आज तारखेपासून रद्द केलें आहे. आतां वरील मुखत्यारपत्रान्वये तुह्मी आमचे कोणतेंच काम करूं नये. केल्यास त्या बद्दल तुह्मी खास जबाबदार व्हाल कळावे. तारीख ४-७-१९१७ इ.

सही
खाजा निजामुद्दीन जहागीरदार
सांजापूर व शेकापूर ता. आकोला पो० कुरणखेड द. खु

नो. नं. २९१

---

## नोटीस,

नोटीस बेशमी सितऱ्या वा। सत्या महार राहणार असेगांव तालुका आकोट

यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचा भाऊ सथमोल मयत याजला तुमची कन्या दिली होती तिचे अंगावरचे दागीनें तुह्मी मला दिले व पावतीही मी करून दिली परंतु पितांबर व चोळी अजमास किंमत ४० चाळीसचा व सिनगारी एक रुपये १५ पंधराची ते आठ दिवसांत आणून देऊं असें कबूल मंडळींत केलें त्यास एक महिना होऊन गेला आणून दिले नाहीं ह्मणून नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आणून देणें असें न केल्यास कोर्टांत फिर्याद केली जाईल कळावे ता० २७-६-१७ इ.

दस्तुर जानसा श्रावणसा सोनार वडाळी
दस्तुर खुद्द

सही
मेशा वा। दत्तु महार राहणार
वडाळी नि० आंगठा असे

नो. नं. २९२

---

## नोटीस.

नोटिस बेसमी बालूजी वा। भगवान तेली चोपडे रा. पो. कुरणखेड व चंद्रभागा मर्द नथुजी तेली सोनटके रा. भोनगांव

यांसीः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझे मुलाची लग्नाची बायको असून माझा मुलगा मरण पावला. तूं अज्ञान होती तूं आपले आईबाप जवळच राहात होतीस. तुझे अंगावर लग्न समयीं जे दागिने आह्मी तुझे अंगावर घातले ते तुह्मी सज्ञान होईपर्यंत परत दिले नाहीं. नंतर आपण गंधर्वाचा नवरा करून गेल्या. तरी आमचे दागिने खाली लिहिले प्रमाणें परत दिले नाहींत.

दागिने चांदीचे तपशिलवार

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गुंडवाळी जोड | १ | वजन | तोळे | ३२ |
| सरी | १ | वजन | तोळे | १२ |
| पाटली जोड | १ | वजन | तोळे | १० |
| दंडवाळी जोड | १ | वजन | तोळे | १५ |
| | | | | ६९ |

दागिने सोन्याचे तपशिलवार

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बाळी नग | ६ | वजन | तोळा | १ |
| पाटली जोड | १ | वजन | तोळा | ५ |
| तोंगल नग | २ | वजन | तोळा | ८०॥ |
| नथ | १ | वजन | तोळा | ८।१ चारमासे |
| | | | | ६॥।१ |

येणें प्रमाणें दागिने तुमचेजवळ आहेत. ते नोटिस पावल्यापासून ८ आठ दिवसाचे आंत आमचे दागिने वर लिहिलेप्रमाणें परत देऊन आमचे हातची पावती घेऊन जावी. असें न केल्यास रीतीप्रमाणें कायदेशीर दावा करून कोर्ट खर्च व नोटिशीचा रजिष्टर खर्चासुद्धां तुमचेपासून भरून घेतले जाईल. करितां नोटिशीनें कळविले सही ता. २८-६-१७ इ. द. फकीरजी मुरारजी सुतार रा. आकोला.

सही
१ गोविंदा रामजी तेली रा. आकोला
नि. आंगठा द. फ. मु. सुतार

नो. नं. २९३

---

## नोटीस

बेशमी बापु वा। मारोती हटकर लकडे राहणार कांबळेश्वर भिष्माचें ता० फलटण जिल्हे सातारा

यांसीः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न होऊन अंदाजा १६ वर्षें झाली व सहा सात वर्षांपासून तुमचे माझे बनत नाहीं. तीन वर्षांपासून मी लोकांचे कर्ज काढून उदरनिर्वाह करीत आहे हल्लीं कोणी कर्ज देत नाहीं. व तुह्मी दुसरी बायको केली तरी मी नांदण्यास व तुमचा संसार करण्यास खुषी आहे तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मला झालेले कर्ज रुपये २५० अडिचशें देऊन घेऊन जाणें. या प्रमाणें तुमचे कडून न झाल्यास मी हीच फारकत समजून दुसरा नवरा करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुमचेवर आहे. कळावें ता. ३ महे जुलै सन १९१७ इसवी

द. कृष्णराव व्यंकटराव नाईक रा० कारंजा

सही

नि० आंगठा अंजी मर्द बापु हटकर रा० शाहा पो. लाडाचे कारंजा ता० मुर्तिजापूर जिल्हे आकोला इचा असे द. कृष्णराव

नो. नं. २९४

## नोटीस.

नोटीस बेशमी राजी मर्द अमृता जाठ रा० कोरवाडी ता० जिंतूर जि० परभणी.

खालील सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची नं. २४७ ची नोटीस पावली. त्यांस उत्तर येणेंप्रमाणें—

मी बरेच वेळां आपले बापाचे घरीं नेण्यास आलों परंतु तुझा आजा तुला न धाडतां उलट मला मारहाण करूं लागला. माझी दुसरी बायको मरण पावली आहे आतां मी तुला अजून ही वागविण्यास तयार. आहे लग्नाचें वेळेस सरासरी १२९ रुपयांचे डागिने तुजवर आहेत. त्याचा संबंध न दाखवितां उलट कर्ज झाले असे सांगतेस परंतु मी कशा संबंधीं मी जबाबदार नाहीं. पंचासमक्ष तूं माझें येथें राहा. मी नांदविण्यास तयार आहे. इतके करून तूं आपले इच्छिनें वर्तन करशील तर फौजदारी गुन्ह्यास तूं व तुझा पुढें होणारा घरठावी नवरा हे उभयतां पात्र होतील. कळावें तारीख २९।६।१७ इसवी

सही

अमृता वल्लद हिरासिंग जाठ रा० सिवणी नि० रेघ

नो० नं० २९५

## नोटीस.

गोविंदा काशीराम पाटील उमर ३० धरणगांवकर रा० दुधलगांव ता० मलकापूर जिल्हा बुलडाणा यांस

शेंवती मर्द गोविंदा धंदा घरकामाचा उमर २० रा० दाताळे ता. मलकापूर हिजकडून

नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी आज आठ वर्षे झाली मला नांदवीत नाहीं व माझे अन्नवस्त्राचे बाबतींत कांहींएक गोष्ट काढीत नाहींत. माझा बाप तोताराम याजला माझे अन्नवस्त्रा प्रित्यर्थ निदान आतां पर्यंत एकूण खर्च रु सात आठशे आलेला आहे तरी ही नोटीस पावतांच सदर्हु देण्याची काहीं तरी व्यवस्था करावी व शिवाय एकतर मला नांदण्यास घेउन जावे नाहींतर दरसाल रु. ८४ प्रमाणें माझे पदरांत टाकावे. अगर येणेंप्रमाणें पुढील खर्च द्याव याचा नसल्यास काडी मोडून द्यावी. कळावें ही नोटीस दिली तारीख २६-६-१७

सही

सेवंती मर्द गोविंदा सही करणार तोताराम वा पुंजाजी सुर्पे द. खु

नो. नं. २९६

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं मौजे हिंगण ता. अकोला येथील शेत सर्वे नंबर ५५ पोट हिस्सा नंबर १ एकर १९४१५ हें शेत खालीं सही करणार इच्या पैशानें तिचा मुलगा नमे रामचंद्र वल्लद परशराम यानें विकत घेतले होते व वास्तविक मालकी खालीं सही करणार इचीच होती. सदर्हु रामचंद्र हा हल्लीं मयत असून त्याची विधवा ह्मणजे खालीं सही करणार इची सून नामे मन्नाबाई ही या शेतावर मालकी दाखवीत आहे. वस्तुतः मन्नांबाई मजकूर इचा या शेतावर कांहींच हक्क नाहीं. इजला खाणे पिणे इत्यादिक देण्यास खालीं सही करणार देण्यास तयार आहे. मन्नाबाई मजकूर ही कांहीं आपमतलबी लोकांच्या मादी लागून सदरहु शेताची अफरातफर निष्कारण करून या इस्टेटीची नासधूस करणार आहे. तरी हे शेत खालीं सही करणार इच्या सहीवाचून कोणी खरेदी, गाहाण, बक्षीस किंवा पट्यानें घेतल्यास, सदर्हु व्यवहार बातल होईल व असा व्यवहार करणारावर खालीं सही करणार कोर्टमार्फत व कायदेशीर इलाज करील. ता. ६ जूलै १९१७

सही

गोपाबाई मर्द परशराम जिनगर निशाणी खुद्द

नो. नं. २९७

## जाहिर नोटीस

फातमाबी मर्द शेक करीम बकरकसाब पापा मर्द शेकमदार, खेरू वा शेक मदार शकूर मर्द शेकमदार सर्व राहणार आकोट येथें कांगर पुऱ्यांत

यांसः—

खालीं सही करणार याजकडून या जाहिर नोटिसीनें कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नामे रोशन यास तुमची मुलगी हुराबी ईस देण्याचे कबुल करून रुसुमवगैरे सर्व झाला. या कार्यास माझे एकंदर शंभर रुपये खर्च झाले व शंभर १०० रुपये तुह्मी मुलीचे घेतले. हा सर्व व्यवहार झाल्यावर आह्मी अजमास पंधरा दिवसापूर्वी लग्नाची तारीख मुकरर करण्याकरितां चार जातवाले समागमे घेऊन अलो त्यावेळेस तुह्मी चार जातवाल्या समोर आह्मी तुह्मास आमची मुलगी देत नाहीं तुह्मी जातीचे हीन आहात याप्रमाणें आमची बेआबरु करून वापस केले तर तुह्मास कळवितो कीं तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आत जातीचे चार पंच जमा करून आह्मास हीन जातीचे ठरऊन द्यावे. याप्रमाणें न केल्यास आह्मी तुह्मी चौवावर आबरु नुकसानी बद्दल इं. पी. कोड कलम ५०० आन्वयें फौजदारींत फिर्याद करु व खर्चाचे रुपये १०० व तुह्मी घेतलेले रुपये १०० असे रुपये २०० दोनशे नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आह्मास देऊन आमची पावती घ्यावी. तसे न केल्यास या नोटिशीचे खर्चासुद्धां व कोर्ट खर्चासुद्धां तुमचेपासून, दिवाणी कोर्टमार्फत वसुल करूं हा निकाल होईपावेतो आपल्या शास्त्राप्रमाणें तुह्मास मुलीची कोणत्याही प्रकारें दुसरी व्यवस्था करितां येत नाहीं ही नोटीस दिली सही या पूर्वीं पोष्ट मार्फत नोटीस दिली ती तुह्मी वापस केली. मुक्काम आकोला तारीख २-७-१९१७

सही

शेक आबदुला वा शेक रमज्यानी बकरकसाई राहणार खामगांव मच्छीबाजार निशाणी खुद

नो. नं. २९८

वऱ्हाडसमाचार

आषाढ वद्य ५ पिंगल संवत्सर १८३९

## युद्धानंतरचें व्यापारी धोरण.

ब्रिटिश साम्राज्यानें आपणांत अंतर्भूत असलेल्या वसाहती व हिंदुस्थानासारखे परावलंबी देश यांच्याशीं कोणत्या प्रकारचा राजकीय संबंध ठेवायचा, व सध्याच्या राजकीय धोरणांत व पद्धतींत कोणते फेरफार करावयाचे या संबंधानें सर्वत्र मोठी खळबळ उडून राहिली आहे, व हिंदुस्थानांत या प्रश्नावरून सरकारी अमलदार व रयत यांच्यामध्यें कित्येक ठिकाणीं थोडेंसें घर्षण ही घडलेलें आहे. पण याच्याच सारखा महत्त्वाचा दुसरा ही एक प्रश्न आहे व त्याचा संबंध नुसता ब्रिटिश साम्राज्य व त्याचे अवयव किंवा घटक यांच्याशींच येत नसून जगांतल्या इतर राष्ट्रांशीं ही येत असल्यानें याचे परिणाम फार दूरवर्ती आहेत, अर्थात् या प्रश्नाचा विचार युद्धसमाप्तीनंतर आयते वेळीं करूं असें ह्मटल्यानें चालणार नाहीं. या प्रश्नाचा खल पूर्वी पारिस एकॉनॉमिक कान्फरन्समध्यें एकदां झालेला आहे, पण या कॉन्फरन्सनें देखील या प्रश्नाचा विचार दूरदृष्टि ठेवून व भावी परिणाम लक्षांत घेऊन शांतपणानें केलेला आहे असें त्या कॉन्फरन्सनें केलेल्या ठरावांवरून दिसत नाहीं. सध्या चाललेला युद्धामुळें शत्रुराष्ट्राविषयींचा तीव्र कोप शांतपणानें विचार करूं देण्यास मोठाच प्रतिबंध करीत आहे ही गोष्ट खरी असली तरी अमेरिकेसारख्या तिऱ्हाईत राष्ट्रानें त्या कोपाच्या आवेशांत ब्रिटनच्या हातून होत असलेला अविचार नजरेस आणून दिल्यावर तरी ती चूक सुधारणें त्या राष्ट्राचें कर्तव्य आहे. ही चूक ब्रिटिश मुत्सद्यांना हळूं हळूं कळूं लागल्याचीं चिन्हें दिसत आहेत ही समाधानाची गोष्ट ह्मटली पाहिजे. जर्मन मालावर बहिष्कार घालतां आला तर तो हवाच आहे. पण ही गोष्ट शक्य व ब्रिटिश साम्राज्याच्या फायद्याची आहे काय याचा ही त्याच्या बरोबर विचार करावयास पाहिजे. ज्या जर्मन मालावांचून आपल्या औद्योगिक प्रगतीचें अडणार नाहीं तेवढ्या मालापुरता त्यावर बहिष्कार घालणें हा शहाणपणा ह्मणतां येईल. पण जेथें त्यावांचून आपली औद्योगिक प्रगति अडेल (व असे जर्मनींत होणारे पदार्थ पुष्कळ आहेत) त्या पदार्थावर बहिष्कार घालणें हें आत्मघाताचें कृत्य होईल. व्यापारी धोरणा संबंधाचा दुसरा महत्त्वाचा प्रश्न ह्मणजे ब्रिटिश साम्राज्याच्या निरनिराळ्या घटकांचा परस्पर संबंध हा आहे. प्रत्येक घटकाला आपापल्या राष्ट्रीय हिताच्या धोरणावर स्वतःची औद्योगिक उन्नति करून घेण्यास मुभा असावी व त्याच्या आड इतर घटकांनीं येऊं नये असें एकमतानें ठरलें तर त्यांत कोणालाच विषाद वाटण्याचें कारण नाहीं. पण हें धोरण ठरविण्यास प्रत्येक घटक पूर्णपणें मुखत्यार असला पाहिजे. हिंदुस्थानचें व्यापारी धोरण ठरविण्याचा अधिकार त्यांकेशायरमधल्या कारखानदाराच्या हातीं असणें हें मात्र अतिशय हानिकारक व अपमानास्पद ही होईल. हा अधिकार ज्याचा त्याचे हातीं असल्यावर कोणालाच तक्रारीला जागा राहणार नाहीं. ज्यानें त्यानें इत्तर घटकाशीं सलोखा ठेवून व जशास तसें या न्यायानें वागून आपापल्या हितास जपावें असें सार्वत्रिक धोरण ठरल्यास तें हिंदुस्थानाला ही मान्य होईल. हिंदुस्थानाच्या भावी व्यापारी धोरणासंबंधानें बंगालच्या चेंबर ऑफ कॉमर्सनें सरकारला कांहीं उपयुक्त सूचना केल्या आहेत. त्यांत एक सूचना अशी आहे कीं हिंदुस्थान सरकारनें निरनिराळ्या देशांत आपले कमिशनर पाठवून हिंदुस्थानचे व्यापारी दळणवळण कसें वाढवितां येईल याबद्दल त्यांचेकडून रिपोर्ट वेळोवेळीं मागवावे. या कमिशनरांत कांहीं हिंदी गृहस्थ ही असावे अशी दुरुस्ती या सूचनांत आमच्या मतें अवश्य पाहिजे आहे. ती केल्यावर बाकीच्या त्या संस्थेच्या सूचना कोणाला ही पटण्यासारख्या आहेत.

## सर जॉर्ज बर्डवुड.

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थानचा एक प्रेमळ इंग्रज मित्र मृत्यूनें हरण करून नेल्याची खबर आली आहे. सर जॉर्ज बर्डवुड हे जरी जन्मानें इंग्रज होते. तरी आचारविचार, मनाचाकल आणि अभिरुचि यांनीं पक्के हिंदी होते. यांचा जन्म बेळगांव येथें १८३२ सालीं झाला होता, व आपण हिंदी आहों ही त्यांची भावना इतकी दृढ होती कीं ती ते जन्मभर विसरले नाहींत. हिंदुस्थानचें वाङ्मय, कला, धर्म, नीतिमत्ता, लोकव्यवहार, आचारविचार इ. सर्व गोष्टींचा त्यांना फार अभिमान असे, व कोणी त्यांना नांवें ठेवलेलीं त्यांना खपत नसत. लागलींच लंडन टाइम्स सारख्या पत्रांत आपल्या सहीनें पत्र पाठवून ते त्या गोष्टीचा प्रतिकार करीत. हे मिलिटरी डॉक्टर असल्यामुळें पलटणीबरोबर हिंदुस्थानांत विशेषतः महाराष्ट्रांत पुष्कळ ठिकाणीं हिंडले होते व प्रत्येक ठिकाणीं स्थानिक घरंदाज कुटुंबांशीं त्यांचा उत्तम परिचय असे. मेडिकल कॉलेजांत प्रोफेसर, अजबखान्याचे क्युरेटर, ॲग्रिहार्टिकल्चर सोसायटीचे सेक्रेटरी, रॉयल एशिआटिक सोसायटीचे ऑनररी सेक्रेटरी, मुंबईचे शेरिफ इ. मोठमोठ्या सन्मान्य जागीं काम करीत असतां प्रत्येक वेळीं हिंदी लोकांचें हित साधण्याचा प्रसंग ते वाया जाऊं देत नसत. हे १८७७ सालीं पेनशन घेऊन विलायतेस कायमचे गेले, तथापि केवळ शरीरानेंच ते तिकडे होते. त्यांचें मन हिंदुस्थानांतच होतें. त्यांनीं हिंदुस्थानांतली

शिल्पकला वीणकाम, वगैरे अनेक कला व उद्योगधंदे यांवर इंग्रजींत ग्रंथ लिहिले आहेत. यांचा 'स्व' हा अलीकडे प्रसिद्ध झालेला ग्रंथ तर फारच सुंदर व वाचनीय आहे. यांच्या मृत्यूनें हिंदुस्थानला एका खऱ्यादिलाच्या, प्रेमळ, आणि प्रामाणिक मित्राचा वियोग सोसावा लागत आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

## हिंदुस्थानालाच नांवें कां ठेवतां?

हिंदुस्थानाला स्वराज्याचे अधिकार मिळण्याचे कामीं ज्या तीन मोठाल्या अडचणी लॉर्ड पेंटलांड साहेबांनीं आपल्या भाषणांत दाखविल्या आहेत, त्यांत लोकांत शिक्षणाचा अभाव हा एक आहे. हिंदुस्थानांत शिकलेले लोक थोडे असल्यामुळें स्वराज्याचे अधिकार या देशाला दिल्यास त्या अधिकाराचा लोकांचे हातून दुरुपयोग होईल अशी त्यांना व त्यांच्या सारख्या इतर अधिकाऱ्यांना भीती वाटत आहे असें दिसतें. पण हिंदुस्थानांतले लोक अज्ञानांत राहिले आहेत याचा खरोखर दोष कोणाकडे आहे? शंभर वर्षें इकडे इंग्रजी अंमल चालू असून ही शेकडा ८० लोक अद्याप अज्ञानावस्थेंत आहेत याबद्दलची लाज खुद्द सरकारलाच वाटावयास नको काय? बरें, लोक सज्ञान झाल्याखेरीज त्यांना स्वराज्याचे अधिकार देणें योग्य नाहीं हें तत्त्व एकट्या हिंदुस्थानालाच तरी कां लागूं करावें? इंग्लंडांतल्या जनतेच्याहातीं स्वराज्याचे अधिकार आज शेंदीडशें वर्षीं तरी निदान आहेत. पण तेथें तरी सगळे लोक शिक्षित आहेत काय? व ते नेहमीं आपल्या अधिकाराचा सदुपयोगच करीत आले आहेत काय? मुंबईस सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या विद्यमानें निघालेल्या इंडियन एकॉनॉमिक कार्टर्ली नामक त्रैमासिकाच्या पहिल्या अंकांत मि. क्रॉस्थवेट यांचा एक लेख आला आहे. त्या लेखांत वीस वर्षांपूर्वीं या बाबतींत इंग्लंडची कशी स्थिति होती तिचें सुंदर वर्णन आहे. त्यावरून बरीच गमतीची माहिती मिळते. मि. क्रॉस्थवेट ह्मणतात कीं २० वर्षांपूर्वीं इंग्लंडचे शेतकरी पूर्ण अज्ञानी होते व पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं मत देण्याच्या अधिकाराचा त्यांच्याहातून अज्ञानामुळें दुरुपयोग ही होत असे. आपलें ज्याच्याशीं खाजगी वैर आहे त्यानें खुल्या व्यापाराच्या तत्त्वानें चालणाऱ्या उमेदवाराला अनुकूळ मत दिलें, तर आपण त्याच्या उलट ह्मणजे टारिफ रिफार्मच्या उमेदवाराला अनुकूळ मत दिलें पाहिजे असें त्याला वाटत असे. वस्तुतः खुल्या व्यापाराचें तत्त्व ह्मणजे काय किंवा टारिफ रिफार्म कशाशीं खातात या दोन्हींच्या ज्ञानाचा त्याला गंध ही नसे. होमरूल झाल्यानें आपणास सरकारी खर्चानें जेवण मिळेल ह्मणून त्याला अनुकूळ मत दिलें पाहिजे, अशा प्रकारच्या अज्ञानजन्य समजुतीनें प्रेरित होऊन मत देण्यांत येत. हिंदुस्थानांतल्या सामान्य जनतेचें अज्ञान याच्यापेक्षां अधिक गाढ नाहीं, किंवा इंग्लंडांतले शेतकरी किंवा मजूर स्वराज्याच्या अधिकारास त्यांच्या हिंदी बंधूपेक्षां अधिक पात्र नाहींत हें यावरून उघड होतें. असें असतां इंग्रज शेतकरी आज शेंकडों वर्षें अधिकाराचा उपभोग घेत आहेत आणि हिंदुस्थानांतल्या ब्यारिस्टर, युनिव्हर्सिटीचे पदवीधर, कॉलेजांतले प्रोफेसर, किंवा कोट्याधीश व्यापारी व कारखानदार यांना सुद्धां सरकार ते अधिकार देण्यास लॉर्ड पेंटलंड सारखे अधिकारी हरकत करीत आहेत, यांतलें इंगित काय तें आह्मांस कळत नाहीं. खुद्द विलायतेंतल्या मतदारांत इतकें अज्ञान वसत असतां जर ते स्वराज्यच्या अधिकारास पात्र ठरतात, तर हिंदुस्थानच्या लोकांस अज्ञानाबद्दल नांवें ठेवण्यांत व स्वराज्याच्या हक्कांपासून त्यांना दूर ठेवण्यात कोणता शहाणपणा आहे?

---

## अविचारांत भर.

मद्रास सरकारनें अविचारानें केलेल्या कृत्यामुळें साऱ्या हिंदुस्थानभर जी अशांतता उत्पन्न झाली आहे व लोकांत आपल्या पुढाऱ्यांच्या मानहानीमुळें जी एक प्रकारची सात्विक चीड उत्पन्न झाली आहे ती कमी करण्याचा प्रयत्न करणें हें यावेळीं सरकारी अधिकाऱ्यांचें कर्तव्य आहे, पण हें कर्तव्य पूर्णपणें ओळखीत नसावेत असें कित्येक उदाहरणावरून ह्मणावें लागतें. टयुटिकोरीन येथील एका पोलीस इन्स्पेक्टरानें तेथें भरलेली विदेश प्रदर्शक सभा इंडिया डिफेन्स आक्टाचें निमित्त दाखवून उधळून लाविली आणि मागाहून चूक दिसून आल्यावर सभा भरवा पण कडक भाषण करूं नका अशी स्थानिक पुढाऱ्यांना चिठ्ठी लिहिली. अगोदर लाथ मारून मागाहून हंसत हंसत पाया पडणें उलट चीड आणण्यास मात्र कारण होतें येवढी गोष्ट अधिकाऱ्यांस कळूं नये काय? मद्रासेस गोखले हॉलमध्यें निषेधदर्शक सभा भरविण्यांत आली होती. त्यावेळीं वाजवीपेक्षां ज्यास्त लोक त्या हालांत भरून कायद्याचें उल्लंघन केलें असा आक्षेप पोलिसांनीं घेऊन ती सभा भरविणारावर म्याजिस्ट्रेट कडून नोटीस काढली आहे. मुंबईस बॉंबेक्रानिकलचे संपादक मि० हॉर्निमन, होमरूल चळवळीचे एक प्रमुख पुरस्कर्ते मि. द्वारकादास जमनादास व पुण्याचे लोकमान्य पुढारी टिळक यांना अटकेंत ठेवण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे अशी बातमी गेल्या आठवड्याच्या 'मराठा' पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. ती कोणत्या आधारानें मराठाकर्त्यांनें दिली आहे तें आह्मांस ठाऊक नाहीं, व सध्याच्या अशांततेच्या वेळीं मुंबई सरकार असें अदूरदर्शीपणाचें कृत्य करील असें आह्मांस वाटत नाहीं. ही बातमी खरी असेल तर मात्र तो मोठाच अविचार सरकारी अधिकारी करीत आहेत असें आह्मी ह्मणूं. आह्मांला उमेद आहे कीं लोकमध्यें उत्पन्न झालेल्या या खळबळींत भर पडेल असें कोणतेंही कृत्य प्रांतिक सरकार व त्यांचे लहानमोठे अधिकारी यांनीं करूं नये असा हुकुम हिंदुस्थान सरकार लवकर सोडील तर क्षुब्ध वातावरण लवकर निवळून हिंदुस्थानच्या लोकांच्या मागण्यांचा विचार करण्यास सरकारी अधिकाऱ्यांना अवश्य ती शांतता मिळेल.

---

## शेतकीचें शिक्षण.

हिंदुस्थानांतल्या शेतकीच्या शिक्षणासंबंधानें सरकारचें धोरण निश्चित करण्यासाठीं गेल्या महिन्यांत सरकारकडून सिमला येथें सरकारी अधिकारी व एक दोन लोकमान्य पुढारी यांचे संयुक्त कान्फरन्स भरविण्यांत आलें होतें, पण जॉन्सनच्या रासेलसच्या ग्रंथांत ज्या प्रमाणें वादग्रस्त गोष्टी अखेरपर्यंत वादग्रस्तच राहिल्या तशीच स्थिति जवळ जवळ या कान्फरन्सची झाली. सरकारनें अमुक गोष्टी कराव्या असें कान्फरन्सला निश्चितपणें सांगतां आलें नाहीं. प्रांतिक सरकारांनीं आपापल्या प्रांताची स्थिति पाहून कार्याची दिशा ठरवावी हेंच अखेर कान्फरन्सनें सांगितलें पण हें सांगण्यास कॉनफरन्स कशाला हवी होती? कान्फरन्सचा अगदींच उपयोग झाला नाहीं असें मात्र ह्मणता येत नाहीं. प्रत्येक प्रांतिक सरकारानें आपापल्या ताब्यांतल्या शेतकी शाळांसाठीं लायक शिक्षक तयार करण्यासाठीं ट्रेनिंग कॉलेज काढावें. शेतकी शिक्षकांना शिक्षणपद्धतीची ही माहिती असावी व हें शिक्षण त्या शिक्षकांना देण्यासाठीं स्पेशल शेतकी शाळा काढाव्या, शेतकीची हायस्कुलें काढण्याची अवश्यकता कॉन्फरन्सला विशेषशी दिसली नाहीं; तथापि नमुन्याच्या सरकारी शेतीपाशींच शेतकी शाळा काढणें सोयीचें व फायद्याचें होईल अशी कान्फरन्सनें शिफारस केली आहे. शेतकी कॉलेजें युनिव्हर्सिट्यांना जोडून असल्यानें त्यांची व्यवस्था नीट राहील असें कान्फरन्सनें ठासून सांगावयास पाहिजे होतें पण तसें झालें नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. या प्रश्नाचा निकाल तिनें प्रांतिक सरकारच्या मर्जीवरच सोंपविला. शेतकी कॉलेजें युनिव्हर्सिट्यांना जोडण्याचे संबंधांत आमच्या प्रांतांतले व इतर कांहीं प्रांतांतले अधिकारी विरुद्ध आहेत. पण त्यांच्या आक्षेपांस पुण्याचे डा. मॅन यांनीं निरुत्तर करण्यासारखें भाषण केलें व पुण्याच्या आपल्या कॉलेजांत तें कॉलेज युनिव्हर्सिटीला जोडल्यामुळें चांगले शिकलेले लोक येऊं लागले आहेत असा अनुभव सांगितला. जर शास्त्रीय पद्धतीनें शेतकी सुधारणा करणें फायद्याचें आहे अशी सरकारची खात्री आहे तर उत्तम प्रकारचें शास्त्रज्ञानाचें शिक्षण कॉलेजांत मिळालें पाहिजे व तें घेण्याची पात्रता असलेले लोक वर्गांत आले पाहिजेत व युनिव्हर्सिटीला कॉलेज जोडण्यानें जर साधत असेल तर तसें करण्याचा हट्ट सरकारी अधिकाऱ्यांनीं तरी कां धरावा तें कळत नाहीं. तसेंच शेतकीच्या प्राथमिक शाळांतलीं वाचन पुस्तकें ही निराळ्या तऱ्हेचीं पाहिजेत हें ह्मणण्यांत अर्थ नाहीं; प्राथमिक ह्मणजे लिहिण्यावाचण्याचें शिक्षण शेतकऱ्यांच्या मुलांचें निराळ्या तऱ्हेचें व इतर मुलांचे निराळ्या तऱ्हेचें असलें पाहिजे या ह्मणण्यांत आह्मांला कांहीं अर्थ दिसत नाहीं. शेतकऱ्यांच्या मुलांसाठीं ज्या कांहीं विशेष गोष्टी करणें अवश्य असतील त्या ग्राम्य प्राथमिक शाळांतून सगळ्याच विद्यार्थ्यांस ठीं ठेवण्यापासून कोणाचें नुकसान होईल असें आह्मांस वाटत नाहीं.

---

## मान कीं अधिकार?

हिंदुस्थानच्या लोकांना कोरडा मान व खरा अधिकार यांच्यातला भेद आतां कळूं लागला आहे याचें प्रत्यंतर ना मि. बसु व सर प्रभाशंकर पट्टणी यांच्या स्टेट सेक्रेटरी साहेबांच्या कौंसिलचे मेंबर ह्मणून झालेल्या नेमणुकीबद्दल हिंदी पत्रकारांनीं काढलेले उद्गारच देत आहेत. इंडिया कौंसिलमध्यें आतांपर्यंत दोनच मेंबर होते, आतां सरकारनें तीन केले आहेत, येवढ्या गोष्टीनें हर्षवश होण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या मेंबराच्या जागा ह्मणजे केवळ सन्मानाच्या आहेत त्यांनीं हिंदी प्रश्नासंबंधानें स्टेट सेक्रेटरीला नुसती सल्ला द्यावयाची असते. त्या सल्ल्याप्रमाणें स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं चाललेंच पाहिजे असें कायद्यांत कोठें सांगितलेलें नाहीं. सारांश, हिंदुस्थानांत सध्या स्वराज्याच्या प्रश्नावर कांग्रेस व मुस्लीम यांचें एक मत झाल्यामुळें लोकपक्षाला विलक्षण बळकटी आलेली पाहून त्या पक्षाच्या तोंडावर कोरड्या भाकरीचा हा एक तुकडा थोडेसें तूप चोपडून टाकिलेला आहे, पण या तुकड्याला भुलून मुख्य कार्यांत शिथिलता न येऊं देतां साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे हक्क मिळविण्याचे प्रयत्न सतत खंड पडूं न देतां चालूं ठेविले पाहिजेत, व नुसता कोरडा मान हिंदुस्थानाला नको, त्यानें त्याची क्षुधातृप्ति कधीं होणार नाहीं, खरा खरा अधिकारच त्याला पाहिजे आहे हें लोकमत सरकारला कळणें अवश्य आहे. ना. बसु व सर प्र. पट्टणी यांच्या नेमणुकीबद्दल लोकांना विशेषसा आनंद झाला नाहीं यावरून लोकमताचा वारा कोणत्या दिशेनें सध्या वाहत आहे तें सरकारास कळून चुकलेंच असेल.

---

## महायुद्धाची प्रगति.

**पश्चिम रणांगण**—लेन्स शहराच्या दक्षिण व उत्तर दिशेस निकराचे संग्राम चालू आहेत. ब्रिटिश सैनिकांनीं अनुपम शौर्य दाखवून शत्रूच्या हातून एव्हीयन व लीव्हन हीं दोन ठाणीं हस्तगत केली. जवळच असलेली ६९ नंबरची टेकडी ही ब्रिटिश सैनिकांनीं जिंकली. वरील ठिकाणें फारच महत्त्वाची आहेत. जर्मनीच्या हातून हीं ठिकाणें गेल्यापासून जर्मन सैन्यास एकसारखी माघार खावी लागत आहे. जर्मन सैन्य खुद्द लेन्स शहराच्या टप्प्यांत असल्यानें लेन्स शहराला दोन बाजूनीं ब्रिटिश सैन्याचा वेढा पडला आहे. या वेढ्यांत जर्मनांचा टिकाव लागणें शक्य नाहीं. व्हर्डूनकडे जर्मन सैन्य फ्रेंचांचा प्रतिकार करीत आहे. परंतु फ्रेंच सैन्यास अमेरिकन सैन्याची कुमक लवकरच मिळण्याचा संभव असल्यानें तिकडेही जर्मनीस मारच खावा लागेल.

इटलीचे उत्तरेस जोराच्या झटापटी चालूं आहेत. शत्रूची संख्या मोठी असल्याकारणानें इटलियन सैन्यास आपलें पाऊल थोडें मागें घ्यावें लागले. इटलियन सैन्य ॲसिआगो टेकडीच्या अग्रेस येऊन थबकलें आहे.

ग्रीस—ग्रीसमध्यें ता. २८ जून रोजीं नवीन प्रधानमंडळ स्थापिलें गेलें. त्यानंतर बर्लिन, व्हिएना, कॉन्स्टंटिनोपल व सोफीआ

येथील ग्रीक वकिलास परत बोलावण्यांत आले. तसेंच जर्मन पक्षीय चार ॲडमिरल ही आरमारांतून कमी करण्यांत आले. या वरून ग्रीस लवकरच दोस्तांच्यावतीनें लवकरच युद्धांत पडणार असा रंग दिसतो.

राशीया—राशीयांतील अंतस्थिति अद्याप समाधानकारक नाहीं. तेथें डयुमा सभा व मजूरवर्ग व सैनिक यांचे पुढारी यांमध्यें लढा उत्पन्न झाला असून डयुमा सभा बरखास्त करावी असा या पुढाऱ्यांनीं हुकूम पाळला नसल्यामुळें हा मजूरपक्ष तहाची वाटाघाट करण्याकरितां आपले पुढारी स्टॉकहोम लंडन पारिस वगैरे ठिकाणीं पाठविणार आहे. या गोंधळामुळें राशियांत असलेले ब्रिटिश लोकांचे उद्योगधंदे व कारखाने यांस धोका येण्याचा संभव असल्यामुळें ते कारखाने राशीयन सरकारनें आपल्या हुकमतींत घ्यावे अशी इंग्लंडांतील मजूरपक्षाचे पुढारी मि. हेंडरसन यांनीं विनंति केली आहे.

पाणबुड्यांचा धुमाकूळ— ब्रिटिशांचीं ३२ व फ्रांसचीं ९ जहाजें पाणबुड्यांनीं बुडविलीं. क्लेबर नांवाचें फ्रेंच क्रूझर त्यांच्याच पाण सुरुंगास लागून बुडालें. मुंबईनजिक तीस मैलांवर पी अँड ओ कंपनीची मंगोलिआ बोट पण सुरुंगास लागून बुडाली.

प्रधान मंत्री लॉईड जार्ज यांनीं ग्लासगो शहरीं भाषण केलें त्यांत त्यांनीं पाणबुड्यापासून आतिशय नुकसान होत असल्याची कबुली दिली. या पाणबोटींच्या धुमाकुळामुळें इंग्लंडांत कापसाची असलेली टंचाई जास्त भासत आहे. गिरणीवाल्यांस पुरेसा कापूस मिळत नाहीं. अन्नाचा ही दुष्काळ भासू लागला आहे. गव्हाच्या अभावीं बाजरी खावी लागल्यानें कामकऱ्यांची प्रकृति बिघडूं लागल्याचीही तक्रार लॉर्ड ऱ्होंडा यांजकडे येऊन थडकली आहे.

**किरकोळ बातम्या—** स्पेनचे राजे आल्फान्सो यांनीं एक जाहिरनामा काढून कळविलें आहे कीं, युद्धमान राष्ट्रांच्या पाणबोटी यापुढें स्पॅनिश समुद्रांत येतां कामा नयेत. आल्यास अडकवून ठेवण्यांत येतील.

युद्धकार्यास मोहिमेवर पाठविण्यासाठीं हिंदुस्थानांतील डॉक्टरांची सुटका करण्याकरितां हिंदुस्थानांतील कित्येक दवाखान्यावर डॉक्टरिणी नेमण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार चालू आहे असें ह्मणतात.

## महत्त्वाच्या बातम्या.

मद्रासच्या गोखले हालांत अटकीबद्दल निषेध प्रदर्शक सभा भरले वेळीं बाजवीपेक्षां ज्यास्त लोकांना आंत घेतल्याबद्दल तेथील पोलीसांनीं सभा भरविणारावर केलेला खटला काढून घेतला.

येत्या कांग्रेसचें अध्यक्षपद सर सुब्रह्मण्यम् आयर, मि. जिना किंवा महमदाबादचे राजेसाहेब यांना द्यावें अशा सूचना करण्यांत आल्या आहेत.

हल्लीं उत्पन्न झालेल्या नाजूक राजकीय स्थितीचा विचार करण्यासाठीं ऑल इंडिया कांग्रेस कमिटीची विशेष सभा जरूरीनें बोलवावी कीं काय याविषयीं प्रांतिक कांग्रेस कमिट्यांचे अभिप्राय विचारण्यांत आले आहेत.

सध्यां विलायतेचा प्रवास अडचणीचा झाला असल्या कारणानें मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंगडन व मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड पेंटलांड या दोघांच्या ही कारकीर्दीच्या मुदती वाढविण्यांत आल्या आहेत,

मुंबईच्या टर्फक्लबकडून काढण्यांत आलेल्या वॉरलोन लॉटरीची बक्षिसें जाहिर करण्याची तारीख २ जुलै ठरली होती, पण सर दोराब टाटा यांना जें तिकिट देण्याचें कबूल केलें होतें तें त्या क्लबनें दुसऱ्यालाच दिल्यामुळें सर टाटा यांनीं हायकोर्टाकडे तक्रार करून सदर बक्षीसें काढण्याचें काम तूर्त तहकूब ठेवण्याविषयीं हायकोर्टाकडून हुकुम मिळविल्यामुळें तें काम बंद ठेवावे लागलें.

लढाईत जखमी होऊन पंगू झालेल्या शिपायांना त्यांच्या पोटापाण्याचा धंदा शिकविण्यासाठीं मुंबई सरकारनें जें टेकनिकल इन्स्टिट्यूट काढण्याचें ठरविलें आहे त्याला महाराणी मेरी ( हिंदुस्थानच्या बादशाहीण ) यांचें नांव देण्याची परवानगी मिळाली आहे.

हिंदुस्थानांत चालणाऱ्या चलनी नोटावर बादशहा जॉर्ज यांचा मुखवटा काढलेला असावा व इतर भाषां बरोबर मराठी भाषेंत ही नोटीची किंमत शब्दांनीं व आंकड्यांनीं दाखविण्यांत यावी अशा सूचना मुंबईच्या चेंबर ऑफ कॉमर्सनें सरकारास केल्या आहे.

परलोकवासी डा. दादाभाई या नररत्नाच्या सन्मानार्थ सगळ्या हिंदुस्थाननें कोणता तरी एक दिवस निश्चित करून तो 'दादाभाई डे' ह्मणून पाळावा अशी एक सूचना करण्यांत आली आहे.

मुंबई येथें सर नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षत्वाखालीं भरलेल्या मुंबई इलाखा शिक्षणपरिषदेंत मि. दादाभाई यांच्या मृत्यूबद्दल दुःख, पोस्ट–प्राजेट शिक्षणाच्या उपक्रमाबद्दल संतोष, फेलोंच्या निवडणुकींत सुधारणा, सायन्स डिग्री, शिक्षणखात्यांत पाळण्यांत येणाऱ्या वर्णभेदाविषयीं निषेध, वैद्यकीचे प्रोफेसरीची जागा युरोपियनांबरोबर हिंदी प्रोफेसरांस ही खुल्या ठेवणें, पी ई व इंटर परीक्षांत देशी भाषा अवश्य ह्मणून व बी. ए. त वैकल्पिक ह्मणून ठेवण्याची अवश्यकता, विद्यार्थ्यांसंबंधानें सरकारनें काढलेल्या सर्क्युलराचा निषेध इ. ठराव पास झाले.

## हे कोण ढुढ्ढाचार्य?

अलीकडे महाराष्ट्र साहित्य नभोमंडळांत एक नवें नक्षत्र चमकूं लागलें आहे. प्रो. बेहेरे नांवाचे कोणी तरुण गृहस्थ प्रथम मासिक पुस्तकांतून कविता देऊं लागले. यांची कविता ह्मणजे कांहीं विशेष चटकदार असे अशांतला प्रकार नाहीं. अगदीं सामान्य प्रतीची. पण फुकटाला महाग नाहीं, ह्मणून मासिक पुस्तकाचे संपादक तिचा स्वीकार करून ती प्रसिद्ध करीत. पुढें यांच्या कवित्वाचा संचार यांच्या प्रथम पत्नी पर. लक्ष्मीबाई बेहेरे यांच्या अंगांत होऊन त्या बाईचें मराठी भाषेचें शिक्षण तिसऱ्या यत्तेपलीकडे गेलें नसतां ही त्या संस्कृतशब्दप्रचुर कविता प्रसवूं लागल्या. अशा अलौकिक बुद्धिसंपन्न स्त्रीचा चिरकाल विरह कोणाला सह्य होईल? त्यांतून प्रो. बेहेरे पडले सहृदय कवि! त्यांनीं लागलीच विरक्त होऊन पत्नीची 'स्मरणी' हातांत घेतली तिचे गुणस्मरणार्थ! पण त्या स्मरणीचा एकच मणी ओढला असेल नसेल तों स्वारीची विरक्तता पुनः संसारासक्तींत रूपांतर पावून प्रोफेसर साहेब मुंबईस घाईघाईनें चतुर्भुज झाले. येथें थोडें विषयांतर होईल खरें, पण एक गोष्ट सांगतोंच. प्रोफेसर हें नामाभिधान वर्तमानकालवाचक नसून भूतकालवाचक आहे अशी टीप वाचकांनीं लक्षांत ठेवावी. ह्मणजे रा. बेहेरे यांनीं मारिस कॉलेजांत प्रोफेसरी कांहीं थोडे दिवस करून प्रोफेसर हें पद आपल्या नांवाच्या मागें कायमचें लावून घेतलें आहे. वस्तुतः ते हल्लीं एका सरकारी हायस्कुलांत साधे शिक्षक आहेत. यांची पुढें येण्याची हौस विलक्षण आहे. वसंतव्याख्यानमाला असो, नाट्यसंमेलन असो, कोणती ही सभा असो, प्रो. बेहेरे यांचा 'बीचमें मेरा चांदभाई' आहेच. साहित्यपरिषदेच्या सेक्रेटरीचें पद मिळविण्यासाठीं यांनीं मुंबईस बरीच धडपड केली, पण ती साधली नाहीं. प्रो. पाध्ये यांच्यावर त्यांचा जो येवढा धुस्सा झाला आहे त्याचें मूळ या गोष्टींत आहे हा धुस्सा परवा त्यांनीं 'संदेश' पत्रांत 'इसपिकचा एक्का' या नांवाखालीं लिहिलेल्या लेखमालेच्या पहिल्या लेखांत प्रो. पाध्ये यांच्यावर अपशब्दांची वृष्टिकरून बराच काढून आपल्या मनाचें समाधान करून घेतलें. या मालेच्या दुसऱ्या लेखांत ते एकंदर पुणेकरावरच घसरले आहेत कारण काय? तर येवढे विद्वद्रत्न दरसाल मे महिन्यांत पुणेकरांना आपल्या भेटीचा लाभ देत असतां मठ्ठ डोक्याचे किंवा अहंमन्य पुणेकर त्यांना 'लोकमान्य पुढारी' ही पदवी देऊन डोक्यावर घेऊन नाचत नाहीत! यांना पत्ते खेळण्याचें बरेंच वेड लागलेले दिसते. यांच्या लेखमालिकेंत झब्बू हा शब्द कमींत कमी पांचशें वेळां तरी आला असेल. लेखांतले सगळे अलंकार पत्त्याच्या खेळांतले वापरले आहेत. त्यांची मुख्य तक्रार ही आहे कीं ज्याच्या अंगांत जें विशेष ज्ञान असेल तेवढ्या ज्ञानाच्या विषयापुरतें त्याला पुढारीपण द्यावें. इतर विषयांत त्याला लुडबुडू देऊं नये. हा त्यांचा नियम त्यांना स्वतःलाच लाविला तर ते बी. एस. सी व एल. टी. आहेत ह्मणून त्यांना फार तर शास्त्रीय विषय व शिक्षण या दोनच विषयांसंबंधानें बोलण्याचा किंवा लिहिण्याचा अधिकार पोंचतो. नाट्यसंमेलनांत यांना 'झब्बूपणा' मिरविण्याचा अधिकार काय? असा प्रश्न त्यांनाच विचारतां येईल. पण त्यांच्या लेखांतले एकंदर सगळेच विचार इतके अहंमन्यतेचे व टाकाऊ आहेत कीं त्यांच्या लेखमालेला आपल्या पत्राचे पंधरा सोळा कालम देणारे 'संदेश'कारच त्यांना स्टयूपिड, हणगोबा, व मत्सर प्रेरित अशी शेलकीं विशेषणें देऊन त्यांच्या लेख मालेची 'कुटाळ, खट्याळ, कुचकट,' इ० शब्दांनीं संभावना करीत आहेत. या वरून या ढुढ्ढाचार्याची वास्तविक योग्यता मुंबई पुण्याचे लोक कितीशी समजतात त्याचें अनुमान करतां येण्यासारखें आहे. नाटकांत जशीं विदूषकाचीं भाषण किंवा पंचपक्वान्नी मेजवानींत जसें तुरट, आंबट, खारट पदार्थांचें पंचामृत तशी विद्वानांच्या व्याख्यानमालांतून प्रो० बेहेरे सारख्यांचीं व्याख्यानें त्यांना करावीं लागतात. येवढ्यावरून प्रो. बेहेरे यांनीं आपलेकडे 'झब्बूपणा'चा मान घेतला तर तो त्यांचा भ्रम ह्मटला पाहिजे.

## कागदाच्या कारखान्याचा प्रश्न.

युरोप आणि अमेरिका या राष्ट्रांतले कागदाचे कारखाने व हिंदुस्थानांतले कारखाने यांच्या मधील एक महत्त्वाचा प्रश्न भेद लक्षांत ठेवण्याजोगा आहे. युरोपांत व अमेरिकेंत कागद ज्यापासून करतात तो लगदा तयार करण्याचे कारखाने स्वतंत्र असतात, व त्या पासून तो लगदा विकत आणून त्याचा कागद करण्याचें काम तेवढें कागदाच्या कारखान्याला करावें लागतें. हिंदुस्थानांत हीं दोन्ही कामें करण्याचा बोजा कागदाच्या कारखान्यावरच येऊन पडतो. हिंदुस्थानांतल्या कारखान्यांना कागद करण्यासाठीं लागणाऱ्या गवताच्या लागवडीपासून तो तयार झालेल्या कागदाचे गठ्ठे विक्रीसाठीं बाहेर पाठविण्यापर्यंत सगळीं कामें अंगावर घ्यावी लागतात. हें काम अर्थात् मोठ्या भांडवलाचे व फार मोठ्या परिश्रमाचें असल्यामुळें कागदाचे कारखाने काढण्याचें काम हिंदुस्थानांत मोठें बिकट होऊन बसलें आहे. असें असतांही हिंदुस्थानांत कांहीं कारखाने मोठ्या नेटानें काम करीत आहेत ही खरोखर मोठी भूषणास्पद गोष्ट ह्मटली पाहिजे. हिंदुस्थानाला दरसाल ७६००० टन ह्मणजे सरासरी ८ लक्ष ८० हजार पौंड किंमतीचा कागद लागतो. यांतला एक तृतीयांश कागद या देशी कारखान्यांकडून पुरविण्यांत येतो. अलीकडे जपानचा कागद मोठ्या प्रमाणावर येऊं लागला आहे अशा वेळीं युरोप व अमेरिका या राष्ट्रांतल्या प्रमाणें लगदा करण्याचे कारखाने निराळे व यापासून कागद करण्याचे कारखाने निराळे अशी श्रमाची विभागणी कारखानदारांनीं केली तर थोड्या भांडवलावर दोन्ही प्रकारचे कारखाने चांगले चालून विदेशी कागदाशीं देशी कागदाला भावांत स्पर्धा यशस्वी रीतीनें ठेवतां येईल; आणि क्रमाक्रमानें देशी कागद ज्यास्त तयार होऊन आपणांस लागणारा सगळाच कागद येथें तयार करणें शक्य होईल.

## हिंदुस्थानचे भीष्म पितामह.

मागच्या शनिवारीं संध्याकाळीं हिंदुस्थानचे भीष्मपितामह डा० दादाभाई नवरोजी यांचें देहावसान झालें ही बातमी आतां सर्वश्रुतच आहे. या थोर पुरुषाच्या चरित्राची माहिती ज्यास नाहीं असा एक ही साक्षर हिंदी माणूस सापडणार नाहीं. ह्मणून त्यांच्या चरित्रांतल्या गोष्टी न देतां त्यांतला बोधप्रद भाग तेवढा आह्मी देतों. देश हिताची कळकळ, दीर्घोद्योग, स्वार्थत्याग, आणि कसल्याही संकटास न जुमानतां सत्याग्रहानें सत्कार्य करीत राहण्याची चिकाटी हीं जर कोणत्याही एका माणसाच्या चरित्रांत एकवटलेलीं पहावयाचीं असतील तर तीं या महर्षींच्या चरित्रांतच. ज्यावेळीं या थोर

हिंदी गृहस्थानें राजकीय चळवळीला सुरुवात केली, तेव्हांच्या व आतांच्या स्थितींत जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. मार्गदर्शक ह्मणून पुढें होणारांनाच काटे मोडत असतात. तसे राजकीय सुधारणेची पताका हातीं घेऊन जेव्हां दादाभाई चळवळीचे अग्रेसर झाले, तेव्हां सरकारी अधिकारी व आंग्लो इंडियन पत्रकर्ते यांच्याकडून त्यांना मनस्वी विरोध झाला. तथापि धैर्य न सोडतां दादाभाईनीं नेटानें मार्ग काढला ह्मणूनच आज हिंदुस्थानांत येवढें शिक्षण प्रसार, सामाजिक सुधारणा, राजकीय सुधारणा वगैरे चळवळी दिसत आहेत, आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं त्यांना विरोध करणारेच आज त्यांच्या मृत्यूबद्दल दुःखप्रदर्शक संदेश पाठवीत आहेत. लोकांच्या विचारांत येवढी क्रांति त्यांनीं घडवून आणिली आणि उन्नतीची दिशा दाखविली त्या माहात्म्याची थोरवी किती गावी ! भारतभूमि दादाभाई यांच्या संबधानें नेहमीं मयूर कवीच्या शद्बांनीं असेंच ह्मणत राहील कीं

झाले बहु; आहे बहु; होतील बहु;
परंतु यासम हा।'

मि. दादाभाई सारखे उन्नतिमार्गाचे दर्शक विचार गुरु गेल्या शंभर वर्षांत हे एकटेच झाले, ह्मणून यांना सध्याच 'युगगुरु' ह्मणणें अगदीं योग्य आहे. त्यांनीं आपलें नेमित साफल्य केलें; त्यांच्या चरित्राचें कार्य संपलें, ह्मणून परमेश्वरानें त्यांना चिरकालीन विश्रांतासाठीं दिव्य लोकीं नेलें, याबद्दल दुःख न मानतां त्यांनीं दाखवून दिलेल्या मार्गानें जाऊन त्यांच्या आत्म्यास संतोष द्यावा हेंच आतां सध्याच्या व पुढील पिढीचें कर्तव्य आहे.

## सुहृत्.

**( सर बेंजामिन यांचीं मित्रकार्यें )**

चालू चेम्सफर्डशाहींत इंडियन राजकीय कार्यभूमि निव्वळ सहाराचें वाळवंटच बनत चाललें आहे. अशा आशेच्या उध्वस्त प्रदेशांत जेव्हां एखादें पेपा सरोवर लागतें तेव्हां त्या स्वच्छ जीवनाची खरी महती विशेष कळून येते. अशाच प्रकारचा गोड अनुभव सर बेंजामिन राबर्टसन गेल्या मंगवारीं व बुधवारीं आकोल्यास होते तेव्हां त्यांच्या सुखसंवादाच्या द्वारानें मर्व प्रांतिक जनतेस पोचलेला आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. त्यांनीं भेटीस आलेल्या कांहीं प्रमुख मंडळीस उद्देशून आपलें मनोगत प्रेमळपणें प्रगट केलें आणि त्याबद्दल आह्मी त्यांचे आभारी आहोत सर बेंजामिन हे आमचे मर्देद तर खरे पण त्यापेक्षां ही आह्मी त्यांस **सुहृत** या संबोधनानें अधिक ओळखूं इच्छितो. त्यांनीं स्वराज्याच्या उद्योगा संबंधानें आपली अनुकूलता दर्शविली आणि श्रीमती विदुषी बिझांटबाई आदिकरून त्रिवर्गास जी अटक करण्यांत आली आहे तिचा निषेध आकोला येथील जाहिरसभेनें केला आणि तो निषेध फार सात्विक रागाचा आहे, ह्मणून त्यांनीं आकोल्याच्या जाहीर सभेचा गौरव ही केला आहे. विदुषी बिझांटबाई या **अलौकिक** आहेत ह्मणून त्यांच्याविषयीं आदरभाव व्यक्त करून मद्रास सरकारच्या अंतस्थ अडचणी आपणास माहीत नाहींत. तेव्हां त्याबद्दल अधिक चर्चा ही करतां येत नाहीं असें सांगितलें. तथापि त्यांनीं आपल्या संभाषणांत लोकांच्या बाजूचे व सरकारच्या बाजूचे उद्गार अशा त्रयस्थ बुद्धीनें काढले कीं त्यांच्या सारखा कर्तृत्ववान् अधिकारी आमच्या अंतःकरणाला किलपा लावील तर आम्हास त्यांस आमच्या सन्मान्य पुढाऱ्यांमध्यें लेखावें लेखावें लागेल. असला तेजस्वी अधिकारी कोणत्याही परिस्थितींत असो तरी तो आपल्या अंतःकरणाचें बिंब परिस्थितीवर पाडतो आणि म्हणूनच सर बेंजामिन यांच्या दोघांच्या गर्भांत देखील आम्हांस पुष्कळसे आशेचे अंकुर वाढलेले दिसतात आणि स्वराज्याचा वृक्ष आमच्या प्रांतात चांगला फलपुष्पयुक्त होईल अशी आम्हास त्यांच्या कारकिर्दींतच उमेद वाटते.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—पुनर्वसूच्या नांवाप्रमाणें पृथ्वी हिरवीगार होऊं लागली आहे, पण आतां नवे जीवनही वरचेवर पाहिजे आणि हा योग काल पासून समीप येत चालला आहे. आरोग्याची समृद्धी आहे हाच या वर्षाकालाचा विशेष होय.

येथील रा. रा उमर हाजी करीम ऑनररी मॅजिस्ट्रेट व व्यापारी यांस त्यांच्या कच्छ कडील स्वगृहीं गेल्या शुक्रवारीं देवाज्ञा झाली हें ऐकून आमच्या शहरच्या मंडळीस त्यांचा चांगुलपणा आठवून विशेष दुःख होईल. अलीकडे वर्ष दोन वर्षांपासून क्षया मारख्या व्याधेनें त्यांचें शरीर जर्जर झालें होतें. आणि आरोग्यासाठीं ह्मणूनच ते कच्छाकडे गेले होते; पण मृत्यूपुढें मनुष्याच्या इच्छा अखेर तुच्छ ठरतात.

**बेंचमॅजिस्ट्रेट**-रा. रा. तुकाराम महादेव पाटील व पटवारी शिंगणापूर, यांस खोलापूरच्या ऑनररी बेंच मॅजिस्ट्रेटीच्या जागीं ५ वर्षाकरितां नेमिलें आहे. पंच वार्षिकी ऑनररी मॅजिस्ट्रेटी देण्याचा बूट राजश्री जठार डेप्युटि कमिशनर यांनीं सुचविला आणि तो वरिष्ठ सरकारास फार पसंत पडला आहे याचें हें पहिलें उदाहरण होय. ऑनररी मॅजिस्ट्रेटीमध्यें आणखी एक सुधारणा अशी पाहिजे कीं ५ वर्षें ही सार्वजनिक चाकरी केलेल्या जुन्या मॅजिस्ट्रेटांस निदान १०-१० वर्षांची तरी हक्काची रजा देण्यांत आली पाहिजे कांकीं ऑनररी मॅजिस्ट्रेट मुंगळ्या सरखे चिकटून असतात. ते कधीही जागा खाली करीत नाहींत असा अनुभव आहे.

आलिशान बेंजामिन राबर्टसन हे परत नागपुरास गेले, आणि त्यांच्या बरोबर वऱ्हाड संरेपर्यंत आमचे आवडते कमिशनर राजश्री स्टॅडन हे ही त्यांच्या तैनातींत होते त्यामुळें आमच्याकडील चांगल्या गोष्टींचा विशेष परिचय खात्रीनें झाला असेल.

आलिशान चीफ कमिशनर यांनीं कापशीचा तलाव, येथील रुग्णालय, जनानी शफाखाना, हायस्कूल दिवाणी न्यायालय वगैरे वगैरे सार्वजनीक संस्था पाहिल्या आणि आपल्या उदार विचारांनीं त्या त्या संस्था कशा ऊर्जित दशेस आणाव्या हा ही क्रम सांगितला. हायस्कुलांत व वकीलाच्या कोठडींत त्यांस पुष्पहार व अत्तर गुलाब हीं देण्यात येऊन सन्मान करण्यात आला. साहेब बहादुर खुल्या दिलानें सर्वांशीं संभाषण करीत होते.

## जाहीर नोटीस

कि. मु. नंबर. ११ सन १९१७
ने. तारीख २०।७।१९१७ इ.
वि० सीनीअर सबजज साहेब आकोला
यांचे कोर्टांतः—

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं अर्जदार लक्ष्मी मर्द रामचंद्र माळी अ० पा० क० तुळसाबाई मर्द दशरथ इनें मयत रामचंद्र नारायण खालोळकार याचे कर्ज वसूल करण्याकरितां वारसाचें सरटिफीकेट मिळण्याबद्दल विद्यमान कोर्टांत अर्ज केला असून त्याची तारीख २०।७।१७ नेमली आहे. तरी कोणास सदर्हू बद्दल तक्रार घेणें असल्यास वरील तारखेस कोर्टांत हजर राहावें. या प्रमाणें न केल्यास अर्जदार इचे अर्जविरुद्ध कांहीं तक्रार नाहीं असें समजून अर्ज मंजूर करण्यांत येईल. कळावे तारीख ३०।६।१७ इ.

सही
N. G. Subhedar
Senior Sub Judge
Akola

N. N.299

## नोटीस.

नोटीस वेशमी पुंनाजी वल्दर उकर्डा डोके जात म्हाळी राहणार रामटेक तालुके मुर्तिजापूर पोष्ट कुरम जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची नोटीस पावली. तुमचे नोटिशींत तुह्मी लिहिले कीं तुह्मी सोनाजी वल्दर पुंनाजी व मी असे त्रिवर्गांनीं माझी मौजे रामटेक आणि बहादरपूर येथील दोन शेतें बटाईनें केलीं. परंतु ही गोष्ट खोटी आहे. तुह्मी आणि सोनाजी दोघा जणांनीच बटाईनें घेतलीं आहेत. व माझे नांवानेंच बटाईपत्र लिहून दिलें आहे. तुमची बटाईनें शेतें वाहण्याची खुषी नसल्यास तुह्मी व सोनाजी मिळून दोघांनीं कायदेशीर बटाईचा हक्क सोडण्याचा लेख लिहून तो नोंदून मजजवळ आणून द्यावा. तसें न केल्यास व माझी शेते काळीच राहूं दिल्यास जबाबदारी तुमचेवर आहे. माझे होणारें नुकसान तुमचे दोघा जवळून कोर्टामार्फत भरून घेतलें जाईल. कळावें तारीख ७ माहे जुलै सन १९१७

सही
कर्णाजी वल्दर भगवानजी राहणार
रामटेक ता. मुर्तिजापूर निशाणी
खुद.

नो.नं. ३००

## जाहीर नोटीस

रा. रा. कृष्णराव मुकुंदराव देशमुख राहणार मुंडगांव पोष्ट मुंडगांव तालुके आकोट

यांसः—

खालीं सही करणार याजकडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुमच्या व आमच्या शराकतीमध्यें सरकी खंडी ९५॥ साडेपंचाण्णव गोपालसिंग बळेगांवकर याजपासून खरेदी केली गेली. तुह्मी मजपासून सरकीच्या नफा नुकसानी करितां दोनशे २०० रुपये नगदी डीपाझीट घेतले. सरकीची थप्पी जीनांत लाऊन ठेवली तिजवर पाटी ही तुमचे व माझे नांवची आहे. सरकीच्या थप्पीपैकीं खरेदीच्या भावानें १०॥ खंडी सरकी रु. १०४१२ आ. भावानें मी माझे डिपाझीट रकमेपैकीं शंभर १०० रुपये कापून दिले व १६ रुपये मजपासून नगदी घेतले. आणि वरील सरकीपैकीं ३० खंडी तुह्मी नेली पुढें तुमचा आमचा हिशोब येवदा येथें तारीख १६-६-१९१७ रोजीं झाला, त्यावेळेस मजपासून २० खंडी सरकी जिनांतून नेण्याबद्दल चिट्ठी घेतली, आणि बाकी शिलक राहिलेली सरकी तुमच्या हिशाची आहे ती तुह्मी घेऊन जावे, असे सांगितले व तिच्या किंमतीबद्दल मजपासून व्याजासुद्धां ५५२ रुपयाची प्रॉमेसरी नोट लिहून घेतली, आतां तुह्मी दगाबाजी करून जीनमध्यें असलेली माझे मालकीची सरकी न नेऊं देण्याची तजवीज केल्यामुळें मजला माल जिनामधून आणूं देत नाहीं, या करितां नोटिस देतो कीं, माझी लिहून घेतलेली प्रॉमेसरी नोट कायम ठेवणें असल्यास नोटिस पावल्यापासून तिन दिवसाचे आंत माल सरकीचा खंडी ४७॥ मजला मोजून द्यावा. व डिपाझीटापैकीं शिल्लक राहिलेले रुपये १०० शंभर देऊन माझी पावती घ्यावी. या प्रमाणें न केल्यास तुह्मास लिहून दिलेली प्रॉमेसरी नोट रद्द आहे. त्याच्या भरण्याचा बोजा मजवर नाहीं. व मी माझ्या धरवरीचे १००रुपयाची तुमच्यावर दिवाणींत फिर्याद करीन. व मी सरकीच्या नफ्याबद्दल बाजार भावाप्रमाणें तुमचेवर फिर्याद करीन. तुह्मी मजपासून ता. १६-६-१९१७ इ. रोजीं यवदं मुकामीं निमे सरकीचे हिशाबद्दल ५५२ पांचशें बावन रुपयाची प्रॉमेसरी नोट लिहून घेतली, त्यात तुह्मी त्या दिवशींची तारीख टाकली नाहीं. त्यावरून तुमचे मनांत खोटेपणा आहे. ही नोटिस दिली सही मु. आकोला ता. २९-६-१९१७

सही
विठू गणोबा सुतार रा. बळेगांव द. खुद
नो० नं० ३०१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीसं सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.



### जाहिरात

**मुंबई व्याकेची सेव्हिंग व्यांक.**

या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अग त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल. ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडा ४ रुप याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई व्यांक आकोला ९।१०।०९ — Lyon Scott एजंट
नो नं १

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें टिकाऊ पक्का रंग किंमत ॥।, १, १। १॥, २, २॥, ते ९ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ॥। १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।', ॥', ॥।', १, १॥, रु. प. **खडावा जोड**– शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा फुकट

**डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी**
नो. नं. ३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हा रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विक ताबडतोब दूर होतात किं रु. १॥८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 — Dadar Bombay

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुळाबाचीफुलें, बिल्वदळीं टीका, मुदी अग्रफुलें साखी व वागन्याचीं वगैरे स जातीचा माल–तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकर्णी, तारें, वाळ्या, गडवे, इत्या माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोन्याशनकचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर

### आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमर्शियल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि. मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमर्शियल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज. फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

मराठी भाषेंत अशा प्रकारचें हें पहिलेंच अपूर्व साहस !
वा. वर्गणी १२ आणे व्ही. पी. नें १४ आ.

### पूर्णानंद

**स्वस्त आणि उपयुक्त सचित्र मासिक पुस्तक.**

अत्यंत अल्प किंमतींत इतकें उपयुक्त, इतकें मनोरंजक, इतकें चित्रपूर्ण मासिक आजपर्यंत कोणीही दिलेलें नाहीं. नमुन्याचा अंक २ आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

पत्ताः—**पूर्णानंद–कार्यालय, बेळगांव,**
नो. नं. २९९

### रोल्डगोल्ड सोन्याचे

**कधींच काळे न पडणारे दागिने**

चंद्रहार किं. ४. ३–४; गोट जोडी २–२॥; पाटल्या जडी २–२॥; वज्रटीका ३–४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनी बांधलेली ४–५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. साची २–३–४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २–२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता– **मगनलाल के आणि कंपनी गिरगांव– मुंबई**
नो० नं० ९

ॐ नमः श्रीगणेशाय.

### आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुळांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास. टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगींस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

नो० नं० २२


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.


Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख १६ माहे जुलै सन १९१७ ई० [अंक २८


## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हार्मोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर—हात पेटी सिंगल रीड २० ते २९
" डबल रीड ३०-३५-४०-६०
तीनलाइनी क्याझरेल सुराची किं. रु. ९५
पाय पेटी सतक ३। ६० ते ८० रु.
" " " ३॥ ८५ ते ९९ रु.
" " " ३॥। १०४-११५ रु.
" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु.

**पत्ता—रामचंद्र वीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० ( बुलडाणा )**

नो. नं. २८४

---

अगोदर हे वाचा नंतर निराश व्हा.

## नशिबाची— परक्षा.

सवलत— पुढील पांच कामें एकावेळीं मागविणारास २॥. रुपयांत पाठवूं, किरकोळ एकेका कामास पुढील प्रमाणें फी पडेल (१) इच्छेप्रमाणें वाटेल त्या पांच प्रश्नांचे उत्तरास १। रु. (२) एक वर्षाचे वर्ष फलास १॥ रु. (३) छापील फार्मावर सर्व माहिती सह पत्रिकेस १। (४) जन्म कुंडलीवरून सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य अखेरपर्यंतची फळें लिहून पाठविण्यास १॥. रु. (५) इच्छित कार्यांत यश येऊन अनिष्ट ग्रहांची पीडा निरसन व्हावी त्या करितां एका महान सिद्ध पुरुषाचा प्रासादिक ताईतास ३। सूचना— ग्राहकांनीं वरील कामा करितां स्वजन्मकाल व प्रश्नवेळ व वय लिहून कळववे. विशेष खुलासा पत्रद्वारें उत्तरास ८– आण्याचें तिकिट पाठवावें.

**ज्यो. डि. टि. मायधनी**
**व्या. ज्योतिषकार्यालय. चांदवडकर पेठ— नाशिक**

नो० नं० ७३


# नोटीस.

**शत्रूच्या मालमत्तेच्या नोंदणीच्या नियमांबाबत.**

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं शत्रूच्या मालमत्तेच्या नोंदणीच्या नियमांअन्वयें

(१) शत्रू व शत्रूंची प्रजा आणि कंपन्या मग ते कोठेंहि राहणारे अगर व्यापार करणारे असोत, आणि

(२) शत्रूंच्या देशांतील कोणत्याहि राष्ट्राचे लोक अथवा त्यांच्या कंपन्या,

यांच्या करिता व तर्फेनें पैसे, शेअर, कर्जरोखे, इत्यादि प्रकार कोणतीहि मालमत्ता ज्याचेपाशीं असेल त्यानें 'शत्रूच्या मालमत्तेचे कस्टोडिअन' मुंबई व मध्यप्रांत यांजकडे 'कानडा बिल्डिंग्ज होम स्ट्रीट फोर्ट मुंबई' या ठिकाणीं तावडतोब तिची नोंदणी करून घेतली पाहिजे

नोंदणी विशिष्ट नमुन्यावर केली पाहिजे व हे नमुने कस्टोडिअनकडे अर्ज केल्यास मिळतील.

कोणाजवळ शत्रूची मालमत्ता असून तिजवर जर त्याचा कांहीं हक्कसंबंध पोंचत असेल तर नोंदणीचे नियमांपासून त्याची मुक्तता होणार नाहीं. परंतु त्यानें कस्टोडिअनला खऱ्या गोष्टी कळविल्या पाहिजेत. जो कोणी नोंदणी करणार नाहीं तो सहा महिन्याच्या कैदेच्या शिक्षेस अथवा एक हजार रुपये दंडास अगर दोहोंस पात्र होईल.

(सही) पी. एस्. मेलॉर,
शत्रूच्या मालमत्तेचे कस्टोडिअन
मुंबई व मध्यप्रांत.

नो. नं २८९


## काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ४८ सुर्मा ममीरा ३ तो अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १८ कागजी बदाम ४९ पौंड, सेवाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**

नो० नं० ९


## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

दिवाणी मुकदमा नंबर ४९ सन १९१७ इ. विद्यमान डिस्ट्रिक्ट जज्ज साहेब यांचे कोर्ट

मुक्काम आकोला

नांव रतनसा
बापाचें नांव रुखबसा
जात नेव्ही राहणार कारंजा
तहसील मुर्तिजापूर जिल्हा आकोला
च्या अल्पवयी गुलाबसा वा मानीकसा
उमर वर्षे १८

राहणार कारंजा ता. मुर्तिजापूर तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २८ माहे जुलै सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १६ माहे जून सन १९१७ इ. रोजीं माझ्या सहीनिशीं व कोर्टाचा शिक्का निशीं दिली

सही
W. R. Dhobley
डि. जज्ज
पश्चिम वऱ्हाड
आकोला

नो. नं. ३०२

---

## नोटीस.

वेशमी सरू मर्द चंद्रभान कुणबी रा. अडुळ बुजरुक पो. पिंपळगांव काळे ता. जळगांव जि. बुलडाणा

ईसः—

मी खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सखी भावजय असून तुझा नवरा नामे चंद्रभान वा. नरसू हा ता. १८-९-१६ ई. रोजीं मरण पावला त्यास फक्त दोन मुली आहेत. आपली इस्टेट विभक्त आहे तरी वडिलोपार्जितची असून आतां त्यावर माझाच हक्क आहे. व तुला आजपर्यंत मी पोटगी देत आलो व पुढेंही देईन व मुलींची कार्येही पण मीच करीन अशी सर्व व्यवस्था असतां व तूं फक्त अन्नवस्त्राची मालक असतां दुसऱ्याच्या फंदफितूरीनें तूं त्या जिनगीची अफरातफर करीत असल्याचे समजते. सबब या नोटिशीनें कळवितो कीं तुझ्या नवऱ्याची जिनगी ( स्थावर व जंगम ) कोणत्याही प्रकारें कोणास लिहून देण्याचा तुला अधिकार नाहीं व तूं लिहून देऊं नयेस. याउपर तूं कोणाशी त्या जिनगी बाबत कांहीं व्यवहार करशील तर त्याची जबाबदारी तुझ्या जातीवरच राहील. जिनगी कोणतेही प्रकारें जबाबदार नाहीं सबब नोटिशीनें कळविलें आहे. ही नोटीस दिली ता. ९।७।१७

सही (मोडींत)
सुखदेव वा नरसु कुणबी पाटील
द. खु. रा. अडुळ बुजरुक.

नो. नं. ३०३

---

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझी भावजय नामे सरू ही माझा भाऊ चंद्रभान याची बायको असून तो मयत झाला आहे. तिला आजपर्यंत मी खाण्यापिण्यास देत असून ती वाईट लोकांच्या नादीं लागून स्थावर जंगम जिनगीची अफरातफर करीत आहे तर या जाहिरातीनें कळवितो कीं तिच्याशी खालील जिनगीबद्दल कोणी ही कोणत्या प्रकारें व्यवहार करूं नये. केल्यास त्याची जबाबदारी इस्टेटीवर न राहतां व्यवहार करणाराच्या जातीवरच राहील सबब जाहिर केले असे.

जिनगीचें वर्णन.

| | स. नं | आ. रु. | एकर. |
|---|---|---|---|
| मौजे आडोळखुर्द शेत | ४/२ | ९८ | ४८५ |

मौजे सौंदण ,, ३३/१ यांतील १/२ हिस्सा

राहते घर धाब्याचे आडोळ बुजरुक येथील याशिवाय दागदागिने व भांडीकुंडी.

ही जाहिरात दिली ता. ९।७।१९१७

सही (मोडींत)
सखदेव वा नरसु कुणबी पाटील
द खु. रा. अडुळबुजरुक

नो. नं. ३०४

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, ता. ८-७-१७ रोजीं मी कामरगांवाहून आकोले येथें

येत असतां आगगाडींत मला झोंप लागली. माझे खिशांत रिणको सोन्या, धनु, व रामु, यांनीं मजला करून दिलेला गहाणाचा पुर्जा रजिष्टर रुपये ६०० चा होता, आकोलें येथें स्टेशनावर उतरल्यावर मजला असें आढळून आले कीं, सदर्हू पुर्जा माझे खिशांत नाहीं. तो कोठेंतरी गळून पडला असावा. मी सर्व सामान सुमान पुन्हा पाहिले परंतु पत्ता लागला नाहीं. तरी या नोटिशीनें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, सदर्हू पुर्जा कोणास सापडल्यास तो मजकडे ताबडतोब आणून द्यावा. असें कोणी केल्यास त्यांस मी आपल्या खुषीनें रुपये १० बक्षीस देईन. कळावें. ता. ९-७-१७

सही

हजारीमल हरीभगत मारवाडी रा. कामरगांव द. खुर्द

नो.नं. ३०५

## नोटिस

नोटीस बेशमी अर्जुना वा गोविंदा महार रा० कुंभी ता० मंगरूळपीर पो० आसेगांव

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मास दोष लागल्यावेळे-पासून आज पांच वर्षें झाली मी आपले बापाजवळ राहात असून कर्ज काढून व मजूरी करून उदर निर्वाह करीत आहे. आहे. दर्म्यान तुह्मी माझी खबर घेतली नाहीं तरी ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत गेल्या पांच वर्षांत मजवर झालेले कर्ज रु. ३०० देऊन जर तुह्मी जाती पंगतींत आले असाल तर मजला घेऊन जावें. असें न केल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन कळावे ता० ७।७।१९१७ इ०

सही

वालंबी मर्द अर्जुना महारीण रा० मसेला (मुद्याचे) नि०

नो. नं. ३०६ आंगठा

## नोटीस

नोटीस बेशमी बजी नवरे गणु चेडे राहणार शिवपूर तलुका आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा नवरा नामे गणू वलद चहाजी चेडे हल्लीं मयत याजला माझी आई तुळसाई मर्द रामजी मोरे राहणार शिवपूर ता० आकोट इनें ३१६ रुपये देऊन मौजे शिवपूर येथील शेत सर्वे नंबर ५७ जो त्यानें हरावांत घेतला होता तो तोंडी खरेदी घेतला. त्याबद्दल मयत गणुनें आमचे आईचे नांवें पावती दिली आहे. हें तुह्मास माहीत आहे. गणुनें त्याबद्दल माझे आईचे नांवें खरेदी-खत करून देण्याचे कबूल केलें होते ही गोष्ट तुह्मास माहीत आहे. तें खरेदी-खत माझी आई मेल्यावर तुह्मी माझी बायको मुक्ती इचें नांवें करून देण्याचे कबूल केलें आहे. परंतु तुह्मी अद्याप खरेदीखत करून देत नाहीं. तर ही नोटीस पावल्यापासून १६ दिवसांचे आंत कायदे-शीर खरेदीखत करून द्यावें. तसें न केल्यास कोर्टांत दावा आणून खरेदीखत करून घ्यावे लागेल. कळावें. ता० ७।७।१७ इ.

सही

गणपत वा रामजी मोरे राहणार शिवपूर दस्तुर खुद

नो. नं. ३०७

## नोटिशीचा जबाब

तोताराम वा तुकाराम तेली रा० मौजे साकळी बु॥

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो कीं तुझी ११-६-१७ ची नोटीस जी तूं वऱ्हाडसमाचारांतून दिली ती मला पावली. तूं आपले नोटिशींत जे दागीनें लिहीले हा मजकूर सर्व खोटा आहे. कारण मी माझ्या मुलीचें तुझ्याशी कन्यागताचे साक्षीं चार जातीवाल्यांचे समक्ष दोन्हीकडून कन्यादान लग्न करून दिले ही गोष्ट सर्व जातीवाल्यांस माहीत आहे. तथापी तूं जो मजकूर आपले नोटिशींत लिहिला आहे तो सर्व खोटा आहे. कारण ज्या वेळीं मी तुझे लग्न करून दिले त्यावेळीं फक्त मी आपले मुलीस पांच सोन्याचे मणी व एक मंगळसूत्र व एक तोळा चांदीचे जोडवे विरोया अर्पण करून कन्यादान लग्न केलें व तूं माझा जावई झाल्यामुळें मी तुला माझेच जवळचे एक कडे चांदीचे वजन तोळें ११ चें व एक मुदी चांदीची एक तोळ्याची ही तुला दिली असें असतां तूं मला खोटी नोटीस देतोस हे तुला योग्य नाहीं. मी तुला आपले मुलीची फारकत मुळींच मागत नसून माझी मुलगी तुझे घरीं तूं तिला चांगले रीतीनें नांदवावी ह्मणून चार जातीवाल्यांची तुझे चांगले वागवणूकीचें जामीन देणार असे लोक घेऊन यावे व मुलीला घेऊन जावें असें मी यापूर्वीं तुला दिलेले नोटि-शींत लिहिलें आहे यावरून तूं आपलें नोटिशींत लिहिलेला मजकूर सर्व खोटा आहे. कळावे ता० ४-७-१७ इ.

सही

रंगु मर्द आसरू तेली निशानी खुद हातची बांगडी असे

नं. नं. ३०८

## नोटीस.

नोटीस बेशमी तुळसाबाई मर्द हरी जात निरमाळी कुळवळदे रा० मौजे लोही प्रगणे व तालुका दारव्हा जिल्हा येवतमाळ

यांसः—

खालीं सही करणार यांचेकडून नोटीस करण्यांत येतें कीं मौजे लोही प्रा व ता दारव्हा येथील शेते.

| शे. स. नं. | ए. गुं. | आ. रु. | वि. किं. रु. |
|---|---|---|---|
| २१ | २६।३२ | २३ नावाईचें | ८०० |
| १४८ | ४४।२८ | ४४८ सिरसाचें | ४२६ |

या वरील दोन्ही शेताचे खाते पूर्वी हरीचे नांवानें होते. ता. ३०-६-१९१६ इ. पासून ते ता. ११-६-१९१७ इ. पावेतों दरसाल २०० रुपये प्र० ऐन घेणें ३८९॥ रुपये व्याजाबद्दल ९४॥ रुपये एकूण ४८४ रुपये तुमचे जवळून घेणें आहेत. ह्यापैकीं हरीचे हातानें किंवा तुझे हातानीं आज तारखेपावेतों आह्मांस एकही पैसा वसूल मिळाला नाहीं. आमचे ठरावाचा निकाल केल्यावांचून तुह्मी दुसरे कोणास वर लिहिले दोन्ही शेताचे गहाण, खरेदी, बक्षीस, वगैरे रजिष्टर लेख करून द्याल तर आमची तुह्मांस सक्त मनाई आहे. असे आढळल्यास हरीचे नावानें चालत आलेली स्थावर जंगम इस्टेट मुळीच जबाबदार नाहीं. व कोर्टात दावा दाखल झालेवर तुमची कोणतीही सबब ऐकली जाणार नाहीं. ही नोटीस पावले तारखेपासून आठ ८ दिवसाचें आंत रुपये ४८४ आणून देऊन आमची पावती घ्यावी दिलेल्या मुदतींत रुपयांचा निकाल न केल्यास करारनाम्यांतील मुखत्यारपत्र ठरलेले तारखेपासून दर महिन्यास दोन रुपये २ प्रा चक्रवाढ व्याज लाऊन रुपये ४२६ सव्वाचारशामध्यें सदर्हू शेत त्यांत असलेले पिकासुद्धां ताब्यांत घेऊन बाकी राहिलेली रकम कोर्ट खर्चासह इतर इष्टेटीतून भरून घेतली जाईल कळावें ता० ७-७-१९१७

सही

लक्ष्मण पांडुरंग कृष्णपक्षी रा० लोही द० खु०

नो. नं. ३०९

## पत्रव्यवहार

रा. रा. संपादक "वऱ्हाडसमाचार" यांस वि. वि. खालील चार ओळीस आपल्या पत्रीं जागा द्यावी.

दोन वर्षांपूर्वी नागपूरास आह्मी मिसेस—ॲनी बेझंटबाई यांचें स्वागत केलें होतें. त्यावेळीं त्या ब्रिटिश साम्राज्याच्या स्वतंत्र नागरीक या नात्यानें आल्या होत्या. त्याच बाईबद्दल आह्मास त्यांचें स्वातंत्र्य हिराऊन घेतल्याबद्दल दुःख प्रदर्शित करण्याचा प्रसंग आला आहे! हल्लीं जें सरकार स्वतंत्रे-करतां तीन वर्षांपासून साम्राज्यांतील बहुमोल असें जीव खर्ची घालत आहे त्याच सर-कारनें ब्रिझांटबाईस त्यांचे स्वातंत्र्य प्राप्तीचे खटपटीस अवरोध करण्या करिता त्यांची स्वतंत्रता हिराऊन घेणें हें चमत्कारिक आहे! राष्ट्राचे प्रगतींत असे आणीबाणीचे प्रसंग येणें हें कांहीं अस्वाभाविक नाहीं. 'चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे' या संतोक्ती प्रमाणें स्वराज्याची पताका फडकण्याकरितां अशा थोर विभूतीचा स्वा-त्मयज्ञ होणें सहज आहे. स्त्रीवर्गास ललामभूत, हजारोंवर्षांमागें आपले आर्यावर्तांत व इतर पाश्चात्य देशांत ही हल्लीं ज्या अलौकीक विदूषी असतील त्यासर्वांत विदूषी—योगिनी— बेझंटबाई यांचा पहिला नंबर आहे असें ह्मटलें असतां खचित अतिशयोक्ति होणार नाहीं. बेझंटबाईची योग्यता आतां सर्वांस कळून चुकली आहे. कांहीं वर्षांपूर्वी त्यांचे संबंधानें आमचेपैकीं कांहीं लोकांस जो कांहीं संशय येत असे त्याचें खरें कारण त्यांचे जातीचे कांहीं लोकांचें आमचे लोकांशीं कुटीलपणाचें वर्तन हें होय.

हिंदुस्थानांत कल्याणाच्या गोष्टी करणें अत्यंत कठीण झालें होतें. बाई जो पावेतों धार्मिक व सामाजिक गोष्टींतच मन घालीत तोंपावेतों त्यांचे जातभाई स्वस्थ होते परंतु त्यांनीं राजकीय गोष्टींत मन घातल्या बरोबर त्यांस ते कसेसेच वाटूं लागले. असो त्यांजवर हल्लीं त्यांचे वृद्धावस्थेंत जो प्रसंग आला आहे त्याबद्दल आपले सर्वांचें अंतःकरण तळमळल्याशिवाय राहणार नाहीं. बाईनीं सतत पंचवीस तीस वर्षें आर्यमातेची सेवा अनेक तऱ्हेनें केली व त्याबद्दल आह्मी त्यांच्या सर्वतऱ्हेनें उतराई आहों. आमचे हातून त्यांचे उपकार फिटणें शक्य नाहीं. धार्मीक व सामाजीक विचारांत त्यांनीं उत्क्रांति करून सोडली आहे. जसे राजकीय हक्क कायदेशीर रीतीनें मिळविण्या-बद्दल त्यांचा आग्रह आहे तोच नियम त्यांचा धार्मीक व सामाजीक बाबतींत होता. थिऑसॉफिकल सोसायटीच्या त्या अध्यक्ष आहेत व तिच्या शाखा पृथ्वीवर सर्व सुधारलेल्या देशांत आहेत. अशा दृष्टीनें त्या अत्यंत थोर मानास पात्र आहेत त्यांनीं हिंदुस्थानांत पाय ठेवल्यापासून किती काम केलें हें सांगणें कठीण आहे. 'वर्णन करितां शेष भागला' असेंच ह्मणावें लागेल. 'बाई या मूर्तिमंत सेवाधर्माचे प्रतिक आहेत' त्यांनीं हिंदुस्थानांत आल्यापासून जीं मोठमोठीं कामें केलीं त्यांत बाल बालिकांचें शिक्षण हें एक होय. हिंदु युनिव्हर्सिटीच्या खऱ्या उत्पादक त्याच आहेत. त्यांनीं थिऑसॉफिक-ल ट्रस्टची स्थापना केली असून त्यांचे चालकत्वाखालीं खालीं लिहिलेलीं विद्यार्थीयालयें व शाळा आहेतः—

| | | |
|---|---|---|
| मदनापल्ली— कॉलेज— | विद्यार्थी | ९८ |
| " | हायस्कूल | ४३४ |
| बनारस—मुलींचे कॉलेज | | |
| " — " हायस्कूल | | |
| " मुलांचे " | विद्यार्थी | १९२ |
| कानपूर—हायस्कूल | " | २४६ |
| प्रोद्दुटूर (मद्रास) " | " | ३१४ |
| भावनगर—सनातन धर्म हायस्कूल | " | ५८६ |
| बांकीपूर— " | " | ४८४ |
| पालनी (मद्रास) | " | १२६ |
| मदूरा मुलींची शाळा | " | २९० |
| कुंभकाणम्—सरस्वती पाठशाला | | १३६ |
| गोरखपूर—कन्या पाठशाला | | |
| वयलपद—(मद्रास) सेकंडरी मुलींची शाळा, हायस्कूल | | १७३ |
| कोइमतूर (मद्रास) कन्या पाठशाला | | २४२ |
| बेल्लारी—संस्कृत पाठशाला | | ३१ |
| आर्कॉट पंचमास्कूर (कनिष्ठजाती)-करता—मुली— | | २६ |
| मुलें— | | ७३ |
| मदनापल्ली " | मुली | १ |
| | मुलें | १६ |

वरील माहितीवरून दिसून येईल कीं त्यांचे तत्वांत दोन कॉलेजें व शाळा हायस्कूल व दुय्यम प्रतीच्या शाळा आहेत. सेंट्रल हिंदु कॉलेजला त्यांजकडून प्रत्यक्ष त्यांचे खाजगी उत्पन्नांतून पन्नास हजार रुपये पोचल्याचे बाबू भगवानदास यांनीं लिहिलें होतें. वर लिहिल्या शाळा शिवाय अनेक शिक्षण संस्थांशीं त्यांचा हिंदुस्थानांत व बाहेर संबंध आहे. त्यांचे अनेक श्रीमान अनुयायी हजारो रुपयांचे धर्म त्यांचे हातून करवीत. त्यांचे कडून शेकडो विद्यार्थ्यांनीस शिक्षणा-करितां मदत मिळत होती. परंतु आतां ती सर्व बंद झाली आहे व तिचें सर्व श्रेय

मद्रास सरकारानें घेतलें आहे, त्यांनीं 'होमरूल' अथवा 'स्वराज्य'चा धर्मध्वज उभारला आहे. त्यांचें तोंड व लेखणी बंद केली तरी त्यांनीं आज पावेतों कंठरवानें जो उपदेश केला व अगदीं अखेरीस त्यांनीं सर्व बंधु भगीनींस जो निरोप दिला आहे तो आपण अहोरात्र लक्षांत ठेऊन त्या प्रमाणें वागलें पाहिजे. जिनें मानलेल्या मातृभूमीचे मुक्तते करतां आपल्या सर्व सौख्याची आहुती दिली तिची धन्य आहे. तिला सर्व शक्तिमान परमेश्वर दीर्घायुष्य व आरोग्य देऊन आमचे मध्यें अह्मांस मार्ग दाखविण्यास आणो.

भारत कन्या.

वऱ्हाडसमाचार

आषाढ वद्य १३ पिंगल संवत्सर १८३९

## आशेचा किरण.

प्रस्तुत युद्धांत हिंदुस्थानानें ब्रिटिशसाम्राज्याची जी निरपेक्ष सेवा केली, तिचा परिणाम ब्रिटिश जनतेच्या मनावर उत्कृष्ट प्रकारचा होऊन ब्रिटिश लोकांचा हिंदुस्थानाविषयींचा दृष्टिकोन बदलत चालला अहे व हल्लीं हिंदुस्थानांतल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं जरी दडपशाहीला सुरुवात केलेली असली तरी हिंदुस्थानच्या लोकांविषयीं आतांपर्यंत होत आलेल्या अन्यायाचा डाग धुऊन टाकण्याचा ब्रिटिश मुत्सद्यांचा विचार आहे या विषयींचें प्रत्यंतर लंडन टाइम्सच्या अगदीं ताज्या लेखांत पाहण्यास मिळतें. टाइम्स पत्रांतले लेख ह्मणजे बहुधा प्रधान मंडळांतल्या खलबताच्या धोरणानें लिहिलेले असतात, हें लक्षांत घेतलें ह्मणजे टाइम्स मध्यें प्रसिद्ध झालेल्या पुढील महत्त्वाच्या बातमींत बराच तथ्यांश असला पाहिजे अशी खात्री वाटते. या पत्रांत असें ह्मटलें आहे कीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत लवकरच तीन महत्त्वाच्या सुधारणा व्हावयाच्या आहेत. पहिली सुधारणा ह्मणजे लॉर्ड किचनर यांनीं हिंदी लष्कराची जी व्यवस्था ठरवून टाकिली तींत योग्य दुरुस्ती. दुसरी— हिंदुस्थानसरकारच्या हातीं असलेल्या अमर्याद अधिकाराची विभागणी करून प्रांतिक सरकारांना पुष्कळ बाबतींत मध्यवर्ती सरकारापासून स्वतंत्र राखणें; आणि तिसरी ह्मणजे हिंदी लोकांना आपल्या देशाच्या राज्यकारभारांत अधिक भाग घेतां येईल अशी व्यवस्था करणें. या तिन्ही सुधारणा अत्यंत अवश्यक व महत्त्वाच्या आहेत; विशेषतः हिंदी जनतेच्या दृष्टीनें या शेवटल्या सुधारणेचें महत्त्व विशेष आहे हें सांगावयास नकोच. लष्करी सुधारणे संबंधानें लोकांचें कांहीं ह्मणणें नाहीं. परराष्ट्रांशीं व्यवहार व लष्करी आणि आरमार खात्याची व्यवस्था हे विषय कांग्रेस व मुस्लीम लीग यांनीं तयार केलेल्या सुधारणेच्या योजनेंतून तूर्त मुद्दाम वगळले आहेत. इतकेंच नाहीं, तर या व्यवस्थेवर कायदेकौन्सिलांतल्या मेंबरांचा ताबा तूर्त नसला तरी चालेल असें सदर योजनेंत स्पष्टपणें ह्मटलें आहे. तेव्हां या पहिल्या सुधारणेसंबंधाची सगळी जबाबदारी स्वतःवर घेऊन काय हवें तें करण्यास सरकार मुखत्यार आहे. दुसऱ्या ह्मणजे अधिकार विभागणीच्या संबंधांत कांग्रेस सारख्या प्रमुख हिंदी राजकीय संस्थेनें आपलें मत या पूर्वीच जाहिर केलें आहे. हिंदुस्थानसरकारच्या हातांत सगळे अधिकार एकवटल्यापासून सुधारणेच्या कार्यास प्रतिबंध होतो ही गोष्ट निर्विवाद आहे. प्रांतिक सरकारला बऱ्याच बाबतींत आपापल्या परिस्थिति प्रमाणें खर्च वगैरे करण्याची मुभा पाहिजे, 'देग बाई जोगवा' असें ह्मणण्याची पाळी सध्या प्रत्येक बारीक सारीक बाबतींत येत असल्यानुळें व्हावी तशी प्रगति होत नाहीं, तेव्हां अधिकार विभागणी अवश्य व्हावयास पाहिजे यांत संशय नाहीं; पण त्या बरोबरच प्रांतिक सरकारच्या कारभारावर लोकनियुक्त सभासदांचा ही कांहीं ताबा असणें अवश्य आहे, उदाहरणार्थ शिक्षणाचाच प्रश्न घ्या. प्राथमिक शाळांतलें शिक्षण अवश्यक व मोफत करण्यासाठीं म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डें यांना नवा कर बसविण्याचा अधिकार असावा ही साधी मागणी सुद्धां मुंबई सरकारला प्रथम मान्य झाली नाहीं, पण आतां सदर प्रश्नासंबंधाचें बिल आणण्यास त्या सरकारानें ना. मि. पटेल यांना परवानगी दिली आहे. प्रांतिक सरकारावर लोकनियुक्त सभासदांचा ताबा असता, तर हें बिल या पूर्वीच पास होऊन आज ती इष्ट सुधारणा अमलांत ही आली असती. तिसरी सुधारणा ह्मणजे लोकांना आपला राज्यकारभार पाहण्याची संधी प्राप्त करून देणें, अथवा अन्य शद्बांनीं थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे स्वराज्याचे अधिकार देणें. या देणगीहून लोकांना अधिक प्रिय आणि ब्रिटिश सरकारच्या थोरपणाला साजेलशी दुसरी कोणती ही देणगी नाहीं. लोकांचीं मनें अलीकडे अधिकाऱ्यांच्या दडपशाहीच्या नीतीमुळें जीं अस्वस्थ झालीं आहेत तीं स्वस्थ करण्यास या देणगी सारखा रामबाण दुसरा उपाय नाहीं. सध्या हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रकारांनीं दडपशाहीला सुरुवात झालेली दिसत असल्यामुळें लोकांच्या मनांत आपल्या भावी भाग्योदयासंबंधानें घनदाट अंधकाराची छाया पडलेली दिसत आहे; अशावेळीं लंडन टाइम्सनें प्रसिद्ध केलेल्या या सुधारणाविषयक बातमीनें आशेचा किरण या निबिड अंधकारमय प्रदेशांत प्रविष्ट केलेला पाहून कोणाला आनंद वाटणार नाहीं?

## व्यावहारिक शेतकी शिक्षण.

शेतकीच्या संबंधांत सध्याच्या युद्धानें इंग्लंडला स्वावलंबनाचा धडा चांगला शिकविला आहे. आतां विलायतेंतल्या लोकांचें व सरकारचें लक्ष इंग्लंडांतली शेती सुधारून विस्तृत करण्याकडे इतकें लागलें आहे कीं युद्धाचे खालोखाल शेती हाच विषय त्यांचें चित्त वेधीत आहे. पण त्यांना सध्या मोठी अडचण मजुरांची पडली आहे. मजुरीचे दर चौपटी पांचपटी पासून वीस पटीपर्यंत वाढले आहेत; आणि इतकी मजुरी देऊन ही पुरेसे मजूर मिळत नाहींत अशी तक्रार आहे. शेतीचें उत्पन्न न वाढविलें तर पुढें आणखी युद्ध चालू राहिल्यास इंग्लंडांत धान्याचें दुर्भिक्ष होईल ही भीती वाटूं लागल्यामुळें जेथें शिपायांची विशेषशी जरूरी नाहीं अशी रणक्षेत्राहून लष्करी शिपाई आणवून त्यांचेहातीं बंदुकीचे ऐवजीं नांगर देण्याची तजवीज चालली आहे. आतांपर्यंत २०००० शिपाई अशा रीतीनें शेतीच्या कामावर लावण्यांत आले आहेत. पण एकंदर एक लक्ष मजूर आणखी पाहिजे आहेत, ते कोठून आणावयाचे हा सध्या इंग्लंडच्या लोकांपुढें प्रश्न आहे. अशावेळीं मुंबईच्या मुंबईसमाचारपत्रानें केलेली सूचना विचार करण्यासारखी आहे असें आमचें मत आहे. ती सूचना अशी आहे कीं हिंदुस्थानांतली जुनी शेतकीची पद्धति असावी तशी फायदेकारक नाहीं. ह्मणून तिच्या जागीं नवी शास्त्रीय पद्धति सुरू करण्याची खटपट हिंदुस्थान सरकारानें आज कित्येक वर्षें चालविली आहे. पण हिंदुस्थानचे शेतकरी अडाणी असल्यामुळें त्यांचे पूर्वग्रह नष्ट होत नाहीं व शास्त्रीय कृषिपद्धतीचें पाऊल झपाट्यानें पुढें पडत नाहीं. या लोकांना शास्त्रीय शेतकीचें प्रत्यक्ष शिक्षण मिळून तिच्या पासून होणारा लाभ दृग्गोचर होईल तर या नव्या पद्धतीच्या उपयुक्ततेविषयीं त्यांची खात्री पटून ते तिचा लवकर स्वीकार करतील. ह्मणून या पत्राकाची अशी सूचना आहे कीं सरकारानें इकडले कांहीं हुषार शेतकरी आपल्या खर्चानें विलायतेस पाठवून त्यांचेकडून तिकडे शेतकीचें काम करवून घ्यावें. याच्यायोगानें इंग्लंडची मजुरांची अडचण दूर होऊन हिंदी शेतकऱ्यांना ही शास्त्रीय कृषिकर्माचें व्यावहारिक शिक्षण मिळेल व ते इकडे आल्यावर हिंदुस्थानच्या शेतकीची सुधारणा करतील. एका दगडानें दोन पक्षी मारण्याची ही युक्ति सरकारला मान्य होईल अशी आह्मांस उमेद आहे.

## हिंदु मिशनरी.

अलीकडे कित्येक दिवसांपासून मुंबईच्या वर्तमान पत्रांतून हिंदु मिशनरी संस्था स्थापन करण्यासंबंधानें चर्चा चालली आहे व गेल्या आठवड्यांत रा० गजानन भास्कर वैद्य यांच्या खटपटीनें सदर संस्था यथाविधि स्थापन झाली व या संस्थेमार्फत हिंदु-मिशनरी नांवाचें एक साप्ताहिक पत्र ही सुरू करण्यांत आलें. हिंदु धर्मात परधर्मीयांचा ही अंतर्भाव करून घेऊन हिंदु-धर्माची व्याप्ति वाढवावयाची व त्या धर्माचा प्रसार शक्य तितका करावयाचा हा या संस्थेचा उद्देश आहे. हिंदुधर्माची विशिष्ट अवश्यक तत्वें कोणतीं आहेत हा एक मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. या अनिश्चितपणाचा फायदा घेऊन रा. वैद्य व त्यांचे सहकारी मित्र त्या धर्माच्या मर्यादा जितक्या विस्तृत करतां येतील तितक्या विस्तृत करून त्यांत परधर्मीयांनाही प्रविष्ट करून घेण्यास तयार झाले आहेत. अशा रीतीनें केवळ विस्ताराकडे दृष्टि ठेवल्यास हिंदुधर्माचा विशिष्टपणा नष्ट होण्याची भीती पुष्कळांना वाटत आहे. या शिवाय या प्रयत्नांविषयीं अन्य ही कांहीं आक्षेप घेण्यांत आले आहेत. उदाहरणार्थ, परधर्मीयांना त्यांच्या त्यांच्या धर्ममताप्रमाणें अध्यात्मिक उन्नति करून घेण्याचे मार्ग खुले असतां त्यांना आपल्या संस्थेंत ओढण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे परधर्मीशीं निष्कारण अन्यायाची स्पर्धा किंवहुना द्वेष करण्यासारखें आहे; परधर्मी भिन्न आचारांचे लोक हिंदु धर्मांत प्रविष्ट झाल्यापासून हिंदुसमाजाच्या आचारांत घोटाळा व नष्टता येण्याचा संभव आहे; खुद्द हिंदु ह्मणविणारांना स्वतःच्या धर्मतत्त्वांचें ज्ञान नाहीं, मग या लोकांना दुसऱ्यांना धर्मोपदेश करून आपणांत ओढण्याचा अधिकार कसा पोंचतो, वगैरे घेण्यांत येणारे कित्येक आक्षेप विचार करण्यासारखे अहेत यांत शंका नाहीं. जर हिंदु धर्माचें कांहीं विशिष्ट स्वरूप कायम ठेवावयाचें नसेल तर मग या नव्या धर्माला 'हिंदु' हें नांव देऊन सनातन हिंदु धर्माची विटंबना करण्यापेक्षां 'सार्वजनिक धर्म' किंवा यासारखें अन्य नांव दिलेलें काय वाईट? असा ही प्रश्न रा. वैद्य यांना विचारतां येईल. हिंदुधर्माला सध्या आलेली ग्लानि दूर करण्यासाठीं येवढी खटाटोप करण्यापूर्वीं त्या ग्लानीचीं कारणें कोणतीं आहेत याची विचारपूर्वक शोध करण्याची तसदी रा. वैद्य यांनीं घेतलेली दिसत नाहीं. ती त्यांनीं घेतली असती तर त्यांना दिसून आलें असतें कीं हिंदुधर्माचें संख्येच्या दृष्टीनें जें आकुंचन होत चाललें आहे त्याला कारण ख्रिस्ती वगैरे परधर्मीय मिशनरींचे दीर्घसूत्री प्रयत्न हेच कारण नसून आमच्या लोकांची धर्माविषयींची अनास्था, शिक्षणाचा अभाव, रूढीचें प्राबल्य इ. दुसरीं कारणें पुष्कळ आहेत. यांपैकीं एक ही कारण दूर करण्याचें सामर्थ्य हिंदु मिशनरी सोसायटीच्या चालकांचे ठायीं आहे असें खुद्द रा. वैद्य यांच्यानें छातीला हात लावून सांगवेल असें आह्मांस वाटत नाहीं. आमची ही समजूत खरी असेल तर अगोदरच शेकडों संप्रदायांत विभक्त झालेल्या हिंदुसमाजाचे आणखी तुकडे पाडण्यासारख्या आत्मघातकी कृत्याचें काय प्रयोजन होतें? रा. वैद्य या प्रश्नाचें उत्तर देतील काय?

## भांडारकर रिसर्च इन्स्टिटयूट.

पुणें हीं महाराष्ट्राची राजकीय राजधानी नसली तरी बुद्धीविषयक शिक्षणाचें केंद्र ह्मणून त्यानें आपला लौकिक राखला आहे ही समाधानाची गोष्ट आहे. पुण्याइतक्या शिक्षणसंस्था साऱ्या हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठें ही नसतील. सरकारी आणि खाजगी कॉलेजें व शाळा, लायब्रऱ्या व मोफत वाचनालयें यांचें जाळें तेथें पसरलेलें आहे. व्याख्यानमाला, ज्ञानेश्वरी व गीता यांचीं प्रवचनें, धार्मिक उत्सव, वगैरे नेहमीं चाललीं असतात. रानडे एकॉनॉमिक इन्स्टिटयूट, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी, भारत-इतिहास-संशोधक मंडळ वगैरे संस्था पुण्याच्या लोकांच्या देशाभिमानाची, विद्याव्यासंगाची, व निरपेक्ष कर्मयोगाची साक्ष पटवीत आहेत. अशा संस्थांच्या संख्येंत गेल्या आठवड्यांत ना. गव्हर्नर साहेबांच्या हातून

उघडल्या गेलेल्या भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूटनें एक महत्त्वाची भर टाकलेली पाहून कोणा महाराष्ट्रीयास सकौतुक व साभिमान आनंद वाटणार नाहीं ? सर डा. भांडारकर यांनीं अर्धशतक पर्यंत संस्कृत साहित्याची केलेली अमूल्य सेवा, संस्कृत भाषेच्या अध्ययनाच्या प्रसारास केलेलें बिनमोल साह्य आणि विशेषतः पाश्चात्य पंडितांच्या पद्धतीवर संस्कृत वाङ्मयाच्या क्षेत्रांत केलेले शोध इ. गोष्टींनीं जगद्विख्यात पंडितांच्या बरोबरीनें बसण्यास हिंदी पंडित सर्वथा पात्र आहेत ही गोष्ट उत्तम रीतीनें साऱ्या जगाच्या प्रत्ययास आणून दिली हिंदी राष्ट्राच्या हिताच्या व लौकिकाच्या दृष्टीनें पाहतां या त्यांच्या सेवेमुळें सर साहेबांची गणना प्रमुख राष्ट्रीय पुरुषांत करणें अगदीं योग्य आहे. त्यांचें ऋण त्यांचें अनुकरण करून अंशतः तरी फेडण्याचें पुण्याच्या तरुण मंडळींनें मनांत आणिलें आहे ही मोठी समाधानाची गोष्ट झाली पाहिजे. सर रा. भांडारकर यांनीं घालून दिलेल्या मार्गानें प्राच्य इतिहास व तत्त्वज्ञान यांचें संशोधनाचा उद्योग या नव्या संस्थेकडून अखंड रीतीनें चालू राहील अशी आम्ही उमेद ठेवतों. सर रा. भांडारकर यांनीं आजन्म केलेला आपला अमूल्य ग्रंथांचा संग्रह या संस्थेस अर्पण करण्यांत दाखविलेलें औदार्य प्रशंसनीय आहे. प्रो० जिनसीवाल्यांचा ग्रंथ संग्रहालय रा. टिळक यांच्या संस्थेस, कै. मंडलीक यांचा फर्ग्युसन कॉलेजास, रा. हरिभाऊ आपटे यांचा न्यू पूना कॉलेजास, व डा० भांडारकर यांचा रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेस या प्रमाणें एका मागून एक थोर व्यक्ति उदारपणानें व स्वार्थत्यागपूर्वक सार्वजनिक शिक्षण संस्थास मदत करीत असल्याचीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे हिंदुस्थानच्या भाग्योदयाविषयीं निराशायुक्त अंतःकरणांतही आशेच्या किरणाचा संचार होतो. सर रामकृष्ण त्यांच्या नांवाशीं जोडलेल्या या संस्थेचा उत्कर्ष व तिच्या हातून होणारी कामगिरी पाहण्यास दीर्घ काळपर्यंत जगोत व त्यांच्या मार्गदर्शकत्वाखालीं पुण्याची तरुण व उत्साही मंडळी विद्वत्ता, पांडित्य आणि संशोधन इ. बाबतींत पुण्याच्या लौकिकांत भर टाकण्यास समर्थ होवोत असें आम्ही चिंतितों.

## इंदूर संस्थानचा राज्यकारभार.

इंदूर संस्थानांत हल्लीं मोठी गडबड सुरू आहे असें तिकडे जाऊन आलेल्या आमच्या एका प्रवासी मित्राच्या सांगण्यावरून आणि मुंबईच्या दैनिक मराठी वर्तमानपत्रावरून कळतें. श्रीमंत होळकर सरकार हे तरुण आहेत; लहानपणीं त्यांना जसे अनुभविक व मायेचे शिक्षक राज्यकारभाराचें शिक्षण देण्यास मिळावयास पाहिजे होते तसे दुर्दैवानें मिळाले नाहींत; त्यांची प्रकृति ही निकोप नाहीं व त्यामुळें राज्यकारभाराचें अतिशय जोखमीचें व जिकिरीचें काम स्वतः बारकाईनें पाहण्यास ते असमर्थ आहेत. त्यांचे मंत्रिमंडळांत ही पोक्त, अनुभविक, निःस्पृह बाण्याचे, आणि दूरदर्शी माणसें फार विरळ आहेत. तशांत त्या संस्थानांत दाक्षिणी व हिंदुस्थानी असे दोन तट असून एक पक्ष दुसऱ्याचा नायनाट करण्याची संधी वाया जाऊं देत नाहीं. श्री. महाराजांचें मन इतकें दुबळं आहे कीं राज्यकारभाराचे कामीं अवश्य लागणाऱ्या कर्तव्यनिष्ठुरतेचा त्यांच्या ठायीं जवळ जवळ अभाव आहे. अशा स्थितींत राज्यकारभाराची घडी बिघडली तर काय आश्चर्य आहे? इंदूर संस्थानांतला अधिकारी वर्ग शिरजोर झाला असल्याचा बोभाट कर्णोपकर्णी आज कित्येक वर्षे आम्ही ऐकत आहों, पण गेल्या एक दोन महिन्यांत या बोभाटाला विशेष जोर आलेला दिसतो. ज्यानें आज सोळा वर्षे मेडिकल सारख्या लोकोपयोगी खात्याचें काम नुसतें बिनबोभाटच नव्हे, तर इंग्रजी अधिकाऱ्याकडून सुद्धां प्रशंसा मिळविण्यासारख्या उत्तम रीतीनें केलें; ज्यानें राजवाड्याला आग लागली होती व बडेबडे अधिकारी एकमेकांच्या तोंडाकडे नुसतें पाहत उभे होते अशावेळीं आपला उच्च अधिकारीपणा बाजूला ठेवून पाण्याचा बंब हातीं घेऊन एखाद्या मजुरासारखें रात्रभर खपून आग विझविण्याचे कामीं तत्परता व जाज्वल्य राजनिष्ठा व नागरिकत्व इ. गुण प्रकट केले, ज्यानें अर्धरात्रीं सुद्धां आपल्या गरीब रुग्ण देशबांधवाच्या उपयोगीं पडण्याची संधी कधीं वाया घालविली नाहीं; ज्यानें राऊ येथें क्षयरोग्यांसाठीं निवासस्थान स्थापन करण्यासाठीं वर्ष सहा महिने खिसा गरम करणारी खाजगी प्राक्टिस सोडून सार्वजनिक कार्यार्थ चौपदरी हातांत धरण्यांत कमीपणा मानिला नाहीं; इतकेंच नाहीं, तर अशा रीतीनें भिक्षांदेहीवर स्थापिलेली संस्था स्वतःचे हातीं न ठेवतां उदारपणानें संस्थानाचे स्वाधीन करून ती चालविल्याबद्दलच्या श्रेयाचें उदक श्री. महाराजांचे हातावर सोडलें, अशा डॉ. तांब्यासारख्या बड्या ऑफिसराला त्यांच्या व्याख्यानाच्या वर्तमानपत्रांतल्या रिपोर्टावरून व तो रिपोर्ट खरा कीं खोटा याची पूर्ण चौकशी ही न करतां व डा. तांबे राजीनामा देत असतां ही तो न घेतां त्यांच्यावर बडतर्फीचा डाग लावण्यास जेथें मुख्य अधिकारी तयार होतात, तेथें खरोखरच कारभारांत असह्य अशी वाण असली पाहिजे अशी शंका कोणाला ही येईल. इंदुरच्या राज्यकारभाराचीं सूत्रें सर ना. चंदावरकरासारख्यांना २४ तासाच्या अवधींत सोडून मुंबईस तडकाफडकी प्रयाण करावें लागणें, यानंतर गेल्या तीन वर्षांचे राज्यकारभाराचे वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध न होणें, पेनशनास हक्क पोंचत असून ते कित्येकांस न मिळणें, व कित्येकांस पेनशनांत काढलें असून त्यांचेवर बहालमर्जी होऊन ते पुनः कामावर येणें, व सरसकट सर्वांनाच आपल्या नोकरीविषयीं अशाश्वती वाटणें, इ. शेकडों गोष्टी इंदुरसंस्थानांत कांहीं तरी मोठी गोम आहे हें दाखवीत नाहींत काय? आम्हांला इंदूरहून आलेल्या प्रवासी मित्रानें करून ठेविलेली बरीच टांचणें पाहण्यास मिळालीं आहेत त्यांवरून आम्ही तूर्त इतकेंच लिहिलें आहे व तें ही श्री महाराजांस सावध करण्याच्या सद्हेतूनें लिहित आहों. श्री. महाराजसाहेबांचें मन अत्यंत शुद्ध, सद्हेतूंनीं प्रेरित, आणि कनवाळू असल्यामुळें त्यांच्या व त्यांच्या प्रजेच्या हितास जागृत राहण्याच्या इच्छेनें सद्यःस्थितीचें हें आविष्करण आम्ही अत्यंत खेदपूर्वक केलें आहे. श्री. महाराज साहेबांचें इकडे लक्ष जाऊन त्यांनीं इष्ट ती सुधारणा घडवून आणावी येवढीच आमची त्यांना सविनय प्रार्थना आहे.

## भावी संकटाचीं पूर्वचिन्हें.

मुंबईच्या टाइम्स पत्रानें हिंदुस्थानच्या व्यापार उद्योगासंबंधानें एक पुरवणी नुकतीच प्रसिद्ध केली आहे. या पुरवणींतल्या एका लेखांत हिंदुस्थानाच्या औद्योगिक भविष्या संबंधानें कित्येक ब्रिटिश मुत्सद्यांचे विचार दिले आहेत. त्यांतलीं पुढील वाक्यें हिंदुस्थानच्या लोकांनीं विचार करण्या सारखीं आहेत. सध्यांचे स्टेटसेक्रेटरी मि. चेंबरलेन म्हणतात— आपले उद्योगधंदे वाढावे हीं हिंदुस्थानची इच्छा वाजवी आहे. पण त्याच्या बरोबर ब्रिटिश लोकांना ही त्या 'देशांतला कच्चा माल घेऊन त्याचा पक्का माल करून विकण्यास पुष्कळ जागा आहे.' म्हणजे हिंदुस्थान हें नुसत्या हिंदी लोकांकरितां नसून हिंदी व इंग्रज या दोघांनीं तेथें आपापले उद्योग चालवावे. दोघांना ही ब्रिटिश साम्राज्यांत सर्वत्र समान रीतीनें वागविण्यांत आलें असतें तर मि. चेंबरलेन यांच्या म्हणण्याप्रमाणें ब्रिटिश व्यापारीबंधूचें स्वागत हिंदुस्थानच्या लोकांनीं प्रेमानें केलें असतें; पण दक्षिण आफ्रिकेंत व कानडा येथें हिंदी लोकांना कशा रीतीनें वागविण्यांत येतें तें पहा, म्हणजे मि चेंबरलेन यांच्या वरील वाक्यांतलें खरें मर्म कळून येईल. लॉर्ड हार्डिंज लिहितात कीं हिंदुस्थानच्या गरजा भागून उरणारा कच्चा माल ब्रिटिश साम्राज्याच्या दुसऱ्या भागांस पुष्कळ पाठवितां येईल व तेथून तयार होऊन येणाऱ्या मालाला हिंदुस्थानांत गिऱ्हाईकी ही पुष्कळ मिळेल. हिंदुस्थानला कशा प्रकारचा माल पाहिजे आहे याचा शोध करण्याचे कामीं जो खर्च येईल त्याच्या शंभरपटीनें ब्रिटिश व्यापाऱ्यांचा फायदा होईल. लॉर्ड हार्डिंज यांची हिंदुस्थानाविषयींची सहानुभूति प्रसिद्धच आहे. तथापि यांच्या लेखांत हिंदुस्थानच्या औद्योगिक सुधारणेच्या उपायाविषयीं अवाक्षर नाहीं. ब्रिटिश व्यापाराचें हित ही मुख्य चिंता त्यांना लागलेली दिसते. तिसरे मुत्सद्दी लॉर्ड कर्झन घ्या. हे तर साफ म्हणतात कीं हिंदुस्थाननें फक्त कच्चा माल पुरवावा, आणि ब्रिटिश कारखानदारांनीं त्याचा पक्का माल तयार करून तो हिंदुस्थानाला पाठवावा, अर्थात मजूरी, दलाली, व नफा सगळा गोऱ्या लोकांनीं खावा. 'तूं स्वैंपाक कर' मी जेवीन' अशी ही श्रमविभागणी आहे! सर जार्ज रीड (आस्ट्रेलियाचे माजी प्रधान) म्हणतात कीं युद्धसमाप्ती नंतर ब्रिटिश व्यापाऱ्यांना आपली चंगळ चालवावयाची असेल तर हिंदुस्थानासारखी नामी जागा त्यांना जगांत दुसरी कडे आढळणार नाहीं. अगदीं खरी गोष्ट. हिंदुस्थान हें ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या व कारखानदारांच्या कळपाला चरण्याचा उत्कृष्ट कुरण आहे खरें; पण मग मधून मधून हिंदुस्थानच्या उन्नतीविषयींचा व सहानुभूतीचा उमाळा आल्याचा जो आविर्भाव ब्रिटिश मुत्सद्दी आपल्या भाषणाचे वेळीं दाखवितात, तो सगळा नाटकी समजावयाचा कीं काय?

## रशियाची हालचाल.

गेल्या आठवड्यांतल्या युद्धासंबंधाच्या मुख्य गोष्टी दोन आहेत एक रशियाची चळवळ व दुसरी शत्रूचे लंडनवर आणि फ्रान्सदेशांतल्या शहरावरचे वैमानिक हल्ले. पैकीं पहिल्या गोष्टीला अपेक्षेपलीकडे यश प्राप्त झालेलें पाहून सर्वजग चकित झालें असतील. रशियाच्या अंगचा उत्साह इतके दिवस संचित रूपानें होता तो आतां प्रकट होऊ लागला आहे. थोड्याच दिवसांत रशियानें शत्रूचीं १८००० माणसें कैद केली यावरून त्याचें महत्त्व कळणार आहे या विजयानें रशियाचा फायदा लष्करी दृष्टीनें तर झालाच; पण राजकीय दृष्टीनें ही तो होईल. रशियांत नुकत्या स्थापन झालेल्या प्रजातंत्र राज्यपद्धतीला त्यामुळें बळकटी येईल. रशियन सैन्याच्या अन्य विभागांनीं याच प्रमाणें चढाई करून जय मिळविल्यास शत्रूला ही त्याचा चांगला दरारा बसेल. शत्रूनीं ग्यालिशिया व रशिया या प्रदेशांतून आपल्या सैन्याच्या कांहीं तुकड्या काढू त्या आंग्लो फ्रेंच व इटालियन सरहद्दीवर पाठविल्या आहेत. शत्रूवर त्या भागांत हल्ला करण्यासही संधी चांगली आहे. रशियाला दारूगोळ्याची ही आतां अडचण राहिलेली नाहीं. जी थोडीशी अडचण सध्या आहे ती व्यवस्थितपणाच्या अभावाची आहे व ही अडचण राज्यक्रांतीमुळें उत्पन्न झालेली आहे. तथापि ग्यालिशियामध्यें रशियन फौजेला मिळालेल्या अपूर्व विजयानें त्या अडचणींत बरीच शिथिलता येईल, व लोकांचे उत्साहाला भरती येईल. ग्यालिशिया प्रमाणें इतर भागांतही रशियन फौजेची जय्यत तयारी असली तर रशिया खरोखर फार बहार करून सोडील. रशियन जनरल ब्रासिलॉफ हे मुलखांड नसून मुकाट्यानें काम करणारे आहेत.

## विमानी हल्ले.

गेल्या आठवड्यांत जर्मनीनें इंग्लंड व फ्रान्सवर, इंग्लंडनें जर्मनीवर, इटलीनें आस्ट्रियावर असे विमानी हल्ले पाठविल्यामुळें एकच गडबड उडून गेली होती. जर्मनीनें फ्रान्समध्यें नानशी शहरावर विमानांतून बांब टाकून कांहीं नाश केला. लंडन शहरावर जर्मन विमानांचा हल्ला दोनदां आला. पहिला हल्ला विशेषसा जोराचा नव्हता, व म्हणण्यासारखें नुकसान ही झालें नाहीं. दुसरा हल्ला अधिक जोराचा व धिटाईचा होता. जर्मन विमानें इंग्रजांच्या तोफांच्या टप्प्यांतून सुरक्षित राहण्यासाठीं उंच उडत होतीं व तेथून भराभर बांब खालीं फेकण्यांत येत होते. शेतांत पिकें चांगलीं पिकलेलीं दिसलीं म्हणजे जसे टोळाचे थवे येऊन कांहीं काळ आकाश आच्छादून टाकतात, तसें लंडनचे आकाश या विमानांनीं आच्छादून टाकिलें होतें. हा देखावा पाहण्यास इंग्लंडचे प्रधान मि. लाइड जॉर्ज, माजी प्रधान मि. अस्किथ व त्यांच्या पत्नी वगैरे बडी बडी मंडळी घराबाहेर पडली होती. रस्त्यांतून जाणें येणें धोक्याचें झालें होतें. बांब केव्हां, कोठें कोणाचे अंगावर पडेल याचा नेम नव्हता. इंग्रज विमानांनीं लवकरच त्यांची बोळवणी केली.

तथापि अल्पअवकाशांत दोनदां विमानी हल्ले लंडनवर आलेले पाहून जर्मनीनें हें कृत्य धीडखोरपणामुळें आरंभिलें असून आणखी कांहीं हल्ले येण्याचा संभव आहे असें वाटूं लागले आहे. इंग्लंडच्या विमानांनींही जर्मनीमधला एसेन येथील सुप्रसिद्ध क्रपच्या तोफा ओतण्याच्या कारखान्यावर बांब टाकून बराच नाश केल्याची खबर आहे. इटलीनें आल्दियांत विमानें पाठवून आस्ट्रियन लोकांनीं केलेल्या कांहीं लष्करी बांधकामांचा नाश केला अशी बातमी तारेनें आली आहे.

## मंगल ग्रंथी.

**( श्री टिळक यांचा ६२ वा वाढदिवस )**

गेला मंगळवार ह्मणजे आषाढ वद्य ६ हा राजश्री टिळक यांचा ६२ वा वाढदिवस होय आणि ह्मणूनच त्या मंगल दिवशीं शहरीं शहरीं जाहिरसभा भरविण्यांत आल्या आणि महाराष्ट्रांतील थोर थोर लोक त्यांच्या आरोग्य चिंतनाचे मंत्रजागर करीत होते. जणूं काय आपल्या आनंदी गणांच्या शब्दांनीं ईश प्रार्थनाच चालविली होती. अशीच एक उत्कृष्ट सभा येथील राजेश्वर मंदिरांतही भरली होती. शहरांतील निरनिराळे धंदेवाले लोक ४०० वर जमले होते. अध्यक्ष राजश्री दाते वकील होते. सर्वजण उभे राहिले व राष्ट्रीय गीत ह्मणण्यांत आलें. राजश्री आठल्ये वकील यांनीं आरोग्य चिंतनाचा ठराव मांडताना सांगितलें कीं या विभूतीनीं लोकांस स्वराज्य मागण्यास तयार केलें आहे व स्वराज्याचा मार्गही दाखवून दिला आहे. आणि या स्वराज्याशिवाय हिंदुस्थानचा तरणोपाय ही नाहीं. या गोष्टी जोरानें सांगतांना ते अगदीं प्रेमाच्या भरांत आले होते. रा. गोळे वकील यांनीं अनुमोदन देतांना आपल्या विचार स्वातंत्र्याकरितां सरकारशीं विरोध पडला तरी संमती बिलाच्या सारख्या प्रसंगीं ते कधीं डगमगले नाहींत असें सांगितलें. त्यानंतर राजश्री रामकृष्णपंत ओक यांनीं फार सुंदर भाषण केलें. त्यांच्या त्या स्वाभाविक वाणीला गोड स्पष्टोक्ती शोभा देई. लोकमान्यांचा विचार पसंत करून हिंदुस्थानाला स्वराज्य दिलें असतें, तर हें महायुद्ध इतके दिवस टिकलेंच नसतें असें सांगितलें. ३३ कोट प्रजेच्या सेने पुढें महायुद्ध तें किती टिकणार ? पण ही चूक अतांशी लक्षांत येऊं लागली आहे. राजश्री देसाई वकील यांनीं आपला वेदांत राजश्री टिळकांच्या सद्गुणकथनाकडे प्रवाहा सारखा सोडला होता. नंतर अध्यक्षांनीं समारोप करतांना आपल्या बळकट आशेची ग्रंथी उकलून सांगितलें कीं या अवतारी पुरुषाच्या मुखांतलें हें स्वराज्याचें ध्येय लवकरच सिद्धिपथांत आल्यावांचून राहणार नाहीं.

---

## दुःखाश्रु.

**( महर्षी दादाभाई यांच्या मृत्युसंबंधीं )**

मनुष्य कितीही तत्ववेत्ता असो त्याची प्रियवस्तु काळानें नेली ह्मणजे त्याच्या त्या अंतःकरणांतून दुःखाश्रु आपोआपच गळतात, आणि जेथें महर्षी दादाभाई सारखा राष्ट्राचा **कोहिनूर** हरपतो, तेव्हां तर सर्व राष्ट्राचा एक उद्धार करणारा, स्फूर्ति देणारा व स्वराज्याच्या मार्गानें नेणारा वीरपुरुष गत झाला— मग तो आपल्या ९२ वे ही वर्षी असो— ह्मणून स्वाभाविकपणेंच राष्ट्राच्या नेत्रांतून अश्रु गळू लागतील. जेव्हां सर्व राष्ट्र अशा अंतःकरणाच्या तळमळींत सांपडतें, तेव्हां परस्पर कथनानें दुःख हलकें होतें आणि त्या दुःखांच्या पृष्ठभागीं असलेला गूढ ईश्वरी सुसंकेत ही कळून येतो आणि याच दुःख विसर्जनाच्या दृष्टीनें आज गेल्या १२।१५ दिवसांत सर्व राष्ट्रभर जिकडे तिकडे मोठमोठ्या जाहीर सभा होत आहेत. आमच्या आकोल्यास ही गेल्या बुधवारीं श्री राजेश्वराच्या मंदिरांत रावसाहेब महाजनी यांच्या अध्यक्षते खालीं सभा भरवून राजश्री चिपळूणकर वकील यांनीं अस्खलित वक्तृत्वपूर्ण वाणीनें ठराव सभेपुढें आणला कीं

"आज ता. ११-७-१७ रोजीं श्री राजेश्वराचे देवालयांत भरलेल्या जाहीर सभेतील आकोला येथील नागरिक हिंदुस्थानचे परमपूज्य पितामह दादाभाई नौरोजी यांनीं लहानपणापासून हिंदुस्थान देशाच्या शिक्षण विषयक , सामाजिक, व राजकीय उन्नती प्रीत्यर्थ केलेली अविश्रांत व एकनिष्ठसेवा व त्याच प्रमाणें त्यांनीं आपल्या चोख वर्तनानें देशभक्तीचें जें अनुकरणीय उदाहरण हिंदी जनतेपुढें मांडलें आहे तें लक्षांत आणून त्यांचे निधनाबद्दल आह्मास अत्यंत दुःख झाल्याचें जाहीर करितों व काळाच्या ह्या निर्घृण घाल्यामुळें त्यांचे आप्तेष्टास झालेल्या दुःखांत आह्मीही समभागी आहों असें त्यास कळवितों"

रा. रा. लक्ष्मणराव ओक वकील, अभ्यंकर वकील व रामधन जमनादास यांनीं आपापल्यापरीनें पण उत्कृष्ट मनोवेगाच्या स्फूर्तीनें कैलासवासी दादाभाई यांच्या चरित्रामधून निरनिराळीं अमूल्य रत्नें लोकांपुढें मांडून या ठरावाचें समर्थन केलें आणि सर्व सभाजन आपला पूज्यभाव व्यक्त करण्याकरितां स्वस्थानीं उभा राहिला व तो ठराव सर्वांच्या अंतःकरणांतून मौनपणें बहिःस्फूट झाला.

---

## कालाचा तोफखाना.

**( राजश्री चेंबर्लेन यांचा राजीनामा. )**

हा काल मोठा अद्भुत आहे आणि त्याच्या त्या विक्राळ तोफखान्यांतून काय काय स्फोट निघतील तें कळणें अगम्य होय. राजश्री चेंबर्लेन स्टेट सेक्रेटरीचा राजीनामा देतात! तथापि लॉर्ड चेम्सफर्ड व त्यांचे मद्रासचे, मुंबईचे, पंजाबचे प्रतिध्वनी सारखे असणारे प्रांताधिपती यांस ही परत बोलावण्यांत येईल तर सर्व राष्ट्र प्रधान मंडळाचा कृतज्ञ होईल आणि मांप्रतच्या लढाईलही हिंदी आशीर्वचनें, पैसा व माणसें धाडण्याला चांगला जोर येईल. इंडियाला स्वराज्य लाभो ह्मणून सर्वत्रच कवि, तत्ववेत्ते, मुत्सद्दी व राष्ट्रीय साधुसंत एकच स्वराज्याचें गाणें गात आहेत तेव्हां या तोफखान्यांतून दुसरा स्फोट कोणता निघेल बरें !

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** पुनर्वसूचा चतुर्थ चरण गेल्या २ दिवसापासून जणूंकाय अमृताचाच वर्षाव करीत आहे. हा जीवनरस नव्या वनस्पतींना चांगल्या जोमांत आणील, आणि कापूस व ज्वारी हीं दोन्हीं पिकें चांगलीं लाभकारक करील. तुरळक तुरळक गांवीं प्लेग उद्भवूं पहात आहे. पण बाकी इतरत्र आरोग्याचीं सुखें लोक अनुभवीत आहेत.

**अपूर्व उत्साहः—** आकोट येथें लोकमान्यांना परमेश्वरानें उदंड आयुष्य द्यावें व त्यांच्या अंगीकृत कार्यांत यश द्यावें अशी प्रार्थना करण्याकरितां राजश्री नानासाहेब करकरे यांच्या अध्यक्षते खालीं जाहीर सभा भरून चार पांचशे लोक जमले होते बँड चौघडा वगैरे वाद्यें वाजत होतीं. राजश्री रामेकर वकील, दाणी वैद्य व रामेश्वरप्रसाद, गणपतराव देशपांडे आणि अंत्रेकर यांनीं आपल्या भाषणांनीं त्या वेळच्या आनंदाला शाब्दिक मूर्त स्वरूप दिलें होतें आकोला, यवतमाळ, खामगांव, उमरावती इत्यादि ठिकाणीं ही अशाच सभा भरल्या होत्या.

**तन्मयः—** श्रीबीझांट देवी, अरंडेल, व वाडिया यांनीं उटकामंड येथील गुलिस्तान बंगल्यासमोर ४२ फूट उंचीचा 'स्वराज्याचा' ध्वज उभारला आहे. अशीच खरी तन्मयता आमच्या येथील स्वराज्य संघाच्या मंडळींत उतरली आहे आणि १६ जूनच्या अटकेचे मासिक ह्मणून आज १६ तारखेला येथील राजेश्वर मंदिरांत जाहिर सभा भरविण्यांत येणार आहे.

**कायदेकौंसिल—** आज कायदे कौंसिलची बैठक नागपुरास होणार आहे आणि त्रैवार्षिक मुदतीचे सभासद यापुढें आपल्या जागा खालीं करतील. निवडणूकीची धामधूम मध्यप्रांतांत होईल; पण आमच्या कडे राजश्री यशवंतराव देशपांडे व तांबे हे निवडणुकीच्या बाबतींत अद्वितीयच आहेत. फक्त राजश्री मुंडले की महाजनी हा प्रश्न जिल्हा बोर्ड निश्चित करितील. हल्लींच्या स्वराज्याच्या वाङ्मयांत हीं कायदे कौंसिलें ह्मणजे बाहुल्यांचा खेळ वाटतो.

'संदेश' कार पांढरकवडा येथील राजश्री अबदुल रऊफ शहा यांच्या अध्यक्षतेखालीं अटके संबंधाच्या निषेध प्रदर्शक सभेची हकीकत देतात ती त्या स्थळाच्या मानानें मोठी जोमाची होय.

रा. रा. उमाशंकर श्रीवास्तव यांस मुनसफ नेमून उमरावतीस ठेवण्यांत आलें आहे व रा. रा. सहस्त्रबुद्धे मुनसफ उमरावती यांस एलिचपुरास बदलून एलिचपुराहून राजश्री गोपाळराव सप्रे यांस उमरावतीस मुनसफ करून त्यांच्या कोर्टाला दोन हजारापर्यंतच्या दाव्याचा अधिकार देण्यांत आला आहे.

रा. रा. हुसामुद्दीन अहमद आडिशनल ए. अ. क. यवतमाळ यांस २ रे वर्ग मॅजिस्ट्रेटचा अधिकार देण्यांत आला आहे

**दौरा—**नामदार पंडित मदन मोहन व नामदार श्रीनिवास शास्त्री हे ऑल इंडिया कॅांग्रेसच्या निमित्तानें २९ जुलैला मुंबईला जातील तेव्हां त्यांच्या पूर्वी जमल्यास त्यांच्या व्याख्यानानें आकोल्यास अधिक जागृती व अधिक जीव आणण्याचा येथील स्वराज्य संघाचा विचार आहे. प्रयत्न स्तुत्य व त्यांचें यशही सर्व लोक गातील.

रावबहादुर वासुदेव रामचंद्र ढोबळे डिस्ट्रिक्ट आणि सेशनजज हे सेशनच्या कामानिमित्त बुल्ढाण्याला गेले आहेत व तेथें सेशन अजून चालू आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार हे वाशीमास गेले असून उद्या परवा येथें परत येतील.

**प्रांतिक पतपेढ्या—**जबलपूर येथें चालू महिन्याच्या अखेरीला प्रांतिक पतपेढ्यांची सभा भरणार आहे. सभा जितक्या सरकारी पद्धतीनें होतात तितक्या त्या लोकांपासून फार दूर राहतात आणि ह्मणूनच या सतत वर्तमान रिपोर्टवाल्या सहकारी पेढ्या कागदी यशाचे घोडे नाचवितात; पण त्यांच्यामध्यें लोकांची खरी सहकारिता व अंतरंग हीं बाणलीं आहेत असें अनुभवास येत नाहीं. ह्मणून आह्मी स्वराज्यसंघाच्या सभासदांस मुद्दाम सुचवितों कीं त्यांनीं सरकारी सहकारी पेढ्यांत शरीक व्हावें ह्मणजे सरकारास आनंद होऊन खरें कार्यसाधन होईल.

**शिष्टाचार—** जेव्हां सरकारी अधिकारी जाहीर सभांचे रिपोर्ट घेण्यास जातात तेव्हां त्यांनीं सभेचे शिष्टाचार पाळण्याविषयीं बारीकसारीक ताकीद देण्यांत यावी. गेल्या ११ व्या तारखेच्या येथील जाहिरसभेंत हा आचारभंग एवढा झाला कीं ती चाकरीतील मनाची अधोगती शब्दांनीं व्यक्त न करणें बरें.

---

**हिंदी स्वराज्य संघ (पुणें)** या संस्थेच्या आकोला जिल्ह्यांतील सभासदांची साधारण सभा आकोला येथें राजेश्वराचे देवालयांतील धर्मशाळेंत रविवार ता० २९ जुलई १९१७ इ. रोजीं सायंकाळीं ६॥ वाजतां, व्यवस्थापक मंडळाची निवड करण्याकरितां भरणार आहे, तरी आकोला जिल्ह्यांतील सदरहू संघाचे सर्व सभासदांनीं अगत्य येण्याचे करावें कळावें ता० १०।७।१७ इ;

वा. ल. चिपळूणकर

---

## धि आकोला कोचिंग क्लासेस.

गुदस्ता व यंदाही आमचे वर्ग—( इंग्रजी पाचवी इयत्ता ) — आजपर्यंत रात्रीं ६॥ ते ९ पर्यंत भरत असत. पण त्यामुळें बाहेर गांवचे विद्यार्थ्यांना फार त्रास पडे ह्मणून त्या ऐवजीं सोमवार ता. १६-७-१७ पासून दुपारीं वर्ग भरविण्यांचें ठरविलें आहे. करितां ऐवढ्याच अडचणीमुळें बाहेरगांवच्या ज्या विद्यार्थींना येथें येऊन राहतां येत नसेल त्यांनीं ही संधी घेऊन घरीं स्वस्थ न बसतां आमचेकडे मिळत असलेल्या शिक्षणाचा लाभ घ्यावा.

ताजनापेठ आकोला ता० १४-७-१७ } मो. ग. ठकार वकील. हेड म्यानेजर अ. को. क्लासेस.

नो. नं. ३११

## जाहिरात

नवीन ग्रंथ ) विक्रीस तयार ( नवीन ग्रंथ
श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यसच्चिदानंदसरस्वतीदेव-स्वामी, पूर्वाश्रमी रा. रा. गणेश वामन देव नांदोदकरकृत.

आवृत्ति दुसरी ] **आत्मविचार** [ किं रु. १॥ पोष्ट शिवाय

पृष्ठसंख्या डेमी अष्टपत्री सुमारें २०० डिसेंबर १९१७ चे आंत मागणी करणारांस पो. व व्ही. पी. नाहीं. विशेष माहितीकरितां तारीख ५ व १२ डिसेंबरच्या केसरींतील जाहिरात पहा **मिळण्याचें ठिकाण.**

**अनंत गणेश शेकदार,**
**मॅनेजर इंदुप्रकाश प्रेस, मुंबई, नं. २.**
नो. नं. ३१०

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अग यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ { Lyon Scott एजंट
नो नं १

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥।, १, १।, १॥, २, २॥, ते ५ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ।॥। १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।।, ॥।, ।॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**—शिसवी व शिवणीचे वगैरे सामान वाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

**डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी**
नो. नं. ३

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळ टीका, मुदी अग्रफुलें सार्‍या व पाटल्याचीं वगैरे स जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकरणीं, ताटें, वाट्या, गडवे, इत्या माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सो न्याशनलचें शेंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमार्शियल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि. मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमार्शियल अशूअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

मराठी भाषेंत अशा प्रकारचें हें पहिलेंच अपूर्व साहस !

वा. वर्गणी १२ आणे व्ही.पी, नें १४ आ.

# पूर्णानंद

**स्वस्त आणि उपयुक्त सचित्र मासिक पुस्तक.**

अत्यंत अल्प किंमतीत इतकें उपयुक्त, इतकें मनोरंजक, इतकें चित्रपूर्ण मासिक आजपर्यंत कोणीही दिलेले नाहीं. नमुन्याचा अंक २ आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

पत्ताः—**पूर्णानंद-कार्यालय, बेळगांव.**
नो. नं. २९९

## रोल्डगोल्ड सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३—४; गोट जोडी २—२॥; पाटल्या जडी २—२॥; वज्रटीका ३—४; ठुशी ३. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४—५. शिंप्याचें मोतीं व्हान मोठें वाटेल तसें. सराची २—३—४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— **मगनलाल के आणि कंपनी गिरगांव- मुंबई**
नो० नं० ९

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्मीसंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७१ गो० २ रु० १३१ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५१० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगीस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

{ **कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.**
**मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.**

नो० नं० २२

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No-N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला---सोमवार तारीख २३ माहे जुलै सन १९१७ ई० [ अंक २९

## अनुभवानें खात्री



**पटेल !!** जर आपणास आपके हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिंहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात.

त्याचे दर–हात पेटी सिंगल रीड २० ते २५
" डबल रीड ३०-३५-४०-५०
तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५
पाय पेटी सप्तक ३। ६० ते ८० रु.
" " " ३॥ ८५ ते ९५ रु.
" " " ३॥। १०४-११५ रु.
" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु.

**पत्ता—रामचंद्र वीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० ( बुलडाणा )**

नो. नं. २८४

---

## नोटीस.

वि० सि० सबजज सा० आकोला.
कि. मु. नं. १२ स. १९१७ चौ. ता. ४।८।१७

अर्जदार

गुलाबराव वा। दत्तु अ० पा० करणार आई पार्वती जवजे दत्तु रा० मांजरी तालुका आकोला.

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यात येते कीं मयत सूर्यभान वा। किसन हा ता० १३-२-१६ इ० रोजीं मौजे मांजरी येथें मयत झाला आहे. व अर्जदार याचा चुलत भाऊ अज्ञान नामे रामराव वा। सूर्यभान हा ता० १४-४-१६ इ० मौजे मांजरी येथें मयत झाला आहे. त्यांचे वारस या नात्यानें अर्जदार गुलाबराव दत्तु यानें वारसाचें सर्टिफिकीट मिळण्याकरितां आमचे कोर्टात ता० १-५-१७ इ० रोजीं अर्ज दिला आहे. त्याची चौकशीची तारीख ४-८-१७ इ. नेमली आहे. तरी त्याचे विरुद्ध ज्यांची कांहीं तक्रार असल्यास नेमलेल्या तारखेस हजर व्हावे कळावे ही जाहिर नोटीस ता० १३-७-१७ इ.

N. G. Subhedar
Senior Sub Judge.

नो. नं. ३२३

---

## नोटीस.

सर्वत्र लोकांस जाहिर नोटिशीनें खालीं सह्या करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, कृष्णाजी वा येगाजी हा आमचे पक्षकाराचे स्थावर व जंगम जिनगीची अफरातफर करीत आहे व जिनगी गहाण देत आहे. सदर्हू जिनगी त्यास गहाण देण्याचा अधिकार नाहीं. तो त्यास बुडविण्याचें इरादानें जिनगी गहाण देत आहे तरी सदर्हू जिनगी गहाण अगर खरेदी कोणी घेऊं नये घेतल्यास तो व्यवहार आह्मास कबूल नाहीं. व तो व्यवहार कायदेशीर समजला जाणार नाहीं. ही नोटीस दिली आज ता० १९-५-१७ इ. द० बाजीराव गोविंद देशपांडे रा. बुलडाणें

सह्या

१ येगाजी वा। कृष्णाजी व
२ तुकाराम वा। कृष्णाजी निजामपूरकर तर्फे वकील टी. एम. क्षीरसागर रा बुलडाणें

नो. नं. ३१२

---

## नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं शेख आमन वा। शेकबद्दु कसाई अ. पा. इष्टमित्र आजा शेख फकिरा वा। शेख बुऱ्हा कसाई रा पेठ मलकापूर ता. मलकापूर यांनीं आमचे कोर्टात किं. मु. नं. १ सन १९१७ चा अर्ज वारसाचे सार्टीफिकीट ( Succession Certificate ) मिळणें बद्दल अर्ज दिला आहे व त्या अर्जाची चौकशी तारीख ३ १०-१७ इ रोजीं आहे. सदर्हू प्रकर्णीत ज्यांच्या कांहीं तक्रारी असतील त्यानीं वरील तारखेचे आंत दाखल करा-व्यांत कळावे ता० १८-७-१७ इ.

N. K. Mohgaonkar.
सबजज मलकापूर

नो. नं. ३१३

---

## जाहीर नोटीस

विद्यमान सिनीअर सब जज साहेब कोर्ट आकोला

कि. दि. मु. नंबर १६ सन १९१७ इ

अर्जदार

मणीलाल हरकचंद अ. पा. क. धनाबाई जवजे हरकचंद जात गुजराथी राहणार तेल्हारा ता. आकोट

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येते कीं, मयत हरकचंद गुलाबचंद हा ता. १७-५-१६ इसवी रोजीं मुक्काम मुंबई येथें मयत झाला आहे. त्याचा वारस या नात्यानें मयताचा मुलगा अर्जदार मणीलाल यानें वारसाचे सर्टीफिकीट मिळणें करितां आमचे कोर्टात तारीख २८-६-१७ इ-वी रोजीं अर्ज दिला आहे. त्याची चौकशीची ता. १८-८-१७ इसवीची नेमली आहे. तरी त्याचे विरुद्ध ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यांनीं नेमल्या तारखेस कोर्टात हजर व्हावे. तारीख ११-७-१७

सही
N. G. Subhedar
Senior Sub Judge
Akola

N. N. 314

---

## नोटीस.

सेक इस्मायल वा। सेक फकीरा गायकसाई सौदागर राहणार मलकापूर पारपेठ

यांसः—

खालीं सही करणार ईजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून माझे लग्न तुमचे बरोबर सरासरी १२ वर्षां पूर्वी झाले. मी अज्ञान असतांना तुमचे येथें ५।६ वेळां आले गेले हल्लीं मी वयस्क झाले असून मी माझे भावाच्या घरीं आहे. त्याला सरासरी ४-५ वर्षें झाली, तुह्मी मला नेत नाहीं व अन्नवस्त्र ही देत नाहीं. तरी तुह्मी सदर्हू नोटीस पावतांच १५ दिवसाचे आंत मजला घेवून जावे. नाहींपेक्षां मी दुसरे कोणा बरोबर निका लाविन. ता. ७-७-१७

सही
सुभानबी मर्द सेक इस्माईल निशानी बांगडी हल्लीं मु. बुलठाणा ठिकाणा यासीनखा बुक बाईंडर

नो. नं. ३१५

---

## नोटीस

तिर्थरूप रा. रा. परशरामपंत बाबा साहेब गाडे राहणार वाकद ता. वाशीम

यांसः—

साष्टांग नमस्कार विनंती विशेषः—— या जाहिरनोटिशीनें कळविणें भाग पडते कीं, मौजे वाकद येथील सर्व्हे नंबर २० एकर १३ गुंठे १७ आ. रुपये १४०८३ पोट हिस्सा नंबर २ हें शेत आणि वाकद येथील पत्र्याचें घरांतील पश्चिमेकडील निम्मा हिस्सा ही स्थावर जिनगी माझ्या मालकीची असून ती माझ्याकडे आजोळच्या नात्यानें वारस ह्मणून आलेली आहे या जिनगीवर माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाचा हक्क चालणार नाहीं. मी आतां सज्ञान आहे तर या पुढें माझ्या शेतीची वहिवाट आपण करूं नये. आणि वगैरे राहणें असल्यास त्याबद्दलची कायदेशीर भाडेचिठ्ठी करून द्यावी. शेतीचा पर्चा माझ्या नांवानें पूर्वीच झालेला असून आपलें नांव पालन करणार ह्मणून लागलेलें आहे. शेती देखील योग्य भाडेपट्टा घेऊन आपणास वाहण्यास देण्यास मी तयार आहे. ही नोटीस पोचल्या नंतर आठ दिवसाचे आंत कायद्याप्रमाणें भाडेचिठ्या करून द्याव्या. असें न होईल तर दिवाणी मार्फत सर्व नुकसानी सुद्धां दाद मागावी लागेल आणि मग माझ्यावर बोल राहूं नये ह्मणून आगाऊ सूचनार्थ लिहिलें आहे. कळावें ता. १५ जुलै १९१७

सही
गोविंद परशराम अ. मा. मोरगांव भाकरे ता. अकोला द. खुद

नो. नं. ३१६

---

## नोटीस

नोटीस बेशमी हरी वा। पुंजाजी पाटील खातखेडकर राहणार मडाखेड बु॥ तालुका जळगांव

यांसः—

नोटीस देणार बाळकृष्ण नारायण पाटील गार्डीयन काशीराव उकर्डा पाटील अज्ञाना तर्फे नोटीस देण्यांत येते कीं, अज्ञानाचे इस्टेटीची व्यवस्था पाहण्यास तुह्मास सन १९१५ सालांत मुखत्यार नेमले होते. हल्लीं अज्ञानाचे व्यवस्थेचें काम बहुतेक संपले आहे. व आपण काम ही बरोबर रीतीनें करीत नाहीं सबब तुह्मास ता. १४-७-१७ इ. पासून कुलमुखत्यारकीचें कामावरून कमी केले आहे. तुमचेजवळ असलेले कागदपत्र व हिशोब आह्मास समजून द्यावा. कागदपत्र दिल्यावर आमची पावती घ्यावी. तुमचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे. यापुढें अज्ञानाचे इस्टेटीसंबंधीं तुह्मी कोणतेच काम करूं नये. ही नोटीस दिली. ता. १४-७-१७ दस्तुर नारायण वामन रा. आकोला

सही.
बाळकृष्ण वा। नारायण पाटील रा. वडाळी पोष्ट नांदूरा दस्तुर खुद

नो. न. ३१७

---

## नोटीस.

नोटीस बेशमी बिजराज कुंजीमल मारवाडी मालक शिवनंदन बिजराज साहू दुकान दहिहांडा ता. आकोट जि. आकोला

यांसः—

खालीं सही करणार लक्ष्मण वा। जानजी कोळी राहणार दनोरी पोष्ट रेळ तालुका आकोट जि. आकोला

यांजकडूनः–

नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमचे येथून ता. २४-५-११ इसवी रोजीं एक हजार रुपये घेऊन तुह्मांस गहाणखत लिहून दिलें. त्यांत दीड रुपया प्रमाणें व्याजाची शर्थ आहे. मी ता. ३०-१-१२ इसवी रोजीं तुमचे येथें सर्व रुपये तोडण्याकरितां रकम घेऊन आलो असतां तुह्मी तेवेळीं ह्मणाले कीं, सर्व रकम तुह्मी कोठून आणिली. मी ह्मणालो कीं मजला दुसरे सावकार एक रुपयाप्रमाणें रकम देण्यास तयार आहेत. त्याप्रमाणें त्यांचे येथून मी रकम आणिली आहे. त्यावेळीं तुह्मी ह्मणाले कीं मी ही एक रुपया १ शेकडा प्रमाणें रकम ठेवितो तुह्मी सर्व पैसा देऊ नका. असा तुमचा आमचा ठराव झाला. त्यावेळेपासून तुह्मांस मी एक रुपया शेकडा प्रमाणें

सर्व रकम चुकती केली आहे. आतां तुमचे कांहीं एक घेणें नाहीं. मी गहाणखत तुह्मांस वापस मागितले असतां तुह्मी ह्मणाला कीं मी शर्थी व्याज घेईन. मजला तो ठराव कबूल नाहीं. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, मी ठरावाप्रमाणें सर्व रकम आदा केली आहे. त्याप्रमाणें मजजवळ पावत्या ही आहेत. तरी तुह्मी मजवर फिर्याद वगैरे केल्यास मी त्याचा जबाबदार नाहीं. सर्व खर्च तुह्मास पडेल. करितां माझे गहाणखत आठ दिवसांत वापस आणून द्यावे. व माझे दुसरे गहाणाचे रुपये मी सर्व दिले असतां त्याची पावती किंवा गहाणखत ही तुह्मी दिले नाहीं. करितां ते ही आणून द्यावे कळावें. तारीख १२-७-१९१७ इसवी

सही

लक्ष्मण वा जानजी राहणार दनोरी तालुका आकोट पोष्ट रेल निशानी आंगठा

नो० न० ३१८

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेट सावकार व इतर लोक ता० मगरूळपीर जि० आकोला

यांसः—

जाहिर नोटीशीनें कळवितों कीं, तारीख ९-६-१९१७ इ. रोजीं वऱ्हाडसमाचार पत्राचे तारीख १८ माहे जून १९१७ इ. चे अंकात तुळसाबाई जवजे गणपतसिंह रघुवंशीय राहणार मंगरूळपीर यांनीं जाहिर केलें कीं, खालीं सही करणार याजला तुळसाबाईचा मय्यत नवरा नामे गणपतसिंह यांनीं आपले सर्व प्रापर्टीचे मजञा दत्तक. पत्र देऊन पुर्ण मालक केले आहे. सदर्हू गोष्टीस सरासरी आज १२ वर्षे होत आली. सदर्हू मय्यत गणपतसिंह हा दत्तक पत्र करून व ताबा दिल्यापासून ४ चार महिन्याचे आंत मरण पावला. तेव्हां पासून मी वयांत येईपर्यंत सदर्हू तुळसाबाई जवजे गणपतसिंह हिचा भाऊ नामे जैयरामसिंह वा मोहनसिंह याजला देखरेखीचे काम करण्यांस गुमास्ता मी नोकर ठेविला होता. परंतु त्यांनीं कांहीं अफरातफर केल्यावरून ह्मणजे कोठ्यांत असलेल्या गल्याची व देवघेवीचें कामांत अफरातफर केल्यावरून त्यांस कामावरून दूर केले. सदर्हू इसम तुळसाबाईचा भाऊ आहे हे वर दर्शविलेंच आहे. तरी तीचे मन वळवून आपल्या सहिनिशी जाहिर नोटिस दिली आहे. करीतां जाहिर नोटिशीनें कळवितो कीं, जैरामसिंह वा मोहनसिंह याचा आमच्याशीं बिलकूल संबंध नाहीं. तुळसाबाई जवजे गणपतसिंह ही निव्वळ अन्नवस्त्राची मालकीण आहे. यापुढें तिचा तिळभर देखील प्रापर्टीमध्यें संबंध नाहीं. प्रापर्टी माझे ताब्यांत असून मीच पूर्ण चालक आहे. करितां तुळसाबाई इनें जाहिर दिलेल्या नोटिशीची किंमत वरील संपर्कावरून कळून येईलच कळावें तारीख १६-७-१९१७ इ.

सही

सितारामसिंग वा गणपतसिंग द. खु.

नो. नं. ३१९

---

## नोटीस

नोटीस बेशमी तानाई मर्द बहिराजी बेलोकार जात मराठे तेली रा. किनखेड ता. व पो मुर्तिजापूर जि. अकोला

हिजलाः—

खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं तुझा नवरा नामे बहिराजी मरून सुमारे १॥ वर्षे होत आले. तो मेला तेव्हां त्यानें तुजला दत्तक घेण्याची परवानगी दिली नव्हती. व त्याशिवाय दत्तक घेण्याचा तुजला कांहीं अधिकार नव्हता. असें असून मिठु वा सोनाजी माझा चुलत भाऊ व तुझा पुतण्या यांस असलेला एकटाच मुलगा जरी कायद्याप्रमाणें व हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें दत्तक घेण्यास योग्य नव्हता तरी तो मुलगा नामे धनु वा मिठु यास माझे संमत्तीशिवाय तूं बेकायदेशीर दत्तक घेतल्याचे कळते. व त्या मुलाचें नांवानें दत्तकपत्र करून देण्याचा तुझा विचार असल्याचे ऐकतो. तरी मुद्दाम या नोटिशीनें कळवितो कीं. तुह्मी शास्त्र विरुद्ध कायद्याविरुद्ध व मयत नवऱ्याच्या अगर तुझ्या सगोत्रीय आप्तेष्टाच्या संमत्तीशिवाय घेतलेला हा दत्तक आह्मांस कबूल नसून तूं जर दत्तकपत्र वगैरे कोणच्याही प्रकारे करून आमच्या वडिलोपार्जित इस्टेटीची विल्हेवाट केली तर ती तूं हिंदु विधवा असल्यामुळें तुला करण्याचा मुळींच अधिकार नसल्यामुळें निरर्थक आहे. सबब घेतलेला दत्तक अयोग्य ठरवून तूं दत्तक पत्र वगैरे करणार आहे ते रद्द करावे नाहींतर तुझ्या विरुद्ध फिर्याद आणून बंदोबस्त करावा लागेल. मग दाव्याचा व या नोटिशीचा खर्च तुझ्याकडून घेतला जाईल. ही नोटीस दिली ता. १७-७-१७

दस्तुर डी. डी. गुळालकर पिटीशनगयटर डिस्ट्रिक्ट कोर्ट आकोला.

सही

मारोती वा गोरखाजी बेलोकार राहणार किनखेड द. खु.

नो नं. ३२०

---

## नोटीस.

तुळसाबाई मर्द गणपतसिंग रघुवंशी रा. मंगरूळपीर तालुका मंगरूळपीर जि. आकोला

हिसः—

नोटीस देणार मी. सिताराम वा गणपतसिंग रा० कसबे मंगरूळपीर तालूका मंगरूळपीर जिल्हा आकोला याजकडून नोटीस देण्यांत येते कीं ता० ९-६-१७ इ. रोजीं तुह्मी माझी चालचलण बरोबर नसून बरेच कर्ज काढले व पुढे ही कर्ज देऊ नये ह्मणून सावकारास जाहिर नोटीस केल्यावरून मी अशी उलट नोटीस देतो कीं तुह्मी दिलेल्या नोटिशींत निवळ माझे नुकसान व्हावें असें तुमचे व तुह्मास अनुमोदन देणारा तुमचा भाऊ जयरामसिंग यांचे मत असल्यावरून ही नोटीस देण्यांत येते कीं माझी चालचलन वाईट असती तर सरकारनीं मला मंगरूळपीर तालूक्यांतील तालुका बोर्ड मेंबर कसें नेमलें असते, शिवाय शेताचा कबजेदार मी असून मला शेतीचे निंदणासाठीं महिनदारास देण्यास व शेतीसंबंधी हरएक कामास पैशाची जरूरी ज्यास्त आहे व मला कर्ज काढण्यावाचून गत्यंतर नाहीं. कारण नगदी पैसा जो माझे बापासमक्ष तुमचे जवळ होता तो व दागदागीनें मिळून निदान कमींतकमी पैसा ४००० रुपये चारहजारपर्यंत तुह्मी आपले भावास व बहीण सिताबाई ईस दिले. हा तुमचा धर्म नाहीं मी तुमचा मुलगा असून तुह्मी माझी नुकसानी करावी व नोटीस देऊन माझी मानहानी करावी हे तुम्हाला योग्य नाहीं तथापि मी अशी नोटीस देतो कीं, तुह्मी माझे घरातील कांहीं एक जिन्नस माझ्या संमतीवाचून कोणासही देऊं नये, असें जर तुह्मी ऐकणार नाहीं, व भाव बहिणीचे फदांत राहून माझी नुकसानी कराल किंवा करण्याचा इरादा कराल तर तुला अन्नवस्त्राचे खर्चा बद्दल दरमहा रकम १० रु० ठरविण्यांत येईल. कळावें ता० १९-७-१९१७ इ.

सही

सितारामसिंग गणपतसिंग द० खु०

नो० नं० ३२१

---

## नोटिशीचें उत्तर.

मेहेरबान महमद नजिरुद्दीन वा मौलवी महमद अब्दुल कादर लिकर कॉन्ट्राक्टर रा. आकोला.

यांसः—

रघुनाथदास रामप्रताप तर्फे मु. जगन्नाथ यांजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येते कीं:—

तुमची तारीख ४।७।१७ ची नोटीस पाठविलेली पोहोंचली. तारीख २१ १०-१६ इसवी रोजीं तुह्मी जें आह्मांस गहाणखत लिहून दिलें त्याचे भरण्याबद्दल तुह्मी जो मजकूर लिहिला आहे तो सरस्वी खरा नाहीं.

हुंडी नग १, रुपये २५०० ची लिखी तुमची मुदती तसेंच हुंडी नग २, रुपये ५००० ची लिखी तुमचे बंधू महमद बशिरुद्दीन यांची मुदती असें हुंड्या नग ३, मिळून रुपये ७५०० आह्मांस घेणें निवत होते ते सर्व रुपये तुह्मी देण्याचें कबूल करून बाकीचे रुपये १३५०० नगदी घेण्याचें ठरवून त्या प्रमाणें आह्मांस रुपये २१००० चा गहाणखत लिहून देण्याचें ठरलें. त्याप्रमाणें हुंड्या रुपये ७५०० च्या भरपाई करून आमचे जवळून घेतल्या व ते रुपये दस्तऐवजाचे भरण्यांत नगदी मांडण्यास सांगून आमचे दुकानीं वरील रुपये नगदी जमा करण्यांस सांगितलें. तसेंच गहाणाचें व्याज तुमचे आमचे दरम्यान चौदा आण्याचे ठरलें होतें. परंतु तुह्मी आह्मांस कळविलें कीं चार महिन्याचें आंत पैसे देऊं अगर नवीन गहाणखत करून देऊं तरी आह्मी गहाणखत लिहून देऊं तें आमची अब्रूची किंमत कमीं होईल या करितां तें गहाणखत नोंदू नये असें आपण सांगितलें. तसेंच दस्तऐवजांत आमचेकडून जास्त व्याज घेतलें गेलें असें दिसू नये ह्मणून तुह्मी सहा आणे प्रमाणें व्याजाची रक्कम भरण्यांत कापून देण्याचें कबूल केल्यावरून गहाणखतांत आठ आणे व्याजाचा दर लिहिला गेला आहे. व चार महिन्याचे व्याजाची रक्कम रुपये ११६ सहा आणे प्रमाणें मजरा घेऊन बाकीची सर्व रक्कम रुपये ११८९ तुह्मास नगदी दिल्यावरून तुह्मी आह्मास रोख नगदीं रुपये २१००० चे गहाणखत लिहून देऊन त्यांत आपली सर्व इस्टेट गहाण लिहून दिली तुह्मी लिहितां कीं, "बाकीची रक्कम मजला लागेल त्या वेळीं घेईन अगर मजला स्वतःला न लागल्यामुळें दुसरे कोणास देऊन वगैरे मजकूर" हा सर्व मजकूर खोटा असून फसवेगिरीचा आहे. व तुमची नियत आमचे नुकसान करण्याची असल्यामुळें लिहिला गेला आहे असें दिसतें.

सदर्हू दस्तऐवजाची मुदत पुरी होण्याचे आगोदर चारदिवस आमचे दुकानीं येऊन आणखी कांहीं रक्कम मागितलेवरून तुमचे आमचे दरम्यान हिशोब होऊन ता. २१-१०-१६ चें गहाणखतावरून वसूल वजा जातां तुमचे कडेस निघाले रुपये १६३३२ व तुह्मी रोख नदगी घेतले रुपये २६६८ एकूण रुपये १९००० चे दुसरे गहाणखत तारीख १७।२।१७ रोजीं लिहून दिलें. याही गहाणखताचे भरण्याबद्दल तुह्मी जो मजकूर लिहिला आहे तो ही खोटा आहे. तुह्मी हें ही गहाणखत चार महिने न नोंदून घेण्याबद्दल विनंती केली. हें गहाणखत लिहिण्याचें वेळीं पूर्वी प्रमाणें व्याजाची रक्कम आगाऊ तुह्मास गरज असल्यामुळें तुह्मी देण्याचें न कबूल केल्यामुळें पूर्वीचा आपसांत ठरलेला व्याजाचा दर चौदा आणे या गहाणखतांत स्पष्ट लिहिला गेला आहे.

सदर्हू दस्ताऐवज नोंदण्याची चार महिन्याची मुदत पुरी होत आली त्यावेळीं ह्मणजे तारीख १६।६।१७ इसवी रोजीं सकाळीं तुह्मी असें सांगितलें कीं मागील गहाणखतावरून व्याजासुद्धां जी रक्कम घेणें निघेल त्यांत २५००० रुपयाची भरती होईल इतकी रक्कम मला रोख देऊन २५००० रुपयाचे गहाणखत पुनः लिहून घ्यावें. व त्यांत दोन आण्यांनीं व्याज कमी करावें. ह्यावेळीं आम्ही तुम्हास कळविलें कीं, पूर्वी प्रमाणें दस्ताऐवज नोंदून घेण्याची चार महिने वाट न पाहतां ताबडतोब नोंदून घेऊं व त्याकरितां तुमचे कडेस मागील दस्ताऐवजाचा हिशेब करून १९६६९ रुपये निघतात ते वजा जातां बाकीचे रुपये ५३३१ आम्ही तुम्हास सबरजिस्ट्रार समोर देऊं. असें तुह्मास कबूल असल्यास २५००० रुपयाचें गहाणखत लिहून घेण्यास आह्मी तयार आहोत. परंतू तुह्मी कळविलें कीं ३००० रुपये सबरजिस्ट्रार समोर द्यावे व बाकीचे रुपये मला आज फार जरूरी आहे करितां त नगदी आज द्यावे. हें तुमचे ह्मणणें आह्मी कबुलकरून तुह्मास रुपये २३३१ नगदी दिले. व मागिल गहाणखतावरून व्याजासुद्धां निघाले ते रुपये १९६६९ एकूण रुपये २२००० व बाकीचे रुपये ३००० नोंदणारे अमलदारांसमक्ष घेण्याचे ठरवून त्याच तारखेस तुह्मी स्टांपाचा कागद आणिला व सदर्हू वेळीं असें ठरलें कीं तुह्मी सबरजिस्टार कचेरींत स्वतः कागद पेषकरून तो नोंदून घेतल्या नंतर आह्मास द्यावा.

सदर्हू कागद मिळण्यास बराचवेळ झाल्यामुळें गहाणखताचा दस्तैवज त्याच तारखेस संध्याकाळ नंतर तुमचे बंधूचें घरीं लिहिण्यांत आला. व गहाणखत लिहिणें पुरें झाल्यावर लागलीच तुह्मी सही केली व तुमचे बंधू व वडील यांनीं उर्दूत साक्षी टाकल्या. दुसरे दिवशीं रविवार असल्यामुळें तिसरे दिवशीं ह्मणजे तारीख १८-६-१७ इसवी रोजीं सदर्हू गहाणखत नोंदून घेण्याचें ठरलें. सदर्हू दस्तैवज नोंदण्यास तुह्मी दाखल करण्यापूर्वी पाहण्याकरितां दस्तैवज आमचे सांगण्यावरून तुह्मी आमचे कडेस पाठविला तो आमचे पाहण्यांत आल्यावर आमचे असें नजरेस आलें कीं तुमची सही तारीख १६-६-१७ ची असतां तुह्मी आपला भाऊ बाशिरुद्दीन याची साक्ष उर्दूत टाकवून तेथें १७-६-१७ ही तारीख मुद्दाम गहाणखत रद्द करण्याच्या हेतूनें साक्षींत टाकून घेतली असें आढळून आल्यामुळें तो कायदेशीर रीतीनें करून द्यावा अशाबद्दल तुमचे जवळ मागणी केली. या मागणी नंतर तुमचे बंधू यांनीं गहाण ठेविलेली इस्टेट खरेदी घेण्यासंबंधानें आमचे कडेस निरोप पाठविला त्या संबंधानें वाटाघाट होऊन अखेरीस खरेदीचें जमलें नाहीं. त्याप्रमाणें तुमचे बंधून परभारे कळविलें. तुह्मी यासंबंधानें इतर जो मजकूर लिहिला आहे तो बनाऊ खोटा लिहिलेला आहे. आह्मी कायदेशीर तजवीज करण्याकरितां तारीख २२-६-१७ रोजीं तुह्मास नोटीस देण्याचे तयारींत लागलों असतां मध्यंतरीं तुह्मी आह्मास गाठून आमची विनवणी करून गहाणांत लिहिल्याप्रमाणें व्याजा संबंधानें व किस्ती संबंधानें बोलणें झालें. व सदर्हू नवीन ठरलेली किस्त व व्याज हें लिहिण्याचें तरी सदर्हू दस्तैवजांत खोडातोड फार होईल ह्मणून तुह्मी सांगितलें कीं शेवटचें पान काढून तेथें नवीन करार ठरल्याप्रमाणें लिहून पुरवणी पान आह्मी लावून देतों व तुह्मास गहाणाचे Validity संबंधानें संशय येऊनये ह्मणून तुम्ही ह्मणाल त्या साक्षी घालून देऊं. त्याप्रमाणें त्याच दिवशीं ह्मणजे तारीख २२-६-१७ ईसवी रोजीं दोन प्रहरीं नवीन ठरलेल्या मजकुराचे पुरवणीवर गहाणाचा मजकूर लिहून तारीख १६-६-१७ रोजीं आणलेल्या स्टांप कागदावर लिहिलेल्या गहाणास जोडलेलें शेवटचें पान तुह्मी काढून घेऊन त्या ठिकाणीं ही पुरवणी पानें लाविली. व तीच तारीख तुह्मी घालून दस्तैवज पुरा करून दिला. व अशा रीतीनें लिहिलेलें व पुरें केलेलें गहाणखत याजवर तुह्मी आपली सही केल्या नंतर पहिल्या दोन साक्षी घातल्या नंतर तुमच्या भावाची साक्ष आमच्या आग्रहावरून मुद्दाम मराठींत घेतलेली आहे. व जें पुरवणी पान तुह्मी काढून घेतलें होतें तें तुमचे भावाचे सांगण्यावरून आमचे समक्ष तुमचे हातानें जाळलें गेलें. असें असतां तुह्मी तो कागद आमचे जवळ मागतां ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. असो. गहाणखत नोंदण्यासंबंधानें तुह्मास नोंदण्यास चला असें ह्मटल्यावरून तुह्मी सांगितलें कीं, माझे पोटांत कळ उठली आहे. कचेरीपर्यंत येववणार नाहीं तरी सब रजिस्ट्रार यांस घरीं आणण्याबद्दल तुह्मी अर्ज लिहून त्यावर आपली सही करून पृथ्वीराज याजबरोबर पाठविलें. त्यावरून सब रजिस्ट्रार हे तुमचे भावाचे घरीं आले. तेथें दस्तैवज तुह्मी दाखल करून रोख नगदी रुपये ३००० त्यांचे समोर घेऊन दस्तैवज नोंदून दिला, व पावतीवर आह्मास दस्तैवज मिळण्याकरितां शेरा लिहून पावती आह्मास दिली.

येणें प्रमाणें खरी हकीकत असतां तुमचे मनांत आतां आमचे रुपये बुडविण्याची कल्पना उद्भवून तुह्मी आपले नोटिशींत बराचसा खोटा भाग लिहिला आहे. तो आह्मास कबूल नसून खरा नाहीं.

त्याअर्थी तुमच्या आमच्या दरम्यान झालेल्या करारान तुह्मी आह्मास दिलेल्या नोटिशी अन्वयें नटला आहां, त्याअर्थी सदर्हू गहाणावरून निघत असलेले रुपये २९००० व त्याचें व्याज आह्मांस आणून देऊन आपला गहाणाचा दस्तैवज परत घेऊन जावा. हें करण्यास तुह्मास १५ दिवसांची मुदत दिली आहे.

गहाणानिनगीच्या मालकीसंबंधानें तुह्मी आतां कांहीं घोटाळा करूं पाहात आहां, व दुसरे हक्क संबंध दाखवूं पहात आहां, पण हा तुमचा लपंडाव खरा असेल अशा आह्मास संशय आल्यावरून आह्मी गहाणमालाच्या मालकीसंबंधानें चौकशी सुरू केली आहे. आणि त्यांत जर आह्माला खरोखर लबाडी दिसून येईल तर तुह्मावर दिवाणींत दावा दाखल केला जाईल.

तुमचा आमचे दुकानशीं संबंध तुमचे वडिलापासून पुष्कळ वर्षांचा असून अशा प्रकारचें वर्तन तुह्मी आमचेशीं कराल असा आह्मास भरंवसा नव्हता. तुम्ही या गहाणखतासुद्धां एकामागून एक आठ महिन्याच्या अवधींत तीन गहाणखतें लिहून दिलीं असतां ही आमचे दुकानचे सचोटीस कमीपणा येईल अशा तऱ्हेचें खोटें वर्तन प्रसिद्धपणें नोटिशीद्वारें केलें आहे त्याजबद्दलची पूर्ण जबाबदारी तुमचेवर असून त्याजबद्दल कायदेशीर तजवीज केली जाईल कळावें लोभ असावा ही विनंती तारीख १८।७।१९१७ इसवी

(सही मारवाडींत)
रघुनाथदास रामप्रताप तर्फे मु. जगन्नाथ
सीकन्या दस्तुर खुद्द
नों० नं० ३२२

**हिंदी स्वराज्य संघ (पुणें)** या संस्थेच्या आकोला जिल्ह्यांतील सभासदांची साधारण सभा आकोला येथें रामेश्वराचे देवाळयांतील धर्मशाळेंत रविवार ता० २९ जुलई १९१७ इ. रोजीं सायंकाळीं ६॥ वाजतां, व्यवस्थापक मंडळाची निवड करण्याकरितां भरणार आहे, तरी अकोला जिल्ह्यांतील सदर्हू संघाचे सर्व सभासदांनीं आगत्य येण्याचे करावें कळावें ता० १०।७।१७ इ.

वा. ल. चिपळुणकर

वऱ्हाडसमाचार
श्रावण शुद्ध ४ पिंगल संवत्सर १८३९

## मद्रास सरकारचें औदार्य!

मद्रास सरकारनें मिसेस बिझांट यांना अटक करण्याचा हुकुम सोडला, त्याबरोबरच त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकांची विक्री बंद करण्याचा हुकुम सोडून मिसेस बिझांट यांच्या प्राप्तीचा झरा ही बंद पाडण्याचा यत्न केला. पण सर सुब्रह्मण्यम आयर यांनीं जाहिर विनंतीपत्रक काढून मिसेस बिझांट बाईसाठीं फंड उभारतांच त्या फंडांत लोकांकडून भराभर वर्गणीच्या रकमा येऊन पडतांच आपला बेत फसला असा खेद वाटून ह्मणा, अथवा बिझांटबाईच्या धार्मिक व तात्विक पुस्तकांच्या विक्रीस मनाई केल्यानें धर्म स्वातंत्र्याला हरकत घेतल्याची जबाबदारी आपण निष्कारण स्वतःवर ओढून घेतली असें वाटून ह्मणा, पण मद्रास सरकारानें पुस्तक विक्रीच्या मनाई हुकुमांत दुरुस्ती करून थिऑसॉफिकल पुस्तकांच्या विक्रीस आपण हरकत घेणार नाहीं असें मिसेस बिझांट बाईस कळविलें; पण ही दुरुस्ती करतांना त्यांनीं अशी अट घातली कीं हीं पुस्तकें सरकार नेमील त्या सेन्सारच्या पसंतीचीं असलीं पाहिजेत. ही अट— किंबहुना हा सगळाच दुरुस्तीचा हुकुम— दुःखावर डागण्या देण्यासारखा असल्यामुळें मिसेस बिझांट बाईनें मद्रास सरकारच्या या औदार्याचा फायदा घेण्याचें साफ नाकारलें. आमच्यामतें हें यथायोग्यच झालें. सेन्सारसारख्या अधिकाऱ्यांकडून आपलीं पुस्तकें तपासवून घेण्यास बाई सारखी मानी व उच्चदरज्याची लेखिका तयार होईल असें मद्रास सरकारास कसें वाटलें कोण जाणे! दुसरी गोष्ट मद्रास सरकारला थिऑसफी ह्मणजे काय याची थोडीशी जरी माहिती असती तरी थिऑसफीचें तत्त्व मनुष्याच्या प्रत्येक व्यवहाराला लागू करण्यासारखें असल्यामुळें राजकारणाचा व त्या तत्त्वाची फारकत करतां येत नाहीं हें त्यांना कळून आलें असतें, आणि त्यांनीं वरच्या सारखा प्रकार (आधीं लाथ मारून मग दंडवत घालण्याचा) केलाच नसता. मिसेस बिझांटबाईनें मद्रास सरकारच्या औदार्याचा स्वीकार न करण्याचें कारण थिऑसफी व राजकारण ही विभक्त करतां येत नाहीं असेंच स्पष्टपणें कळविलें आहे. या प्रकारानें मद्राससरकारचें अज्ञान व अनुदारता हीं मात्र व्यक्त झालीं. पण ज्या सरकारला लखनौ कांग्रेसनें पास केलेल्या स्वराज्याच्या ठरावाची सुद्धां माहिती नाहीं, त्याला थिऑसफीसारख्या सर्व जगभर प्रसिद्ध असलेल्या चळवळीची तरी माहिती असेल अशी अपेक्षा करणें चुकीचें होईल.

## मेसोपोटेमिया प्रकरण.

सध्या विलायतेंतील पार्लमेंटांत मेसोपोटेमिया प्रकरण बरेंच चेतलेलें दिसत आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठीं नेमिलेल्या कमिशनच्या रिपोर्टांत लार्ड हार्डिंज, व मि. चेंबरलेन या दोघांवर ही ठपका ठेवण्यांत आल्यावरून दोघांनीं ही आपापल्या जागेचे राजीनामे दिले. लार्ड हार्डिंज यांनीं तर तिनदां राजीनामा दिला, पण लार्ड हार्डिंज साहेबा विषयी मि. बालफर यांचें इतकें उत्कृष्ट मत झालें आहे कीं त्यांनीं तिन्ही वेळां तो राजीनामा स्वीकारण्याचें नाकारिलें. इतकेंच नाहीं, तर लॉर्ड हार्डिंज साहेबांसारख्यांचा राजीनामा आह्मी घेऊं लागलों तर इंग्लंडांतल्या सगळ्याच ठळक ठळक मुत्सद्यांचे राजीनामे कोणत्या ना कोणत्या तरी कारणावरून घ्यावे लागतील असें मि. बालफर यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें मि. चेंबरलेन यांचा राजीनामा स्वीकारण्यांत आला आहे, व याबद्दल हिंदुस्थानच्या लोकांना तरी वाईट वाटण्याचें कारण नाहीं. त्यांच्याबद्दल हिंदुस्थानाला आदर व पूज्यबुद्धि वाटावी असें एक ही कृत्य आतांपर्यंत त्यांचे हातून घडलेलें नाहीं. मेसोपोटेमिया प्रकरणांत लॉर्ड हार्डिंज प्रमाणें तेही खरोखर निर्दोषी असतील व लष्करी अधिकाऱ्यांच्या मसलतीला मान देऊन त्यांनीं बगदादवर चलून जाण्यास आपशी संमति दिली असेल हें संभवनीय आहे. पण हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचे बाबतींत मात्र त्यांच्या अंगचा करारीपणा किंवा मुत्सद्देगिरीचा गुण कोठें ही दिसून आला नाहीं असें ह्मणणें भाग आहे मि. चेंबरलेन यांच्या जागीं स्टेटसेक्रेटरीचे जागीं कोणाची नेमणूक होते पहावें. माजी अंडर स्टेट सेक्रेटरी मि. मॉंटेगु यांची नेमणूक झाल्यास ती हिंदुस्थानास खरोखर संतोषकारक होईल. हिंदुस्थानच्या लोकांना संतुष्ट ठेवून राज्यकारभार उत्कृष्टपणें चालविण्यास लागणारी दूरदृष्टि त्यांचे ठायीं आहे हें परवाच्या त्यांच्या एका उद्गारावरून कोणालाही सहज दिसून येईल. ते पार्लमेंटांत भाषण करतांना ह्मणाले कीं हिंदुस्थानांत राज्यकारभार करणारे अधिकारी तेथील लोकांना जितके ज्यास्त जबाबदार राहतील, व विलायतेंतल्या जनतेला ते जितके कमी जबाबदार असतील, तितका तो राज्यकारभार सुरळीत चालेल. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मागणीला ते बरेच अनुकूळ आहेत. असे स्टेट सेक्रेटरी लाभल्यावर लॉर्ड चेम्सफोर्ड, लॉर्ड पेटलांड, प्रभृति राज्यकर्त्यांना ही आपल्या दडपशाहीच्या धोरणाला स्वतः आळा घालावा लागेल.

**आनंदाची** बातमी कीं आमच्या मनीषे प्रमाणें राजश्री मांटेगु हेच स्टेट सेक्रेटरी झाले!

## चांदी सोन्याचा प्रश्न

अलीकडे हिंदुस्थान सरकारनें चांदी सोन्याची परदेशाहून आयात करणें, किंवा ती गाळून दागिने वगैरे करणें या संबंधांत दोन तीन मनाई हुकुम काढले आहेत. हे मनाई हुकुम खेड्यापाड्यांतल्या लोकांना समजण्यासाठीं देशी भाषांतून त्यांचीं भाषांतरें होण्याची व दवंडीच्या द्वारें ते सर्वांना जाहिर करण्याची अत्यंत अवश्यकता आहे.

या हुकुमामुळें विशेषत: चांदीचा भाव फारच तेजीचा झाला आहे. सरकारनें हे हुकुम काढण्याबद्दल त्यांना कोणी दोष देईल असें आह्मांस वाटत नाहीं. सध्याची स्थितीच तशी आणीबाणीची आहे. गेल्या तीन वर्षांत सुमारें ४० पासून ५० कोट रुपयापर्यंतचें नाणें सरकारी टांकशाळींत पाडण्यांत आलें व चलनी नोटा सुमारें ९० कोट रुपये किंमतीच्या हल्लीं प्रचारांत आहेत या ९० कोट रुपयांच्या नोटांच्या बदला तितकी चांदी सरकारी तिजोरींत असावयास पाहिजे. पण युद्धामुळें व व्यापारी कारणामुळें तितकी शिल्लक नाहीं. अर्थात सरकारला शिलकेंत चांदी ठेवण्याची व वेळेस रुपये पाडण्यासाठीं चांदीच्या लगडी तयार ठेवण्याची अत्यंत अवश्यकता आहे. लोकांना चांदीची आयात करूं दिल्यास तिचाभाव चढून सरकारला अडचण होईल. यासाठीं खाजगी व्यापाऱ्यांसाठीं आयात बंदीचा हुकुम काढणें सरकारला प्राप्त झालें. सरकारला सोन्याची ही तशीच जरूरी आहे. पण हिंदुस्थानचे लोक सोनें विकत घेऊन तें गाळून दागिने करूं लागल्यास तें ही महाग होईल. तेव्हां त्याबद्दलचा ही मनाई हुकुम त्यांना काढावा लागला आहे. ही मनाई अर्थात् तूर्त लढाईच्या मुदतीपर्यंतच आहे. पुढें ती तशीच राहते कीं काय तें आज सांगतां येत नाहीं.

---

## रे. डॉ. म्याकिकन व हिंदी महत्त्वाकांक्षा.

हिंदी लोकांशीं ज्यांचा निकट संबंध येतो त्यांनाच त्यांच्या स्वभावाची खरी जाणीव असणार. डॉ. म्याकिकन हे इकडे चाळीस वर्षें एका मोठ्या शिक्षणसंस्थेचे मुख्याध्यापक असल्यामुळें त्यांना हिंदी तरुणांच्या स्वाभावांतले गुणदोष त्यांच्या पद्धति व महत्त्वाकांक्षा, त्यांच्या विचाराचे प्रवाह आणि सामाजिक प्रतिबंध इ. गोष्टींही पूर्ण माहिती आहे. दहा पांच वर्षें सरकारी नोकरींत उच्च अधिकाराच्या पदावर राहून हिंदी माणसांचा तिरस्कार करण्यास शिकलेल्या कांहीं सिव्हिलियनांपेक्षां या अनुभवी पोक्त मसलतीच्या ख्रिस्ती मेंढपाळाच्या मताची किंमत अर्थात् अधिक ह्मटली पाहिजे. सध्या हिंदी लोकांच्या महत्त्वाकांक्षांच्या प्रचलित प्रश्नासंबंधानें बोलतांना. रे. डा. म्याकिकन साहेबांनीं विलायतेंतल्या मिशनरी संस्थेपुढें जे उद्गार काढले ते त्यांच्या दीर्घ अनुभवास पूर्ण साजेसेच होते ते ह्मणाले कीं हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्यापासून अलग होऊं इच्छित नाहीं. ब्रिटिश साम्राज्यांत इंग्रजांच्या बरोबरीनें पातीदार होण्याची त्यांची महत्वाकांक्षा आहे. स्वराज्यवादी हेच ह्मणत आहेत. पण त्यांच्या ह्मणण्याचा अर्थ निर्भेळ स्वराज्य उर्फ ब्रिटिश अंमलापासून स्वतंत्र होण्याची इच्छा असा करून किंवा विलायतेंतल्या लोकांच्या मनांत भरवून कित्येक इंग्रज स्वराज्यवाद्यांवर आग पाखडण्याचा जो नित्य प्रयत्न करीत आहेत, त्यांचीं तोंडें डा. म्याकिकन यांच्या सारख्या अनुभवी माणसाच्या उद्गारानें बंद व्हावयास पाहिजेत. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्याचें ध्येय डोळ्यापुढें ठेवून चळवळ करणें कायद्याचे दृष्टीनें ही निर्दोष ठरलेलें आहे. पण आपल्या हातचा अधिकार कमी होईल या भीतीनें संकुचित मनाचा अधिकारीवर्ग स्वराज्याच्या चळवळींत शक्य तेवढ्या अडचणी घालीत आहे. या अडचणींना कस्पटाप्रमाणें मानून निधड्या छातीनें कायदेशीर चळवळ चालविण्यास डॉ. म्याकिकन साहेबांच्या या उद्गारानें लोकनायकांस प्रोत्साहन मिळेल अशी आह्मी उमेद बाळगतों.

---

## राजकीय शाळा.

### (आकोल्याच्या जाहीरसभेचा आदर्श.)

तारीख १६ जुलै सोमवार रोजीं येथील श्री राजेश्वराच्या मंदिरांत जिल्हा कॉंग्रेस कामिटीच्या विद्यमानें एक जाहीरसभा भरली होती. श्री बिझांट, वाडिया व अरुंडेल यांच्या अटकेविषयींच्या निषेधाची पुनरावृत्ती करण्याकरितां २ मेसापोटेमियाच्या लढाईंतील अपयशाबद्दल लॉर्ड हार्डिंज यांच्यावर जो शिंतोडा व कोर्टमार्शलच्या चौकशीचा प्रसंग येऊं पहात आहे त्या संबंधाचे इंडियन लोकांचे दु:खोद्गार व सहानुभूती हीं व्यक्त करण्याकरितां, आणि तसेंच ३ री गोष्ट ह्मणजे ब्रिटिश राष्ट्राचें लक्ष इंडियन गाऱ्हाण्याकडे पोचविण्यासाठीं, स्वदेशी व्रताचा जाहिर निश्चय व्यक्त करण्याकरितां ही जाहिर सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं रावसाहेब रामचंद्र विष्णु महाजनी हे होते अलीकडे येथें ज्या जाहिरसभा होत असतात त्या फार मर्यादशील, लोकमताला प्रबोधक आणि सरकारलाही राजमान्य अशा असतात. किंबहुना या लोकशिक्षणाची शाळाच आमच्या येथील प्रमुख नागरिकांनीं घातलेली आहे व तेथें रावबहादुर अण्णासाहेब महाजनी पासून सर्व भिन्न भिन्न राजकीय विचारांचे शिक्षक, नाणवले जाण्यासारखे थोर थोर गृहस्थ आपापली सार्वजनिक कार्याची पुष्पांजली ह्मणून अर्पण करीत असतात. या सभा इतक्या नामी होत असतात कीं त्या त्या प्रसंगीं छात्रसमूह येऊं शकत नहीं व विद्यामृताचा लाभ घेऊं शकत नाहीं ह्मणून अत्यंत खेद वाटतो. फार तर काय, पण कैलासवासी दादाभाई नौरोजी यांच्या सारख्या राष्ट्रीय पुरुषासंबंधानें सभा होते तेव्हां देखील राष्ट्रीय गुण बालपिढींत निपजविणाऱ्या कीर्तन श्रवणाला विद्यार्थ्यांनीं येऊं नये. ह्मणजे केवढी तरी देशाची हानी होय बरें! जेथें अशा सत्कार्याविषयीं विद्यार्थी मंडळीवर बहिष्कार घालण्यांत येतो तेथें भारत सेनेंत शिराया उपदेशाला कितीजण आपले कान कितीसे देतील हें राज्यकर्त्यांनी चाणाक्षपणानें ध्यानांत घ्यावें.

गेल्या सोमवारच्या जाहिर सभेंत पहिला ठराव राजश्री नानासाहेब परांजपे वकील यांनीं मांडला. त्यांनीं श्री बिझांट इत्यादिकांच्या अटकेसंबंधानें सरकारची वोड्याएवढी चूक कशी होत आहे हें सांगतांना श्रीबिझांट यांच्या अत्यंत लोकोपयोगी व जगद्वंद्य कार्याचें सार्वजनिक अभिनंदन केलें. आणि त्यांच्या अटकेंत ही त्यांच्याच स्फूर्तीनें केवढी तरी राष्ट्रीय मंडळी खडबडून राष्ट्रीय कार्यास प्रवृत्त झाली आहे हें सांगतांना ते विचारांच्या इतक्या उच्च वातावरणांत चढले कीं, त्यांची अलंकारिक भाषा त्यांना पुरेना, त्यांचा सद्गदित कंठ व अन्यायाच्या प्रतिकाराचा आवेश हे शद्बांच्या पामरतेमुळें फिके खरे, पण विशेष परिणामशील झाले. राजश्री काणे वकील यानीं या पहिल्या ठरावाला अनुमोदन देतांना आपत्कालीं जसा महादेवावर अभिषेक तशी ही सरकारपाशीं सभेची प्रार्थना आहे असें सांगून त्यांनीं आपल्या सौम्य व पद्धतशीर विचारांनीं ठरावाला पुष्टी दिली. राजश्री समेळ वकील यांनीं अशा निषेध प्रदर्शक सभांची महती निराळ्याच प्रकारानें सांगितली. त्यांनीं प्रतिपादलें कीं सरकारच्या कृत्याचा **शांतपणें विचार केल्यावर** एक महिन्यानें सुद्धां त्याचा पहिल्या दिवसा इतकाच गर्हणीयपणा वाटतो. सरकारची चूक दुरुस्त होईपर्यंत तिचा वारंवार निषेध केल्यानें आपण सनदशीर चळवळीचें आयतत्व अंमलांत आणीत आहों. तिसरें अटकेंत पडलेल्या थोर विभूती संबंधीं आपण सहनुभूतीच प्रदर्शित न करितां त्यांनीं आखून दिलेलें कर्तव्य करण्याविषयीं विशेष जागृतपणें वागत आहों असें दिसेल आणि चौथे अशा सभांनीं स्वराज्याचें आपलें ध्येय आपल्या डोळ्यापुढें राहून तें मिळविण्याचा आपण आपला निश्चय दृढ करीत आहों. त्या नंतर हा ठराव टाळ्यांच्या गजरांत सर्वांनीं मान्य केला.

दुसरा ठराव लॉर्ड हार्डिंज यांच्या संबंधाचा असून तो आमच्या येथील युद्धविशारद—किंवा युद्धाच्या विद्युत्संदेशांचे मल्लीनाथ— राजश्री रामकृष्णपंत ओक यांनीं सभेपुढें इतक्या कळकळीनें व नानाविध भूत गोष्टींचा आधार देऊन मांडला कीं लॉर्ड हार्डिंज हे आपल्या उत्कृष्ट साधुवृत्तींत लोकांपुढें मूर्तिमंत उभे राहिले, इंडियन आकांक्षा पुऱ्या करून देण्यासाठीं "वरंब्रूहि" ही त्यांची वाणी ऐकूं येऊं लागली आणि मेसापोटेमियाच्या अपयशाच्या चौकशीच्या वेळीं ब्रिटिश लोकांबरोबर इंडियन प्रजाबंधुही न्यायाधीश ह्मणून मागण्य चा त्यांचा संकल्प अंत:करणें सद्गदीत करूं लागला या दुसऱ्या ठरावाला राजश्री चवरे वकील यांनीं अनुमोदन दिलें आणि राष्ट्रीय उपकर्त्याच्या संबंधानें सहानुभूती व्यक्त करण्याचा आलेला हा प्रसंग ईश्वरी संकेतानें फार नामी आला आहे असें सांगून त्यांनीं आपल्या भाषणांत फार उज्वल विचारांनीं लोकांचीं मनें या ठरावाकडे ओढून घेतलीं. आणि राजश्री आठल्ये वकील लॉर्ड हार्डिंज यांच्या हृदयंगम चारित्र्यानें इतके आनंदमय झाले कीं त्यांच्यानें राहवेना ह्मणून त्यांनीं मुद्दाम परवानगी घेऊन या ठरावावर तिसरें भाषण केलें. हें भाषण जरी थोडें तरी लॉर्ड हार्डिंज यांच्या चरित्रांतला त्यांनीं मुल्य कोणशिलाच दाखवून दिली. इंडियन लोक हे माझे समप्रजाजन आहेत, तेव्हां या मेसापोटेमियाच्या न्यायांत त्यांच्या हातून मला न्याय पाहिजे ही त्यांची मागणी ह्मणजे आपल्या लोकांविषीं त्यांचा केवढातरी दृढतम विश्वास यांत निगुढीत झालेला आहे बरें! येणें प्रमाणें उत्कृष्ट भाषणांनीं पुढें केलेला ठराव सर्वांनीं मोठ्या आदरानें शिरसा मान्य केला.

त्या दिवशींच्या सभेंत तिसरा व अखेरचा ठराव स्वदेशी व्रता संबंधाचा होता. राजश्री चिपळूणकर वकील यांनीं हें व्रत लोकांच्या अंत:करणावर जोमदार वक्तृत्वानें प्रतिबिंबित केलें. प्रस्तुत कालीं जो जडवाद प्रचलित आहे, जी अनात्मता पाश्चात्य सुधारणेंत साम्राज्य करीत आहे आणि शारिरीक सौख्याच्या नादानें जो जीवनकलह सर्व शास्त्रांना व विद्यांना प्रगती देत असूनही चालू संस्कृती दूषित करीत आहे त्या सर्वांचा विध्वंस करून टाकण्यासाठीं ईश्वरी इच्छेनें हल्लीं प्रचंड महायुद्ध चालू आहे. त्याची ती निर्दोष करणारी व पावन करणारी सक्रिया पूर्णपणें परिणामांत उतरे पर्यंत आह्मालाही आमच्या सच्छीलाची आठवण व आमच्या गाऱ्हाण्यांची ओरड ब्रिटिश लोकांच्या मनांत जागृत होईपर्यंत स्वदेशीचें महव्रत आचरलें पाहिजे इ. इ. पुष्कळशा तात्विक दृष्टीच्या गोष्टी राजश्री चिपळूणकर यांनीं सांप्रतच्या इंडियन व्यवहाराला कशा लावावयाच्या व स्वराज्याच्या ध्येयाशीं समवायी संबंधानें अरणीरें हें स्वदेशीचें व्रत किती उत्कृष्ट गुणावह आहे हें फार जोरदार रितीनें सुबोध करून सांगितलें. त्यांच्या भाषणांत शद्बांचा पाऊस असा मजेदार व वेगानें पडत होता कीं सर्व सभाजन त्या स्वदेशांच्या पाण्यामध्येंच जणू काय आनंदानें खेळू लागले होते. राजश्री चौधरी वकील यांनीं आपल्या हिंदी मातृभाषेंत या ठरावाला पुष्टी दिली आणि शेवटीं समारोप करतांना रावसाहेब महाजनी यांनीं या सभोंवारच्या वातवरणाला अनुरूप असेंच नेटाचें संभाषण केलें. युरोपियन लोकांना युरोपियन ज्युरीच्याच हातून येथें न्याय मिळाला पाहिजे असा कायदा करण्यांत आलेला आहे, पण पार्लमेंटांत लॉर्ड हार्डिंज सारखे व्हाइसराय इंडियन ज्युरीकडून स्वत:साठीं न्याय मागतात ही प्रस्तुतच्या कालांतली अद्भुतच गोष्ट होय. त्याच प्रमाणें त्यांनीं स्वदेशीच्या व्रताचें महात्म्य सांगून लोकांस या व्रताची दीक्षा अंत:करणपूर्वक घेण्याचा फार आग्रहानें उपदेश केला.

अशा रितीनें गेल्या सोमवारच्या सभेचें काय इतकें उत्तम झालें कीं अशा सभांस जर आमचे राज्यकर्ते येऊन हजर राहतील तर प्रस्तुतचा इंडियाचा राजकीय प्रश्न फार त्वकर उभयपक्षी लाभकारक अशा निकालास लागेल, इतकेंच नाहीं तर वायव्य प्रांताच्या सर मेस्टन यांच्या व तसेंच आमच्या प्रांताच्या सर बेंजामिन यांच्या कौंसिलांतील शेवटच्या संभाषणाप्रमाणें लोकपक्ष व सरकारी पक्ष हे एकजीव होऊन या देशाचीच काय तर साम्राज्याची ही खरी प्रगती होईल आणि पाश्चात्य व पौर्वात्य या दोन्ही संस्कृतींचा गंगायमुना संयोग फार रम्यतर होईल असा आह्मास पूर्ण भरंवसा वाटतो.

---

## लढाईच्या व इतर बातम्या

पंजाब चीफ कोर्टाचे माजी जज्ज सर प्रतुलचंद्र चातर्जी यांना देवाज्ञा झाली. हे पंजाब युनिव्हर्सिटीचे दोनदां व्हाइस चान्सेलर

होते त्याचप्रमाणें पंजाबच्या कायदेकौंसिलांत युनिव्हर्सिटी तर्फेचे सभासद ह्मणून बसण्याचा ही मान त्यांना मिळाला होता.

केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या ऐकॉनामिक ट्रायपॉस परिक्षेत एकही इंग्रज पास झाला नाहीं. हिंदी तरुण १० पास झाले. त्यांत रा. बी. ए. गायकवाड व रा. एन. एच. दंवमानकर हे दोघे महाराष्ट्रीय आहेत.

डब्लिन येथील ब्यारिस्टरीच्या परीक्षेंत मि. एन. राजगोपाळ नांवाचे एक मद्रासी तरुण पास झाले आहेत. यांच्या इतके मार्क आजपर्यंत कोणी मिळविले नव्हते ह्मणून त्यांना २९ पौंडांची स्कॉलरशिप देण्यांत आली आहे. आयरिश पत्रें त्यांच्या हुशारीची फार तारीफ करीत आहेत.

हल्लींच्या चलनी नोटांपैकीं ५० रुपयांच्या नोटी बंद कराव्या अशी सूचना मुंबईच्या चेंबर ऑफ कॉमर्स सभेनें सरकारला केली आहे.

प्रेस आक्टाअन्वयें न्यूइंडिया वरील फिर्यादींत मद्रासहायकोर्टानें दिलेल्या निकालावर प्रिव्हिकौंसिलकडे अपील करण्याची परवानगी मिसेस बिझांट यांनी मिळविली होती. त्याप्रमाणें दोन अपीलें सदर कौंसिलांत देखील झालीं आहेत.

हिंदुस्थानच्या संरक्षणार्थ उभारण्यांत येणाऱ्या युनिव्हर्सिटी कोअरसाठीं कलकत्ता युनिव्हर्सिटीला स्वतःच्या फंडांतून खर्च करतां येत नाहीं व नवा फंड ही नियमाप्रमाणें उभारतां येत नाहीं असा अभिप्राय त्या युनिव्हर्सिटीच्या कायदा— शाखेनें दिल्यावरून सर राशबिहारी घोष यांनीं या कामासाठीं दहा हजार रुपयांची देणगी युनिव्हर्सिटीला दिली आहे.

जर्मनींत प्रजेची सत्ता वाढविण्याच्या चळवळीस बरेंच यश येत चाललेलें दिसतें. बादशहा केसर यांनीं सर्वांना मत देण्याचा सारखा हक्क असावा अशा विषयींचें बिल येत्या निवडणुकीच्या आधीं प्राशियन पार्लमेंटापुढें चर्चेसाठीं आणावें असें फर्मावलें आहे. बादशहाच्या मतांत येवढी क्रांती कशामुळें झाली तें कळत नाहीं. पण तह घडून येण्याच्या संबंधांत आपल्याच प्रजेकडून प्रतिबंध होऊं नये येवढ्यासाठीं तिला खुष ठेवण्याची केसरची ही एक युक्ति आहे असें डच पत्रें ह्मणत आहेत.

मिसेस बिझांट, मि. वाडिया, व मि. अरंडेल यांच्या अटकेच्या प्रश्नाचा कायद्याच्या दृष्टीनें विचार करून सर नारायणराव चंदावरकर असें लिहितात कीं मिसेस बिझांट यांची राजकीय चळवळ खोडसाळपणाची होती असें गृहीत धरलें तरी डिफेन्स ऑफ इंडिया आक्टाखालीं त्यांना अटक करण्याचा अधिकार मद्रास सरकारास नव्हता. अर्थात त्या सरकारचें कृत्य राजकीय दृष्टया कसेंही असलें तरी कायद्याच्या दृष्टीनें बरोबर नाहीं.

जर्मन चान्सेलर बेथमन हॉलवेग यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला.

मोंट हैट येथें फ्रेंचांनीं जर्मनांवर जय मिळविला. तेव्हां जर्मन लोकांच्या फौजेच्या तीन तुकड्या वा समूळ नाश झाला.

इंग्लंडच्या राजघराण्याचें नांव बदलण्याचे संबंधांत अखेर तें वुइंडसर असें ठरलें.

जुलै महिन्याच्या १ त्या तारखेपासून ता. १९ पर्यंत रशियानें जर्मनीचे ३६९०९ शिपाई व ८३४ आफिसर कैद केले, ४०३ मशीन तोफा, ४३ सुरुंगटाकण्याचीं यंत्रें, दोन विमानें वगैरे घेतलीं.

चीनमध्यें नुकतीच राज्यक्रांति होऊन राजाची सत्ता पुनः प्रस्थापित झाली त्यांत जर्मनीचें साह्य राजपक्षाला होतें अशी बातमी आहे.

## सुरम्य स्वराज्य.

राजश्री टिळक ह्मणतात कीं स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि ह्मणूनच मला स्वराज्य पाहिजे. या स्वराज्यांत किती तरी मनुष्याच्या स्वभावांतल्या उत्कृष्ट भावना विकास पावलेल्या आहेत बरें! आणि मनुष्य स्वभावांत जें काहीं उत्तमोत्तम असेल आणि मनुष्याची संस्फूर्ती ज्या उच्च शिखराला पोंचली असेल तें सर्व स्वराज्याच्या अंतरंगांत चांगलें प्रतिबिंबित झालेलें असतें. अशाच उत्कृष्ट विचारांनीं प्रेरित होऊन रेव्हरेंड जोसेफ फोर्ट न्युटन यांनीं आपल्या व्यासपीठावरून अमेरिकेंत लोकांस या युद्धांत सामील होण्याविषयीं जो उपदेश केलला आहे तो अत्यंत वीरश्रीचा व मननीय आहे. ते ह्मणतात कीं लोकांची सत्ताही लोकांकरितांच आहे. आणि ती लोकांच्या हातूनच उपयोगांत आली पाहिजे तेथें जात, धर्म, वर्ण, रंग यांच्या भेदाभेदाला कोठेंही स्थळ मिळणार नाहीं. राष्ट्राच्या कारभारांत प्रत्येकाला अधिकार असून कायद्याच्या दृष्टीनें सर्वजण समसमान आहेत. हेंच आराध्य ध्येय अमेरिकन निशाणावर फडकत आहे आणि या ध्येयाचा अवलंब करतांना स्वकीय देश जरी डोळ्यापुढें असला तरी सर्व जग त्या ध्येयाचें क्षेत्र होय. आणि अशाच दृष्टीनें विश्वात्मक भावनांचा उदय होऊन मनुष्य योनीची संस्कृती अधिकाधिक कल्याणप्रद व अलंकृत होत जाते. अपल्या मातृभूमीविषयीं हा जो प्रेमाचा जिवंत झरा तोच इतर राष्ट्राच्या प्रेम निर्झरा विषयीं अभिमान शिकवितो आणि फ्रेंच लोकांना फ्रान्स किती प्रिय वाटतो व इंग्लिशांना इंग्लंड किती प्रिय वाटतो ही जाणीव चांगली उत्पन्न होते. जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स किंवा अमेरिका आपलें साम्राज्य पृथ्वीवर पाहिजे असें ह्मणेल तर ती त्याची वल्गना होय आणि कालनेमीनें ती कल्पनाही खोटी ठरेल. दिग्विजयी लोक पृथ्वीवर आले तसेच ते नष्ट झाले. त्यांचे दिग्विजय ह्मणजे त्या असुरी महत्वाकांक्षा होत आणि इतिहासांतील प्रदर्शनांतच ते मांडण्यासारखे असतात. कोणत्याही राष्ट्राला आपलीं ध्येयें दुसऱ्या राष्ट्रावर लादण्याचा हक्क नाहीं. जर कोणी राष्ट्र आपल्या लष्करी जोरावर व श्रीमंतीच्या बलावर आपलें ध्येय दुसऱ्यावर लादील तर सर्व मनुष्य कोटीचा तें राष्ट्र राजद्रोही ठरेल याशिवाय कोणत्याही राष्ट्राला आपल्या क्षुद्र दृष्टीच्या ऐटींत, मोठेपणाच्या भरांत व द्वेषाच्या लहरींत अलिप्त संन्याशासारखें राहातां येणार नाहीं. जग हें फार संकुचित आहे. त्यांचे धागे एकमेकांत अत्यंत गुंतलेले आहेत आणि सर्व जग मिळून एक नाजुक यांत्रिक संस्थाच आहे. या ईश्वरी संस्थेचा विघात करण्याच्या काहीं प्रयत्नाला उद्देशून एक फ्रेंच वक्ता गेल्या सालीं ह्मणाला कीं १८७० त इंग्लंड अलिप्त राहिले आणि फ्रान्सचा संहार इंग्लंडनें आपल्या डोळ्यांदेखत होऊं दिला; पण या रितीनें इंग्लंडनेंच आपल्यावर संकट परंपरा ओढून आणली. १९१४ मध्यें अमेरिका अलिप्त राहिली आणि अमेरिका फ्रान्सचा संहार आपल्या डोळ्यादेखत होऊं देणार नाहीं पण ईश्वर जाणे, अमेरिकेची भावी सद्गती काय होईल ती दृष्टीसच पडेल. वरील उपदेशांत जें गूढ तत्व आहे त्याचाच अवलंब प्रेसिडेंट उइल्सन यांनीं करून आपल्या देशाच्या कविस्फूर्ती प्रमाणें देशाभिमानाच्या ब्रीदान्वयें आणि थोर संतांच्या दिव्यदृष्टीनें या महायुद्धांत पुढाकार घेतला आहे. आणि ईश्वरकरो, जेव्हां हें महायुद्ध संपेल तेव्हां राजश्री टिळक यांचें तें सुरम्य स्वराज्य ब्रिटिश साम्राज्यास येवढ्यांत होवो !

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— पुष्यनक्षत्राच्या पर्जन्यानें फार चांगली पुष्टी दिली आहे आणि आता त्याचे दोन चरण खुले जातील तर बरें. तुरळक तुरळक प्लेग व कॉलरा आमवाचे तापादि विकार हे खेरीज करून हें ऋतुमान विशेष बरें जात आहे.

खान बहादूर हाफीज महमद वलीयतुल्ला ए. अ. कमिशनर यांस १०० रुपये पगाराची बढती मिळून रा. रा. कृष्णराव पुरुषोत्तम भट यवतमाळ यांस ५० रुपये पगाराच्या वर्गांत बढती मिळाली आहे हें कळविण्यांत आनंद वाटतो.

रा. रा. गोविंद कृष्ण पर्वते उर्फ बाबासाहेब वकील दर्यापूर हे गेल्या ३ त्या तारखेस मरण पावले ह्मणून दर्यापूरच्या सार्वजनिक कार्यांतील एक नेमस्त पुढारी आणि प्रेमळ व एक फार चांगला विद्वान मनुष्य आपल्यांतून गेला ह्मणून तेथें एक सभा ही भरविण्यांत आली होती. सुखवस्तु व कार्यकर्ते गृहस्थ आपलें राष्ट्रीय ऋण देण्यापूर्वीच फार लौकर कां निवर्ततात याचें कारण शोधून नव्या नव्या विद्वानांनीं दीर्घायु होण्याची कला अगोदर शिकली पाहिजे.

रा. रा. गणेश मोरेश्वर गोरे हेडमास्तर हायस्कूल खामगांव यांस ११० पगारापासून १५० रुपये पगाराची बढती देण्यांत आली आहे.

**भविष्यः**— रावसाहेब राममाऊ महाजनी यांस जिल्हा बोर्डातर्फे कौंसिलदार नेमण्यांत येणार आहे असें त्यांच्याकडे येणाऱ्या अभिनंदनाच्या बातम्या व मेजवान्या पक्के भविष्य सांगत आहेत. फार उत्तम गोष्ट होय.

रा. काजी जैनुलोबदीन हैद्राबादचे ए. अ. कमिशनर यांस उमरावती जिल्ह्यांत वर्ग २ चे मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आलें आहे.

**नव्या पट्ट्या**— सरकारी साऱ्या बरोबर जेथें दर रुपयांस १९ पै प्रमाणें आजपर्यंत पट्ट्या वसूल करण्यांत येत होत्या तेथें १८ पै पासून २४ पै पर्यंत त्या पट्ट्या वाढविण्याचा सरकारी मनुद्रा जाहिर करण्यांत आला आहे. दोन महिन्यांच्या मुदती पर्यंत लोकांच्या तक्रारी ऐकण्यांत येतील. जिल्हा बोर्डाचें उत्पन्न वाढविण्यासाठीं ही योजना करण्यांत येणार आहे.

**पेनशन**—रावसाहेब रघुनाथ वामन देवभानकर हेडमास्तर हिंदू हायस्कूल उमरावती हे गेल्या शुक्रवार पासून पेनशनदार झाले आहेत. शिक्षक या नात्यानें यांची कारकीर्द फार वर्णनीय आहे. विद्यार्थ्यांच्या शिस्तीकडे यांचा रोख विशेष असे आणि विद्यार्थ्यांमध्यें शाळेविषयीं अभिमान नेहमीं जागृत असे. यांचे पुढील दीर्घायुष्य या पेक्षांही अधिक सार्वजनिक कार्याला उपयोगी पडेल असे यांची कारकीर्दच अभिवचन देत आहे ही आनंदाची गोष्ट होय.

रा. रा. वासुदेव गोविंद गुर्जर यांस उमरावतींसच हेडमास्तर नेमण्यांत आलें आहे.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. श्रीनिवास अच्युतराव देशपांडे उर्फ छोटे रावसाहेब बाळापूर यांस छातीच्या विकारानें दहा दिवसांपूर्वी देवाज्ञा झाली. गृहस्थ ऐन बत्तीशीच्या वयांत असून सर्व दुनियेदारी यापुढेंच होती. सार्वजनिक कार्ये करण्याची हौस असे. वृद्ध माता, तरुण पत्नी इत्यादि आप्तमित्रांस फार हळहळ वाटेल.

रावबहादुर काशीनाथ केशव ठाकूर आय. एस्. ओ. पेन्शनर डिस्ट्रिक्ट अँड सेशन जज यांस नागपूर येथें गेल्या मंगळवारी देवाज्ञा झाली. ही दुःखद वार्ता येथें येतांच त्यांच्या निमित्त येथील दिवाणी कडील न्यायाधीश व वकील मंडळी यांची सभा भरून एक दुःखदर्शकाचा संदेश पाठविण्यांत आला आणि त्या थोर गृहस्थाच्या सन्मानार्थ गेल्या गुरुवारीं कचेऱ्याही बंद ठेवण्यांत आल्या होत्या रावबहादुर ठाकूर हे उत्कृष्ट न्यायाधीश असून हायकोर्टाचे जज होण्याच्या मार्गांत होते. त्यांचा शांत व गंभीर स्वभाव, साज्जळ वर्तन आणि सरकारी बंधनें सुटतांच सार्वजनिक कार्यांत पडण्याची मोठी हौस हीं लोकांच्या स्मरणांतून लवकर जाण्यासारखीं नाहींत. सरकारी कामाच्या बोझानें आमची मंडळी कशी निःसत्व होऊन लवकर मरणद्वार गाठतात हें सर डेक ब्रॉकमन यांनीं रावबहादुर ठाकूर यांच्या शिष्टाड व मजबूत शरीर प्रकृती वरून तत्काळ ध्यानांत घेण्यासारखें आहे आणि न्यायाकडील कामाचा बोजा हलका करण्याविषयीं ते एखादें सर्क्युलर काढतील अशी आह्मास उमेद आहे.


**काश्मीरी केशर.**

पवित्र आणि असल १४८
उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत
८४ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग
२१, सुगंधित जीरा १० कागजी बादाम
८२ पौंड, सेबाचा मुरब्बा २ पौं. टिन १।
काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ९

## जाहिरात

**नवीन ग्रंथ ) विक्रीस तयार ( नवीन ग्रंथ**
श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यसच्चिदानंदसरस्वतीदेवस्वामी, पूर्वाश्रमी रा. रा. **गणेश वामन देव नांदोदकरकृत.**

आवृत्ति दुसरी ] **आत्मविचार** [ किं रु. १॥ पोष्ट शिवाय

पृष्ठसंख्या डेमी अष्टपत्री सुमारें २०० । डिसेंबर १९१७ चे आंत मागणी करणारांस पो. व व्ही. पी. नाहीं. विशेष माहितीकरितां तारीख ९ व १२ डिसेंबरच्या केसरींतील जाहिरात पहा **मिळण्याचें ठिकाण.**

**अनंत गणेश शेकदार,**
**मॅनेजर इंदुप्रकाश प्रेस, मुंबई, नं. २.**
नों. नं. ३१०

## जाहिरात

**मुंबई न्य.केची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अग यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई व्यांक } Lyon Scott
आकोला ९।९।०९ { एजंट
नो नं १

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें टिकाऊ पक्का रंग किंमत ॥, १, १।, १॥, २, २॥, ते ९ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ।॥ १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ।॥, १, १॥, रु. प. **खडावा जोड**—शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा फुकट

**डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी**
नो. नं. ३

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया।

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तडतोब दूर होतात किं रु. १८९.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जें. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें सार्थी व घागऱ्याचीं वगैरे स जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्या माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोन्याशनलचें शेंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमार्शियल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमार्शियल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज. फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

मराठी भाषेंत अशा प्रकारचें हें पहिलेंच अपूर्व साहस !

वा. वर्गणी १२ आणे व्ही.पी, नें १४ आ.

# पूर्णानंद

**स्वस्त आणि उपयुक्त सचित्र मासिक पुस्तक.**

अत्यंत अल्प किंमतीत इतकें उपयुक्त, इतकें मनोरंजक, इतकें चित्रपूर्ण मासिक आजपर्यंत कोणीही दिलेले नाहीं. नमुन्याचा अंक २ आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

पत्ताः—पूर्णानंद—कार्यालय, बेळगांव.

नो. नं. २९९

## रोल्डगोल्ड सोन्याचे

**कधींच काळे न पडणारे दागिने**

चंद्रहार किं. रु. ३-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जडी २-२॥; वज्रटीका ३-४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-९. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सराची २-३-४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसची किं. १॥ रु.

पत्ता— **मगनलाल के आणि कंपनी गिरगांव— मुंबई**
नो० नं० ९

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिवृद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल दर एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु० १६९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ९९० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगींस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत यशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

{ **कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.**
**मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी.**

नो० नं० २२

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd. No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला--सोमवार तारीख ३० माहे जुलै सन १९१७ ई० [अंक ३०

## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आमचच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर–हात पेटी सिंगल रीड २० ते २५
" डबल रीड ३० ३५-४०-५०
तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५
पाय पेटी सप्तक ३। ६० ते ८० रु.
" " " ३॥ ८५ ते ९५ रु.
" " " ३॥। १०४-११५ रु.
" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु.

**पत्ता—रामचंद्र बीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० ( बुलडाणा )**

नो. नं. २८४

---

## जाहीर नोटीस

रा. रा. तोताराम सोनाजी झाली रा. चतारी पोष्ट आलेगांव ता. बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मी ता. २४-६-१९१७ रोजीं वतनदार प्रेस मध्यें नोटिस नं. १८३ ची पोष्टमार्फत दिली. त्यांत लिहिलेला सर्व मजकुर अजीबात खोटा आहे. माझे घरीं कणगींत जवारी ठेवण्याचें बिलकुल प्रयोजन नाहीं. परंतु तुह्मास मी आज दोन पिके होतात, तुह्मी मारोती खंडाऱ्याचे शेत विकत घेतले त्यांत रकमेची कमतरता असल्यामुळें माझेपासून रोख नगदी रुपये शंभर हात उसने घेतले ते देण्याची तुमची इच्छा नाहीं. आतां तुह्मी बेमानीची नीयत नाहीं ह्मणून ही नोटीस आपण दिलेली केवळ लबाडीची आहे. तर ही माझी नोटीस तुह्मास पोचल्यापासून आठ दिवसांत माझे उसनवारीचे रुपये १०० दरमहा दर शेकडा २ दोन रुपये व्याजाचे चुकते करून माझी पावती घ्यावी. या प्रमाणें न केल्यास मी तुमचेवर दिवाणींत फिर्याद करीन. व या नोटिशीचे खर्चा सुद्धां व कोर्ट खर्चा सुद्धां रकम भरून घेईन ही नोटिस दिली. सही

मुक्काम आकोला ता. २५-७-१९१७

सही

१ उदेभान वा। भगवान गावंडे नि॥ खुद हातची रेघ रा. चतारी पोष्ट आलेगांव ता. बाळापूर

नो. नं. ३२४

---

## जाहिरात.

मी खालीं सही करणार सर्वत्र लोकांस या जाहीरातीनें कळवितों कीं, माझे मुलगे नामें देवबा व दुसरा मुलगा नामें नेबजी यांस कोणीच कर्ज वगैरे देऊं नये. यापुढें त्यांना कोणी कर्ज दिल्यास त्याजबद्दल माझेवर अगर माझे वडिलोपार्जीत असलेल्या इस्टेटीवर कांहींच बोजा वगैरे राहणार नाहीं. तारीख ३-७-१९१७ इसवी दस्तुर रामकृष्ण रावजी दलाल गिरोली

सही

नि॥ गणाजी वा। महादाजी राऊत कुणबी राहणार खेडआबई प्रगणे गिरोली ता. मंगरूळपीर जि. अकोला याचे हातची रेघ असे

नो. नं. ३२५

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं, खालीं सही करणार यांचे नांवानें तुकाराम वा। सखाराम सांगूळवेढे कुणबी व व बायनी मर्द तुकाराम सांगूळवेढे कुणबी उभयतां रा. दिनोड ता. आकोट जिल्हा आकोला यांनी तारीख २५-२-१९१४ इ. रोजीं लिहून देऊन रजिष्टर नंबर १२७ सन १९१४ यांस दाहिहांडा येथील सब रजिष्टर कचेरींत ९०० रुपयाचें तारण गहाणखत केव्हां व कोठें गहाळ झाले तें सांपडत नाहीं. तरी जो कोणी हे तारण गहाणखत सापडले असल्यास आणून देईल किंवा ते सांपडेल अशा तऱ्हेची खात्रीलायक बातमी देईल त्यास मी रुपये पंचवीस रोख बक्षीस देईन. कळावें तारीख २१-७-१९१७ इ. दस्तुर डी. डी. गुलालकर पिटीशन रायटर डिस्ट्रिक्ट कोर्ट आकोला

माहिती देण्याचा ठिकाणा डी. डी. गुलालकर ताजनापेठ आकोला

सही

सहीची निशाणी रायभान वा। परशराम कोर्डे कुणबी रा. सासनबुजरुक पो. सासनरामापूर ता. दर्यापूर जि. उमरावती याचे हातची निशाणी खुद हातचा आंगठा दस्तुर वर प्रमाणें

नो. नं. ३२६

---

## नोटीस.

सक्सेशन अर्ज नं. ६ सन १९१७

वारसाचे सर्टिफिकीट मिळणे बद्दल जाहिरनामा

विद्यमान सबजज्ज साहेब कोर्ट खामगांव सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं मौजे चिखलदरा जिल्हा उमरावती येथें व्यंकटेश गोपाळ मोहोळकर हे ता० २१-९-१६ इसवी रोजीं मैत झाले आहे. त्याचे इस्टेटीबद्दल अर्जदार १ गोपिकाबाई जवजे व्यंकटेश २ विष्णु व्यंकटेश ३ श्रीनीवास व्यंकटेश ४ गोदुबाई जवजे विश्वनाथ पाळेकर अ. पा. विश्वनाथपंत पाळेकर रा० उमरावती यांनीं मैयताचे मिळकतीबद्दल वारसाचे सर्टिफिकेट मिळावे ह्मणून अर्ज केला आहे. करितां मयताचे आणखी कोणी वारस असल्यास त्यांनीं वरील अर्जदार यांस सर्टिफिकेट कां दिलें जाऊ नये यांचें कारण दाखविणें असल्यास ता० ११-८-१७ इसवी रोजीं सकाळी १० वाजतां आमचे समोर हजर व्हावे. कळावें आज तारिख १७-७-१७ इसवी.

सही
R. M. Wathodker
Sub Judge
Khamgaon

नो. नं. ३२७

---

## नोटीस.

सक्सेशन अर्ज नं. ६ सन १९१७

सक्सेशन सर्टीफिकेट मिळणें बद्दल जाहिर नामा

विद्यमान सबजज्ज साहेब यांचे कोर्ट मु॥ खामगांव

अर्जदार– गोदावरी जवजे हरकचंद मारवाडी रा० पातुर्डा बु॥ ता० जळगांव

सर्वत्र लोकास कळविण्यांत येते कीं मौजे पातुर्डा बु॥ ता० जळगांव येथें हरकचंद ठाकूरदास हे ता० ११-१२-१६ रोजी मरण पावले. त्याचे इस्टेटी बद्दल वरील अर्जदार गोदावरी जवजे हरकचंद मारवाडी रा० पातुर्डा इनें मैयताचे इस्टेटीबद्दल सक्सेशन सर्टीफिकेट मिळावे ह्मणून अर्ज केला आहे करितां तिला सक्सेशन सर्टीफिकेट कां मिळावे यांचे कारणें दाखविणें असल्यास त्यांनीं ता० ११-८-१७ रोजीं सकाळीं १० वाजतां आमचे समोर हजर व्हावे कळावे ता० २६-७-१७

सही
R. M. Wathodker
Sub Judge
Khamgaon

नो० नं० ३२८

---

## नोटीस

नोटीस बेशमी तुकाराम वा। सखाराम सांगूळवेढे कुणबी व बायनी मर्द तुकाराम सांगूळवेढे कुणबी उभयतां रा. दिनोड ता. आकोट जि. आकोला

यांसीः—

खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं, तुह्मी तारीख २५-२-१९१४ इसवी रोजीं मजजवळून ९०० रुपयाचा भरणा घेतल्याचे कबूल करून रजिष्टर नंबर १२७ सन १९१४ चा तारण गहाणखताचा दस्तैवज लिहून देऊन नोंदून दिला. व सदर्हू रकम देण्याचा करार पांच वर्षांचा केला आहे. सदर्हू गहाणखत केव्हां व कोठें गहाळ झालें ते सांपडत नाहीं. ते तुह्माला सापडले असल्यास किंवा कोणी आणून दिले असल्यास माझे मला परत आणून द्यावे. तसें न करितां आपले जवळ ठेऊन त्याच्या सापडलेल्या गहाणखताचे आधारें वसूलाची किंवा कोणत्याही प्रकारची भानगड उपस्थित केली तरी ती फजूल समजली जाईल. त्या गहाणखतावर भरपाई करून माझ्या खुद आंगठ्याची निशानी करून घेतल्या शिवाय तशा प्रकारच्या भानगडी मला मुळींच कबूल नाहीं. तुह्मी मला आतांपर्यंत मुळींच वसूल दिला नाहीं. ही गोष्ट या नोटिशीनें आपणास कळविली आहे. आज ता. २१ जुलै १९१७ दस्तुर डी. डी. गुलालकर पिटीशन रायटर डिस्ट्रिक्ट कोर्ट आकोला.

सही

सहीची निशाणी रायभान वा। परशराम कोर्डे कुणबी रा. सासनबुजरुक याचा खुद हातचा आंगठा दस्तुर वर प्रमाणें

नो. नं. ३२९

---

## नोटीस.

खालीं सही करणार जनी मर्द गणू जात कुणबी रा. सागत ता. बाळापूर

नोटिस बेशमी गणु वा। नारायण कुणबी रा. कोद्री ता. जळगांव

यांसः—

नोटीस देण्यांत येते ती येणे प्रमाणें:—

तुह्मी माझ्याशीं गंधर्व करून आज सव्वा वर्ष झाले. तुह्मी मला अंदाज २॥ माहिने वागविले. त्यानंतर तुह्मी माझ्या अंगावरचे सर्व दागिने काढून घेऊन मला माझ्या भावाकडे आणून घातले. व त्यानंतर मी तुह्मास मला घेऊन जाण्यास कित्येकवेळां निरोप पाठविले. परंतु आज अंदाज १ वर्ष झाले तुह्मी मला घेऊन जात नाहीं, व सर्वांस असें सांगतां कीं, "तुह्मी मला यापुढें कधीं ही वागविणार नाहीं." मी आपल्या भावाकडून कर्ज काढून अन्नवस्त्राची

व्यवस्था करीत आहे. व आतां १ वर्ष झाले व तो आतां मला कर्ज ही देत नाहीं. किंवा माझें पालन पोषण करण्यास ही तयार नाहीं, अशा रीतीनें मी अनाथ झाले आहे. मी तुमच्याकडेस येण्यास केव्हां ही तयार आहे. तरी तुह्मी मला घेऊन जावे, व योग्य रीतीनें मला तुह्मी वागवावे. किंवा मला माझ्या अन्नवस्त्रा करितां दरमहा कमींत कमी १० दहा रुपये माझ्याकडे पाठवावे किंवा मला फारकत द्यावी. ह्मणजे मी धर्माप्रमाणें व कायदेशीर दुसरा घरठाव करीन. ह्यापैकीं तुह्मी कोणचीच गोष्ट १५ दिवसाचे आंत केली नाहीं तर मला कायद्याप्रमाणें कोर्टा-तून जी योग्य ती व्यवस्था करावी लागेल. तारीख २६-७-१७

सही

१ जनी मर्द गणु कुणबी दस्तुर खुद हातची बांगडी आंगठा

नो. नं. ३३०

## नेटिास

चिरंजीव रा. रा. वासुदेव रामराव देशपांडे प्र० व ता० जळगांव रा० जळगांव ता० मजकूर जि० बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार वामन भाइजी देशपांडे प्र० जळगांव यानकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी व आह्मी एकत्र हिंदु कुटुंबांत उत्पन्न झालो असून तुमचे व आमचे दरम्यान बेबनाव झाल्यामुळें ता० १-६-१९१६ ईसवी रोजीं तुह्मी आह्मास जंगम जिनगीची वांटणी करून आमचे हिश्याची जंगम जिनगी आमचे स्वाधीन केली ती आह्मी घेऊन भरून पावलो; परंतु एक रु० १०० चे गहाण-खत व दुसरा रु० १०० चा कर्जरोखा आपले उभयांचे नांवचा व मागील दोन-वर्षां पूर्वीं लोकांना उसनवारी बरोबरीनें दिलेली जवारी खंडी ८ (लहानै पायलीची) फक्त समाईकांत आहे. त्या दिवशांपासून तुह्मी व आह्मी विभक्त राहिलों. तुमचा व आमचा या सालचे रुसुमाचे रकमेचे निम्मे हिशा संबंधानें वांधा पडला असून तुह्मी आह्मास आमचे हिश्याची रक्कम ही देत नाहीं व स्थावर जिनगीची वांटणी करून आमचा हिस्सा आमचे कबजांत देत नाहीं. तुमचे कडून आह्मास साल मजकूरचे शेतांचे नफ्याची रक्कम व घरीं वाहिलेले शेतांचें उत्पन्न सारा वजा जातां आह्मास पूर्ण मिळालें आहे परंतू तुह्मास जमिनीची व घराची वांटणी करून मागितली असतां त्याचा तुह्मी अद्याप पावेतों निकाल करीत नाहीं व साल-मजकूरचे लवाजम्याचे हिश्याची रक्कम आह्मास देऊन पावती घेत नाहीं. सबब या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येतेकीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आत आमचे हिश्याची स्थावर मिळकत घरें व शेतें वगैरे आमचे कबजांत द्यावी व रुसुमाचे रकमेपैकीं निम्मे रकम आह्मास देऊन आमची पावती घ्यावी तसें न केल्यास आह्मास कोर्टांत जाणें भाग पडून आपणासही विनाकारण ज्यास्त खर्चांत बुडविले जाईल. तसें होऊ नये ह्मणून तुह्मास अगोदर कळविलें आहे कळावे हा आशिर्वाद ता० २० जुलै सन १९१७ इसवी.

सही.

वामन भाईजी देशपांडे रा० जळगांव दस्तुर खुद्द.

नो. नं. ३१

---

वऱ्हाडसमाचार

श्रावण शुद्ध ११ पिंगल संवत्सर १८३९

## कळ लावणारें भावंड,

हिंदुस्थानांत हिंदु मुसलमानांची राजकीय चळवळीपुरती एकी झाली, नेमस्त अणि जहाल हे पक्ष भेद मोडून एकच राष्ट्रीय पक्ष निर्माण झाला व राजकीय सुधार-णांची मागणी जोरानें होऊं लागल्यापासून या मागणीच्या न्याय्यान्याय्यतेचा विचार करण्याची बुद्धि विचारी इंग्रजांस होऊं लागली; सरकारनें आपण धोरण जाहिर करावे ही मुंबईच्या कांग्रेसनें अध्यक्ष सर सत्येंद्रप्रसन्न सिंह यांच्या मुखानें केलेल्या मागणीला मुंबईच्या टाइम्स पत्रानें ही दुजोरा दिला, आणि हिंदी लोकांच्या आकांक्षाची अंशतः तरी तृप्ति लवकरच होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, हा सगळा प्रकार पाहून ज्यांच्या पोटांत दुखूं लागलें आहे अशांनीं मागासलेल्या व अस्पृश्य जातीच्या कैवाराचें निमित्त पुढें करून 'येन केन प्रकारेण' प्रसिद्धीस येण्याची प्रस्तुतची संधी साध-ण्याचा संकल्प केलेला दिसत आहे मद्रा-सेस जस्टिस, व बंगाल्यांत 'वार्तवह' हीं वर्तमानपत्रें अशाच रीतीनें निर्माण झालीं आणि कित्येक मतलबी इंग्रजांनीं त्यांची पाठ थोपटली हें पाहून तो मान आपणास ही मिळावा अशी क्षुद्र बुद्धि धारण कर-णारे महाराष्ट्रांत अद्याप कोणीच कसे प्रकट होत नाहींत याचें आश्चर्य लोक करीत होते, इतक्यांत महाराष्ट्राच्या बुद्धिकेंद्रांत-पुणें शहरीं—असें एक भावंड जन्मास आ-ल्याचें कळलें. हें भावंड ह्मणजे पुण्यास गेल्या शुक्रवारपासून प्रसिद्ध होऊं लागलेलें 'जागरूक' हें साप्ताहिक पत्र होय. या पत्राच्या पहिल्याच अंकावरून त्याचें जातक वर्तवितां येण्यासारखें आहे. कारण, याच्या संपादकांनीं पहिल्याच अंकांत जो नंगा नाच केला आहे त्यावरून उत्तरोत्तर हें बाळ पुढें कोणकोणते गुण उधळणार आहे याचा अंदाज कोणाला ही करतां येण्या-सारखा आहे. या बाळाचे पहिलेच बोल अत्यंत पोरकट, मत्सराचे निदर्शक व अशुभ आहेत. या पत्राच्या विचारांची घाण किती असह्य आहे याची कल्पना वाचकांस करून देण्यासाठीं त्या विचारांचा गोषवारा आह्मी येथें देत आहों. तो असा—

ब्राह्मणांनीं स्वतःचें वर्चस्व समाजांत कायम राखण्यासाठीं व इतरांकडून पूजा मिळविण्यासाठीं इतर वर्णांना विद्येपासून बहिष्कृत ठेवून माणुसकीच्या खऱ्या कल्प-नांचा प्रसार होऊं दिला नाहीं; याचा परिणाम असा झाला आहे कीं मागासलेल्या जातींना कसल्याही अन्यायाची चीड येईनाशी झाली आहे व त्या अन्यायाचा प्रतिकार करण्यास त्यांचे ठायी उत्सुकता राहिलेली नाहीं. सर्व प्रांतांतील सुशिक्षितांत जें दळ-णवळण राष्ट्रहित साधण्याच्या इच्छेच्या रूपानें दिसूं लागलें आहे तें केवळ स्वार्थप्रेरित आहे; अशा स्वार्थसाधु पुढाऱ्यांचा जेथें भरणा आहे तेथें स्वतःचा कारभार पाहण्याचें सामर्थ्य व स्वावलंबन आलें असें समजणें हा भ्रम आहे. पाश्चात्य लेखकांचीं प्रमेयें—त्यांत योग्य तो फेरफार करून—आपल्या धोरणाला कशीं जुळतीं करून घ्यावी तें कसब रा. हरि-भाऊ आपटे व भारत सेवकाचे संपादक यांच्या सारख्या लेखकांना चांगलें साधलें आहे. समाज ह्मणजे वरिष्ठ जातीचा तांडा ही भावना 'इंडियन सोशल रिफार्मर सारख्या सुधारक पत्राच्या संपादकाच्या डोक्यांतून ही अद्याप गेलेली नाहीं. 'केसरी' सारख्या सर्वश्रेष्ठ पत्राच्या अंगीं हा समंज-सपणा नाहीं. ब्राह्मणासारख्या वरिष्ठ जातीची हेटाळणी व निंदा तें पत्र करूं लागेल, तेव्हांच समंजसपणाचें सर्टिफिकीट त्याला देतां येईल. लॉर्ड हार्डिंज साहेबांच्या काम-गिरीसंबंधानें 'अमृतबजार पात्रिके'चें विशेष अनुकूळ मत नाहीं, यावरून त्या साहेबांना हिंदी लोकांची सहानुभूति नाहीं असें ह्मटलें पाहिजे. सध्या होमरूलची ओरड फक्त एकाच—तोंड पाटिलकी करणाऱ्या—ब्राह्मण-वर्गाकडून होत असते. इतर जातींची त्या चळवळीला सहानुभूति नाहीं, इतकेंच नाहीं, तर तिची माहिती सुद्धां त्यांस नाहीं. इतर जातींच्या सभा त्या चळवळीची माहिती त्यांना करून देण्यासाठीं येतात, पण ती सरकारला चकविण्यासाठीं केलेली केवळ लबाडी आहे; शिक्षणामुळें ब्राह्मणांत जर कांहीं फरक झाला असला तर तो केवळ बाह्यांगांत झाला आहे; अतरंग पालटलेलें नाहीं. ब्रिटिश सत्तेचा वडगा त्यांना इतर जातींवर जुलूम करूं देत नाहीं ह्मणून ब्राह्मणलोकांचा निरु-पाय झाला आहे, नाहींतर त्यांनीं तो केला असता. मागसलेल्या लोकांविषयीं ब्राह्म-णांच्या मनांत पूर्ण तिरस्कार आहे व सम तेच्या तत्त्वाला ते पायाखालीं तुडवित आहेत. सुशिक्षित ब्राह्मणेतर ही इतके स्वाभिमान-शून्य झाले आहेत कीं ब्राह्मणांना शिव्या देणाऱ्या सत्यशोधक समाजाला त्यांच्याकडून मदत होत नाहीं व त्यामुळें अशिक्षितांवर त्या समाजाला आपली भिस्त ठेवावी लागत आहे, इ इ.

आमच्या नूतन भावंडाचे वरील विचार इतके असंबद्ध, क्षुद्रबुद्धीचे, सत्यापलाप कर-णारे, आणि जातीजातींत वैमनस्य उत्पन्न करणारे आहेत कीं ते एखाद्या मद्यप्याच्या तोंडून निघाले असते तरी अक्षम्य गणिले गेले असते. पण ते युनिव्हर्सिटीची 'शेपटी' लावणाऱ्या एका सुशिक्षित ह्मणविणाऱ्या लेख-काचे आहेत, व जवळजवळ त्यांचीच 'री' त्याच अंकांत पण पद्यरूपानें रा. दत्तात्रय भिमाजी रणदिवे यांनीं ओढिलेली आहे, हें पाहून मनाला अत्यंत खेद व विषाद वाटतो. उभय लेखक व कवि कादंबरी-कार आहेत. पण आपलें कादंबरीरचना-कौशल्याचें प्रदर्शन त्यांनीं अशा रीतीनें केलेलें पाहून कोणालाही त्याबद्दल कौतुक करा-वेंसें वाटणार नाहीं. ज्यांना मागच्या उखाळ्या पाखाळ्या काढून जातीजातींतले मिटत अस-लेले भेद उकरून काढण्यांतच आनंद वाटतो, मागासलेल्या जातींचा उद्धार कर-ण्याची खटपट ब्राह्मणजातीकडून किंवा त्यां-च्याच उदार आश्रयानें होत आहे हें ज्यांना दिसत नाहीं, अनेक पिढ्या अंगांत मुरलेल्या कल्पना हळूं हळूंच नष्ट होत जातील, हें माहित असूनही आज ब्राह्मण महारांशीं रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करीत नाहींत ह्मणून जे ब्राह्मणांच्या नांवानें खडे फोडीत आहेत, होमरूलच्या चळवळींत मुसलमान पारशी, इंग्रजवगैरे इतर जाती सुद्धां सामिल आहेत असें असून ती केवळ ब्राह्मणांचीच चळ-वळ आहे, असें ठासून सांगण्याइतकी ज्यांची सत्यानिष्ठा तीव्र आहे, अशा या 'जागरूक' पत्राच्या संपादकाला व त्यांच्या साह्यकर्त्या कविमित्राला आह्मी येवढेंच विचा-रतों कीं यच्चयावत् सगळी ब्राह्मण जात लुच्ची, लबाड, हरामखोर व मतलबी आहे, त्यांच्यांत एकही मनुष्य उदारमताचा व पवित्र आचरणाचा नाहीं अशी कां तुमची समजूत आहे? आणि उलट अस्पृश्य जाती-विषयीं समताबुद्धि बाळगणारे व त्यांना ब्राह्मणांनीं समतेनें वागवावें असें ह्मणणारे तुह्मी अहंमन्य लेखक तरी महार वगैरे अस्पृश्य जातीशीं रोटीव्यवहार व बेटीव्यव-हार वगैरे सुधारणा एकदम करून दाख-विण्यास तयार आहां काय? असल्यास अस्पृश्य जातीविषयींचें इतकें उत्कट प्रेम व न्यायबुद्धि यांची मजल प्रत्यक्ष कृतीप-र्यंत अजून कां गेली नाहीं? ती गेली नाहीं तोंपर्यंत तुह्मी सुद्धां होमरूलर सारखे बोलघेवडेच ठरत नाहीं काय? तुमचा हा वाचाळपणा आणी ब्राह्मणजातीविषयींचा दीर्घद्वेष यांनीं देशांत जातीजातींमध्यें वैमनस्य वाढविण्या-पलीकडे कोणता फायदा होणार आहे? तुमचें पत्र छापून देण्याचें पुण्यांतले छाप-खानेवाले साफ नाकारीत होते अशावेळीं तुह्मी ज्या ब्राह्मणजातीसंबंधानें सरसकट दोषारोप केला आहे त्याच ब्राह्मणवर्गांतला 'खांडेकर' तुमचें कोड पुरविण्यास पुढें झाला, यावरून तरी तुमचा दोषारोप खोटा आहे याविषयींची खात्री तुमच्या मनाला पटावयास नको होती काय? तुमच्या पत्राचा जन्म मागासलेल्या व अस्पृश्य जातीचा उद्धार करण्यासाठीं आहे कीं ब्राह्मणांना नुसत्या शिव्या देण्यासाठीं आहे? जर उद्धा-रासाठीं असेल तर तुमच्या पहिल्याच अंकांत उद्धाराचा एक हा उपाय न सुचवितां ब्राह्मणजातीविषयींच्या द्वेषमूलक शद्बांनीं मात्र तुमच्या पत्राचे १० कॉलम भरले आहेत यांतले इंगित काय?

---

## वतनदारी.

मध्य प्रदेशांतील मुकदम व वऱ्हाड प्रांतां-तील पाटीलकी व पटवारी नियम यांत अती ढोबळ फरक आहे. मध्य प्रदेशांत मालगुजारी पद्धत आहे. व क्वचित् ठिकाणीं गांवें बसविण्या करितां रयतवारी पद्धत आहे. रयतवारी पद्धतींत जे दोन फरक आहेत त्यांचें विस्तृत वर्णन करण्याची या लेखांत अवश्यकता नाहीं. तीं गांवें 'सरकारचीं

असतात व त्या गावांचा मालगुजार खास सरकारच असते. ही गोष्ट लक्षांत ठेवल्यावर मध्य प्रदेशांत सर्व दूर मालगुजारी पद्धत आहे असेंच ह्मणावें लागेल. मालगुजारांत किती ही हिस्से असले तरी सर्व हिस्सेदारांतर्फे सरकारास ही व्यवहार करण्याकरितां लंबरदार मुकर असतो. व जो लंबरदार असेल तोच मोकदम असला पाहिजे असा कायदा आहे. मुकद्दम जातीनें काम करूं शकत नसेल तर त्यास (Indian Contract Act) खालीं मुखत्यार नेमून देतां येतो. ही गोष्ट पाटला संबंधानें झाली.

मध्य प्रदेशांत वतनदार पटवारी बहुतेक नाहींसे केले आहेत. हल्लीं पटवाऱ्यांच्या जागा सरकारी इतर खात्यांतील रिकाम्या जागाप्रमाणें भरल्या जात आहेत ह्मणजे मध्यप्रांतांत पाटील आणि पटवारी हा वर्ग वऱ्हाड प्रांतांतील वर्गाप्रमाणें वतनदार वर्ग नाहीं.

**तर मग वऱ्हाडांत कोणती पद्धति आहे.**

वऱ्हाडांत पाटील पटवारी मिरास हक्काचे वतनदार समजले जातात. व हीं वतनें आपणाकडे राहावी ह्मणून उत्पन्नाच्या मानानें ५०।६० पट खर्च करण्यास ते लोक तयार असतात. हीं वतनें फारशीं मोहक नसून दारिद्र्याचा किंवा अपमानाचा सहज मार्ग आहेत असें ही ह्याच वतनदार लोकांस वाटत असते. व्यवहारांतील त्यांच्या घरांत ज्या प्रचलित ह्मणी आहेत त्या ह्मणीवरून सुद्धां त्यांची ही दृढ समजूत आहे असें त्यांच्या पूर्ण अनुभवास आलें आहे याची खात्री पटवितात.

**असें असून या वतना करितां धडपड कां?**

साहजीकच असा प्रश्न उद्भवतो कीं हीं दोन वतनें सुखोत्पादक नसून उलट दुःखोत्पादक असतां ही त्यांसाठीं लोकांची एवढी धडपड कां? याचें उत्तर इतकेंच कीं हीं वतनें लोक समजुतीप्रमाणें मोठ्या कौटुंबिक मानाचीं व्यंजक आहेत असें लोकांत मानलें जातें. ज्या गांवांत हे वतनदार असतात त्या गावांतच यांची प्रतिष्ठा असते असें नाहीं तर सोयरिकी वगैरे सामाजिक बाबतींत या वतनदारांस मोठी मान्यता मिळत असते. ह्मणजे सामाजिक [illegible] धडपड असते. ही गोष्ट [illegible] अधिकाऱ्यांच्या नजरेस आलेली आहे. नामदार स्लाय साहेब सारख्या अधिकाऱ्यांनीं ही लोकांची धडपड उर्फ तृष्णा कां असते हें अनेक वेळां सरकारी रिपोर्टांत नमूद केलेलें आहे. शिवाय या लोकतृष्णेस जितकें उत्तेजन देववेल तितकें उत्तेजनच देऊन या वतनदारांस मिळेल तितका न्याय द्यावा हीच सर्व चीफ कमिशनर व हैद्राबादचे सर्व रेसिडेंट यांची शिस्त आणि पद्धति होती. परंतु

**फिनॅनशिअल कमिशनर**

यांची नवीन जागा निर्माण झाल्यापासून ह्या वतना संबंधानें विशेष भानगडीचे प्रश्न ह्मणजेः—

१—नवीन नेमणुका.
२—आकटा.
३—बदली काम करणारांच्या नेमणुका.

वरील तिन्ही बाबीं बद्दल सरकारी नियम इतके स्पष्ट आहेत कीं त्यां करितां एक स्वतंत्र कायदा हिंदुस्थान सरकारनें केलेला आहे व त्या कायद्यास कसे पाळावें या बद्दल २० ठराव ही सरकारनें छापून प्रसिद्ध केले आहेत. कायदा फार सोपा व स्पष्टार्थाचा असून २० पर्यंत करून छापलेले निवाडे कायद्याबद्दल फारशी शंकेस जागाच देत नाहींत.

**तरी पण**

या कायद्याची अंमल बजावणी हल्लींच्या अधिकार विभागणीमुळें प्रायः **सब डिव्हीजनल ऑफिसरांकडे** असते यांच्या हुशारीचे आणि कायदे पांडित्याचें प्रमाण त्यांच्या अनेक भिन्न भिन्न गुण वैशिष्ट्यामुळें भिन्न भिन्न असतें. त्यामुळें एकाच स्थूल नेमानें सर्वांस न्याय देणें फार कठीण जातें. त्यांत कित्येक अधिकाऱ्यांस आणीच अपेलेट कोर्टाचें मत आपल्याकडे करून घेऊन मग निवाडा देण्याइतकें खांबीर्य असतें.

**अपील कोर्टें तरी**

मानवी प्राणीच असतात. तीं या स्थानिक वतनदारांच्या बद्दल कांहीं तरी अनुकूळ अगर प्रतिकूळ ग्रह ठरऊन बसलेलीं असतात. प्रत्येक अपिलेट कोर्टाचें धोरण समानच नसतें. फारतर काय पण एका जिल्ह्यांत नवीन अधिकारी अपिलेट कोर्टावर आले ह्मणजे पूर्वीच्या अधिकाऱ्याच्या धोरणाशीं नवीन येणाऱ्या अधिकाऱ्याचें धोरण विसंगत पडतें. यामुळें कायद्याच्या उद्देशांत व बजावणींत महदंतर पडतें. प्रायः सब डिव्हीजनल आफिसरचा न्याय तोच डेपुटि कमिशनराचा न्याय असतो. अंमलबजावणी खात्यास उभयतां ऑफिसरांचा एकभाव असणें अत्यंत जरूर आहे. परंतु जेथें दुसऱ्याच्या कायदेशीर हक्कांचें पालन करावयाचें असेल तेथें हट्टीपणा, दुराग्रह, साधे व्यावहारिक सेव्य सेवक भावाचें तत्व अलौकिक गुण परीक्षण व काल्पनिक गुणाभावास अपराध समजून तदनुरूप दंड इत्यादि गोष्टी न्यायपद्धतींत शिरूं पहातील तर या वतनदारांस हक्क ते कोणते राहाणार?

---

**होमरूल आणि देशी संस्थानांतले अधिकारी.**

होमरूलची चळवळ कायदेशीर असली तरी ती सरकारी अधिकाऱ्यांना [illegible] आहे असें कळतांच कित्येक देशी संस्थानांतले अधिकारी त्या चळवळीविरुद्ध 'पायोनियर' सारख्या इंग्रजी पत्रांतून आक्षेप घेणारी पत्रें स्वतःच्या नांवावर प्रसिद्ध करूं लागले आहेत. रतलाम संस्थानच्या कौंसिलचे सीनियर मेंबर पं. झुतशी व धार संस्थानच्या कौंसिलचे सेक्रेटरी मि. ललिता प्रसाद वर्मा यांचीं पत्रें नुकतींच प्रसिद्ध झालीं आहेत. या अधिकाऱ्यांनीं आपल्या पायाखालीं काय जळत आहे तें न पाहतां ज्या चळवळीशीं आपला अर्थाअर्थी संबंध नाहीं व जिच्या मूलभूत तत्त्वाशीं ही आपला परिचय नाहीं अशा गोष्टीसंबंधानें मूर्खपणानें कांहीं तरी बहकत सुटावें व त्या त्या संस्थानांच्या अधिपतींनीं आपल्या अधिकाऱ्यांना असल्या मूर्खपणाचें प्रदर्शन करूं द्यावें याचें आह्मांस नवल वाटतें. हिंदुस्थानांतल्या सध्याच्या ब्रिटिश राज्यपद्धतीचे गोडवे गाण्यांत पं. झुतशी इतके गर्क झाले आहेत कीं त्या भरांत देशी संस्थानांतल्या राज्यकारभाराला नांवें ठेवण्यानें आपण स्वतःचें नाक कापून दुसऱ्याला अपशकुन करण्यासारखा अव्यापारेषु व्यापार करीत आहों याचें ही भान त्यांना राहिलें नाहीं. होमरूलच्या तत्त्वाविषयींचें त्यांचें ज्ञान इतकें अगाध आहे कीं देशी संस्थानांतली राज्यपद्धति हीच होमरूलची पद्धति असें ते समजत आहेत! नुसतें अज्ञानच असतें तर तें ही पतकरतें पण त्या अज्ञानाच्या साहचर्यानें अधिकारमद ही वास करीत आहे असें त्यांच्या पत्रावरून दिसतें. कारण, आपल्या संस्थानांत ब्रिटिश सरकारावर जर कोणी टीका करील तर तो सरकारची बदनामी करणारा समजला जाईल अशी धमकी ही त्यांनीं घातली आहे. ज्या संस्थानांतून अशा अधिकाऱ्यांचे चाळे बेलाशक खपतात त्या संस्थानाच्या कारभाराविषयीं लोकांना तिटकारा वाटूं लागला, व संस्थानची प्रजा ब्रिटिश अंमलांतल्या प्रजेच्या स्वातंत्र्याचा हेवा करूं लागली तर आश्चर्य नाहीं. पण हा हेवा सुद्धां त्यांनीं मनांतल्या मनांत केला पाहिजे. शब्दांनीं तो व्यक्त करण्याची सुद्धां त्यांना चोरी आहे. हा हेवा **व्यक्त** केल्याबद्दल इंदूरचे डा. तांबे यांना त्या संस्थानाकडून मिळालेली कडक शिक्षा उदाहरण ह्मणून सर्वांच्या पुढें आहेच.

---

**दुसरे एक गोमाजी.**

होमरूलच्या चळवळी विरुद्ध आक्षेप घेणारे दुसरे एक गोमाजी पायोनियर पत्राच्या ता० २३ च्या अंकांत पुढें आले आहेत. धारचे मि. वर्मा हे ते गोमाजी होत. यांनीं घेतलेले कित्येक आक्षेप अगदीं शिळे आहेत, व जे नवे आहेत ते खोडसाळपणाचे व निराधार आहेत- 'हिंदुस्थानांत भिन्नजाति, भिन्नधर्म, भिन्नभाषा वगैरे असतां हिंदी लोकांचे एक राष्ट्र कसें होऊं शकेल?' [illegible] जागला [illegible] आहे. हें मत प्रामाणिकपणाचें असेल तर त्यांनीं कौंसिल सेक्रेटरीसारख्या जबाबदारीच्या जागेचा राजीनामा तत्काळ देऊन मोकळे व्हावें, किंवा आपल्या 'हिंदीत्वा' वरचा हक्क सोडण्यास तरी तयार व्हावें या शिवाय सरळपणाचा अन्य मार्ग दिसत नाहीं.

---

**लोकप्रतिनिधींचें मुख्य कर्तव्य.**

ता. ९ जूनच्या लंडन टाइम्स पत्रांत पार्लमेंटांतल्या लोकप्रतिनिधींचें मुख्य कर्तव्य या विषयावर एक अग्रलेख आला आहे. हा विषय चर्चेला घेण्याचें कारण असें झालें कीं व्हिटसन टाइडच्या सुटीमुळें पार्लमेंट बंद होतें त्यावेळीं एक ही पार्लमेंटचा सभासद आपल्या मतदारांना भेटला नाहीं, व आपण कर्तव्याला जागलों आहों किंवा झोंप घेत पडलों आहों याची खबर भाषणाच्या रूपानें त्यानें मतदारास दिली नाहीं. आपल्या मतदारांना व सामान्यतः जनतेला प्रचलित राजकीय विषयावर भाषणद्वारा शिक्षण देणें हें पार्लमेंटांत बसणाऱ्या प्रत्येक सभासदाचें कर्तव्य आहे. हिंदुस्थानांत राजकीय व्याख्यानें व वर्तमानपत्रांतले लेख यांवर कडक नजर ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांनीं व त्याचप्रमाणें लोकप्रतिनिधि ह्मणून कायदेकौंसिलांतली खुर्ची भूषित करणारांनीं लंडन टाइम्समधला वरील लेख अवश्य वाचावा अशी आह्मी शिफारस करतों. सदर पत्र पुढें आणखी ह्मणतें कीं लीडस् येथें भरणाऱ्या सोशियालिस्ट कान्फरन्समध्यें लढाईच्या संबंधांत खोड्यानाळ्या गोष्टी सांगण्यांत आल्या ह्मणून सरकारी अधिकाऱ्यांनीं घाबरण्याचें कारण नाहीं. अशा राजकारणी सभांना अटकाव करण्यापेक्षां खुशाल भरूं द्याव्या, आणि त्यांत ज्या खोड्यानाळ्या गोष्टी सांगण्यांत येतील त्यांतल्या असत्य भागाचें सरकारी जाहिरपत्रकाच्या द्वारें आविष्करण करावें ह्मणजे झालें. टाइम्सपत्रांत असेंही ह्मणणें आहे कीं लढाईच्यावेळीं खांद्यावर बंदूक टाकून लष्करांत भरती होणें हें नागरिकाचें जितकें अवश्य कर्तव्य आहे त्यापेक्षां लोकांना खऱ्या स्थितीचें ज्ञान करून देऊन त्यांच्यांत जागृति करून देणें हें काम कमी अगत्याचें अगर कमी महत्त्वाचें नाहीं. हें काम जो करील तो खरा नागरिक व खरा देशाभिमानी पुरुष होय. मिसेस बिझांट व त्यांचे दोघे मित्र यांना अटकेंत ठेवणाऱ्या मद्रास सरकारचें टाइम्सच्या या शिकवणीकडे लक्ष जाईल अशी आह्मी आशा करतों.

---

**संयुक्त प्रांताचा रुसवा.**

मद्रास सरकारनें मिसेस बिझांट, वाडिया व अरंडेल यांनीं अटक केल्यापासून संयुक्त प्रांताचे पुढाऱ्यांनीं रुसवा धरून भारतरक्षक सैन्यांत भरती करण्याचे कामीं सरकारास आपली सहकारिता देण्याचें काम बंद ठेविलें आहे हें ऐकून आह्मांस अत्यंत खेद [illegible] चार गोष्टी सांगून योग्य मार्गाला लावणें हें पुढाऱ्यांचें काम होतें. ज्या हक्कासाठीं कांग्रेसनें इतकीं वर्षें आक्रोश केला तो हक्क अनपेक्षित प्रसंगामुळें आयता प्राप्त झाला असतां त्याचा अव्हेर करणें हा शहाणपणा कोठचा? सार्वजनिक जीवनांत कठोर निराशेचे, विक्षेपण क्षेत्र आणणारे किंबहुना मानहानीचे ही प्रसंग अनेक येत असतात; पण त्यांना तोंड देऊन मनःक्षुब्धतेच्या धुकांतून आपल्या उन्नतीचा मार्ग काढणें याचेंच नांव व्यावहारिक चातुर्य उर्फ मुत्सद्दीगिरी. लष्करांत भरती होणारांना

ज्या सवलती मिळणें अवश्य आहे त्या सरकाराकडून मिळत नाहींत ही गोष्ट खरी आहे. पण आपल्या सरकाराविषयींचें आपलें कर्तव्य बजावण्यास तयार होऊन मग त्या सवलती मिळण्याविषयींची खटपट चालूं ठेविली पाहिजे. लष्करांत शिरण्याची स्फूर्ति राजनिष्ठेनें आणि देशसेवेच्या आतुर इच्छेनें झाली आहे, स्वार्थबुद्धीनें नव्हे, ही गोष्ट ब्रिटिश अधिकाऱ्यांना खात्रीपूर्वक पटल्यावर योग्य सवलती मिळण्यास उशीर लागावयाचा नाहीं. हिंदुस्थानच्या बाकीच्या प्रांतांतले तरुण देशकार्यासाठीं राजनिष्ठेनें प्रेरित होऊन 'मारिन किंवा मरेन' या निश्चयानें पुढें झाले असतां संयुक्त प्रांत तेवढा या कार्यापासून अलिप्त राहिला तर तें त्या प्रांतालाच नव्हे, तर एकंदर हिंदुस्थान देशाच्या पुढाऱ्यांस लांछनास्पद व देशाच्या हितास विघातक होईल. संयुक्त प्रांताच्या पुढाऱ्यांप्रमाणें इतर प्रांतांतल्या पुढाऱ्यांनीं रुसवा न धरतां आपलें कर्तव्य यथाशक्ति केलें आहे यावरून तरी आपला मार्ग खास चुकत आहे अशी शंका सं. प्रांताच्या पुढाऱ्यांच्या मनांत यावयास पाहिजे होती. पण ती आली नाहीं, किंवा आली असल्यास त्यांनीं तिला दाबून टाकिली व आपल्या रुसव्याला सदसद्विवेकाच्या डोक्यावर नेऊन बसविलें हा प्रकार खरोखर अत्यंत गर्ह्य झाला आहे यांत शंका नाहीं. सगळ्या हिंदुस्थानांतून फक्त सहा हजार शिपाई तूर्त सरकारला पाहिजे आहेत, पण तेवढे ही जर सरकारला मिळाले नाहींत तर हिंदुस्थानचा मोठा दुर्लौकिक होईल व त्याचें अपेश बऱ्याच अंशानें सं. प्रांताच्या पुढाऱ्यांकडे जाईल हें जाणून त्यांनीं पुनः या गोष्टीचा विचार करावा अशी आमची सूचना आहे.

---

## कायदेकौंसिलाची बैठक.

मध्यप्रांत व वऱ्हाड येथील सरकारच्या कायदेकौंसिलाची बैठक ता. १६ जुलै रोजीं झाली. सध्याच्या सभासदांनीं टर्ममधील ही शेवटली बैठक असल्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांचे गोडवे गाण्यापलीकडे व कांहीं गुळचट टीका करण्यापलीकड विशेषसें महत्वाचें कार्य या बैठकींत झालें नाहीं. या प्रसंगीं विचारण्यांत आलेले प्रश्नांपैकीं कांहीं महत्त्वाचे होते व त्यांना सरकारी अधिकाऱ्यांकडून हीं सरळ उत्तरें देण्यांत आलीं. सरकारी अधिकाऱ्यांचें हें सौजन्य खरोखर प्रशंसनीय आहे. खाजगी शाळांतील ट्रेन्ड शिक्षकांस स्पेशल ग्रांट मधून अधिक पगार देण्यासंबंधाच्या ना. सिंह यांच्या प्रश्नास दिलेल्या उत्तरांत ना. मि. मेह्यू यांनीं जी अचडण दाखविली आहे ती अपरिहार्य आहे असें नाहीं. शिक्षकांच्या कार्याचें महत्त्व व त्या मानानें त्यांचे हलके पगार या दोन गोष्टी जर सरकारी अधिकाऱ्यांना कबूल आहेत, तर त्यांना ज्यास्त पगार मिळेल अशी कांहीं तरी तजवीज करणें रास्त आहे व अशी तजवीज सरकारी अधिकारी अवश्य करतील असें त्यांच्या उत्तरावरून दिसतें. वऱ्हाडासाठीं उमरावती येथें एक स्वतंत्र आर्ट्स कॉलेज काढण्याची फार अवश्यकता आहे व तो प्रश्न आज बरेच दिवस सरकारापुढें विचारासाठीं आहे त्या योजनेची मजल कोठपर्यंत गेली आहे असें ना. मि. जोशी यांनीं विचारल्यावरून ना. मि. स्लोकॉक यांनीं सांगितलें कीं सदर योजना हिंदुस्थान सरकारला पसंत पडली असून ती स्टेट सेक्रेटरी साहेबांकडे आपल्या शिफारशीसह पाठविण्याचें हिंदुस्थान सरकारनें पतकरलें आहे. येथपर्यंत ठीक आहे आतां लढाईच्या खर्चाच्या सबबीवर स्टेट सेक्रेटरी साहेबांकडून ती फेटाळून लावण्यांत येते कीं काय येवढें पाहावयाचें आहे नवे स्टेट सेक्रेटरी मि. मांटेग्यु यांच्याकडून ज्या अनेक गोष्टींची अपेक्षा हिंदुस्थान करीत आहेत, त्यांत विद्याप्रसार ही एक मोठी बाब असल्यामुळें त्यांच्याकडून या गोष्टीस कांहीं आडकाठी येण्याचा फारसा संभव दिसत नाहीं. मध्यप्रांताच्या युनिव्हर्सिटीचा प्रश्न सध्या हिंदुस्थान सरकारापुढें विचारासाठीं आहे पाटणा युनिव्हर्सिटीच्या बाबतींत ज्याप्रमाणें सरकारचे मुख्य शिक्षणमंत्री ना. मि. शंकरन् नायर यांनीं उत्साह व लोकमताविषयीं आदर दाखविला, तसा मध्यप्रांताच्या युनिव्हर्सिटीचे बाबतींत ही ते दाखवितील अशी अपेक्षा करणें गैरवाजवी होणार नाहीं. मि. कीरनांडर यांना एग्झिक्युटिव्ह शाखेंतून ज्युडिशियल खात्यांत घेतल्याबद्दलच्या ना. रा. ब. केळकर यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना सरकारला तसें कां करावें लागलें याचीं कारणें ना. मि स्लोकॉक यांनीं दिलीं आहेत. त्यांवरून तसें करण्याखेरीज सरकारला दुसरा मार्ग नव्हता असें दिसतें. पण योग्य प्रसंगीं तरी पुनः त्यांची बदली एग्झिक्युटिव्ह शाखेंत करून सरकार तक्रारीला जागा रहूं देणार नाहीं अशी आम्ही आशा करतों.

---

## मध्यप्रांतांतली अटकबंदी.

इंडिया डिफेन्स आक्टाखालीं मध्य प्रांतात ज्यांना अटक करण्यांत आली त्यांचीं नांवें व त्यांच्यासाठीं सरकारला वार्षिक खर्च किती येतो त्याबद्दलची माहिती ना. रा. ब. केळकर यांनीं विचारली होती. या त्यांच्या प्रश्नास मात्र सरकारी अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. अटक केलेल्यांचीं नांवें न देतां नुसती संख्या देण्यांत आली व त्यापैकीं ६ हिंदुस्थान सरकारच्या व ३ ना. मे. चिफ कमिशनर साहेबांच्या हुकमानें अटकेंत ठेवण्यांत आले आहेत इतकेंच सांगण्यांत आलें. या पलिकडे जास्त माहिती देतां येत नाहीं असें ना. मि स्लोकॉक यांनीं सांगितलें. अटक केलेल्यांचीं नांवें व त्यांच्या प्रित्यर्थ होणारा सालीना खर्च यांत गुप्त ठेवण्यासारखें काय आहे तें आह्मांस कळत नाहीं. असें निष्कारण गोप्यगोपन करण्यानें लोकांच्या तर्कटांना मात्र वाव मिळतो व तें कोणत्याही दृष्टीनें योग्य नाहीं असें आह्मांस वाटतें.

---

## उपसंहार.

कौंसिलच्या बैठकीचा उपसंहार करतांना ना. चीफ कमिशनर साहेबांनीं केलेलें भाषण सहानुभूतीपर, शहाणपणाचें आणि कळकळीनें केलेल्या उपदेशानें पूर्ण होतें. या भाषणांत मुख्यतः निरनिराळ्या खात्यांनीं केलेल्या प्रगतीचाच निर्देश होता. त्यांतल्या त्यांत शिक्षण व शेतकी या खात्यांच्या उद्योगाचे व पुढील कार्याचें जें त्यांनीं वर्णन केलें तें निराशायुक्त अंतःकरणांत आशेचा अंकुर उत्पन्न करणारें होतें. मध्यप्रांत व वऱ्हाड यांनीं युद्धकर्जाला जें उत्कृष्ट साह्य केलें त्याबद्दल त्यांनीं संतोष प्रदर्शित केला, पण त्या बरोबरच लष्करांत शिपायांची भरती करण्याचें कामांत लोकांची तितकी उत्सुकता दिसली नहीं याबद्दल त्यांनीं खेद व्यक्त केला. सैन्यांत भरती व्हावी तशी होत नाहीं याचें कारण लोकांच्या प्रयत्नाची शिथिलता तर खरीच. पण ही शिथिलता येण्याला जीं विशेष कारणें आहेत, व ज्यांचा उल्लेख वर्तमानपत्रांतून अनेक वेळां झालेलाही आहे तीं दूर झाल्याशिवाय लोकांच्या पुढाऱ्यांनीं कितीही शिकस्तीचे प्रयत्न केले असते तरी त्यांचा विशेषसा उपयोग झाला नसता. जोंपर्यंत हल्लींची स्थिति कायम आहे व तींत सरकार सुधारणा करीत नाहीं, तोंपर्यंत सैन्याच्या भरतीच्या बाबतींत लोकांच्या पुढाऱ्यांना न्यायानें दोषी धरतां येईल असें आह्मांस वाटत नाहीं.

---

## महाराचा जन्म हवा!

शास्त्रज्ञ असें सांगतात कीं हिरा हा एक प्रकारचा कोळसाच आहे, पण तो उच्च प्रतीचा कोळसा आहे इतकेंच. कोळशाचा मात्र हिरा करण्याची युक्ती ह्मणजे खालून वर चढत जाणें हें प्रयासाचें काम आहे. मुंबई सरकारनें महार लोकांची पलटण तयार करण्यासाठीं मुंबईस एक सभा बोलाविली होती. तिच्यापुढें भाषण करतांना असें ह्मटल्याचें प्रसिद्ध झालें आहे कीं मी "महार" झालों असतों तर बरें होतें. सर नारायणराव सारखे ब्राह्मण जेव्हां असे उद्गार काढतात तेव्हां महारांस आपला हीनपणा खचित वाटणार नाहीं. साधुसंत हीन ज्ञाति पुनीत करण्यासाठीं मुद्दाम हलक्या कुळांत जन्म घेतात आणि ह्मणूनच सर नारायणराव हे आपल्या संतपणाच्या वैभवांत 'महार' ज्ञातीचा गौरव आपल्या उद्गारांनीं करीत आहेत. थोर ते थोर!

---

## स्वातंत्र्य आणि स्वराज्याधिकार.

पब्लिक सर्विस कमिशनचे अध्यक्ष व हिंदुस्थानचे विलायतेंतले अंडर सेक्रेटरी लॉर्ड इस्लिंगटन हे सर्वांच्या परिचयाचे आहेत. यांनीं परवा विलायतेंत एका भाषणाचे प्रसंगीं असे उद्गार काढले कीं आपण ब्रिटिश लोक स्वातंत्र्य व हक्क यांच्या रक्षणार्थ नीतिमत्तेच्या ज्या उच्च हेतूनें प्रेरित होऊन प्रस्तुत युद्ध आरंभिलें, त्या हेतूचा ब्रिटिश साम्राज्याच्या सगळ्या अवयवांत प्रसार झाला पाहिजे अशी आपली इच्छा आहे. या प्रसंगीं तीस कोट वस्तीचा हिंदुस्थान देश माझे दृष्टीपुढें आहे. स्वराज्याचे अधिकार प्राप्त झालेल्या कानडा सारख्या देशांपेक्षां हिंदुस्थानची राज्यपद्धति कांहीं बाबतींत निराळी ठेवणें अवश्य आहे, पण कानडासारखे देश व हिंदुस्थान यांचें अंतिम ध्येय एक सारखेंच असलें पाहिजे. ह्मणून कालक्रमानें स्वराज्याचें अंतिम ध्येय सफळ होईल असे फेरफार त्या देशाच्या राज्यपद्धतींत आतां लवकरच केले पाहिजेत. विलायतेंतले सगळे मुत्सद्दी असेच उद्गार काढीत असतात. पण त्या दिशेनें कांहीं दृश्य प्रयत्न होत असल्याचें चिन्ह मात्र दिसत नहीं, याचें कारण काय? वरिष्ठ कौंसिलांच्या १९ सभसदांनीं सुचविलेल्या सुधारणा प्रसिद्ध झाल्या आहेत, तसा हिंदुस्थान सरकारनें सुचविलेल्या सुधारणांचा मसुदा कां प्रसिद्ध होऊं नये? व या दोहोंचा विचार करून अखेरची शिफारस करण्यासाठीं एखादी लहानशी कमिटी अद्याप कां नेमिली जाऊं नये तें कळत नहीं. हिंदुस्थानच्या लोकांना संतुष्ट ठेवण्याच्या प्रश्नाचें महत्त्व सध्याच्या युद्ध प्रसंगीं केवढें आहे याची कल्पना विलायतेंतल्या प्रधानमंडळास नसेल असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. मग घोडें कोठें पेंड खात आहे तें देव जाणे!

---

## महायुद्धाची प्रगति.

रशियाची स्थिति क्षणोक्षणीं पालटत आहे. थोड्याच दिवसापूर्वीं रशियन सैन्यांत ग्यालिशियामध्यें अनेक विजय मिळविलेले ज्यांच्या लक्षांत आहेत त्यांना त्या विजयाच्या पाठोपाठ रशियन सैन्यांत एकाएकी अव्यवस्था होऊन खुद्द पेट्रोग्राड येथें दंगे धोपे झाले व त्यामुळें रशियाला युद्धांत पीछेहाट खावी लागली हें ऐकून केवढें आश्चर्य वाटेल! हा सगळा जर्मनीच्या कृष्णकारस्थानाचा सैतानी खेळ आहे. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं रशियाचीं राज्यसूत्रें ज्यांच्या हातीं आहेत त्यांच्या धैर्याची, शहाणपणाची आणि आष्टावधानीपणाची खरी परिक्षा झाल्यास नवल काय? प्रिन्स लवॉफ यांनीं सोशियालिस्ट पक्षाशीं मतभेद होऊन आपल्या जागेचा राजिनामा दिला आहे आणि प्रधानकीचीं वस्त्रें केरेन्स्की सारख्या पुरुषाला घ्यावीं लागलीं आहेत. हे नवे प्रधान खंबीरपणानें वागून बिघडलेली घडी पुनः बसवितील अशीं चिन्हें दिसत आहेत. त्यांनीं हातांत अधिकार येतांच शांतता प्रस्थापित करून राजद्रोही लोकांची धरपकड केली, आणि लष्करांत ज्यांनीं असंतोष माजविला त्यांचाही योग्य समाचार ते घेतील. पण मध्यंतरीं थोडाच वेळ कां होईना पण रशियन सैन्यांत जो असंतोष माजला त्याचा परिणाम युद्धाचे संबंधांत अतिशय हानिकारक झाला आहे. शत्रूनें या संधीचा पूर्ण फायदा घेतला आहे, आणि टर्नोपोलच्या प्रदेशांत रशियन सैन्याची फळी फोडून रशियाला माघार खाण्यास लाविलें आहे. पण हा सध्याचा निराशेचा रंग ही लवकरच पालटेल अशी उमेद आहे.

---

## जर्मनीचे उद्देश व महत्त्वाकांक्षा.

रशियाची अशी शोचनीय स्थिति झालेली पाहून जर्मनीला हर्षवायु होण्याच्या बेतांत आहे— नाहीं, झालाच आहे. युद्धास कंटाळल्यामुळें लवकर तह होऊन शांतता प्रस्थापित व्हावी असें जर्मनींतल्या पुष्कळ लोकांना साहजिकच वाटत आहे. अशा लोकांना गुळचट थापा देऊन त्यांचीं क्षुब्ध मनें शांत करण्याची संधी जर्मन चान्सेलरनें वाया जाऊं दिली नाहीं. आह्मी ही तह

करण्यास उत्सुक आहों, फक्त आमच्या राज्याच्या योग्य सीमांचें रक्षण व्हावें येवढेंच आमचें ह्मणणें आहे आणि त्यासाठींच आमची सारी धडपड आहे असें नवे चान्सेलर सांगत आहेत. पण योग्य मर्यादा हे शब्द इतके लवचीक आहेत कीं त्यांत पोलंड, बेलज्यम, इत्यादि अनेक देशांचा अंतर्भाव सहज होऊं शकतो. जर्मन चान्सेलर साधुत्वाचा आविर्भाव आणून ह्मणत आहेत कीं 'तुह्माला तह पाहिजे ना? आह्मी त्या गोष्टीला तयारच आहों. पण काय करावें? हा दुष्ट मित्रसंघ त्याच्या आड येत आहे. त्याच्या मनांतून जर्मनीचा नायनाट करावयाचा आहे. त्यासाठीं शहाण्या माणसांच्या हातांत सत्ता द्य; त्यांना खर्चण्यासाठीं अब्जावधि मार्कच्या रकमा मंजूर करा; आणि जर्मनीनें प्रारंभापासून आखून ठेविलेल्या धोरणाच्या आड कोणी येऊं नका ह्मणजे शांतता ही तुमच्या हातीं आलीच समजा? या वक्चातुर्यानें जर्मन लोक मोहित होऊन त्यांनीं खर्चाची मंजुरी दिली, लष्करी लोकांना हवे होतें तें मिळालें, आणि नव्या चान्सेलर साहेबांची ही छाप बसली. अमेरिकेची मदत मित्रराष्ट्रांनीं पूर्णत्वानें येऊन पोचण्यास अद्याप थोडा कालावधि लागेल; रशियाची स्थिति वर सांगितल्याप्रमाणें बिघडली आहे; जर्मन केसरची स्वारी पूर्व रणक्षेत्राकडे गेली आहे जर्मन विमानें इंग्लंडच्या उच्च वातावरणांत घिरट्या घालीत आहेत. या वैमानिक हल्लयांचा लवकरच बंदोबस्त होईल असें आश्वासन मि. लाइड जॉर्ज देत आहेत. सबमरीनची जर्मन चळवळ थंड पडत चालली आहे हें ही मि. लॉइड जॉर्ज यांनीं आंकडे देऊन सिद्ध केल्यामुळें इंग्लंडच्या मनाला थोडीशी स्वस्थता आलेली आहे. नवी जहाजें बांधण्याचें काम झपाट्यानें चाललें असून १९१६ सालापेक्षां ६ पटीनें ज्यास्त जहाजें १९१८ सालांमध्यें दिसतील असें सांगून त्यांनीं इंग्रज लोकांच्या मनांतली भीती घालविली आहे. जर्मनींत यंदा धान्याचा दुष्काळ आहे असें एक माहितगार लेखक ह्मणत आहे आणि या भावी उपासमाराची छाया जर्मन चान्सेलराच्या ही भाषणांत बारकाईनें पाहणारास दिसण्यासारखी आहे.

## लढाईच्या बातम्या.

इंग्लंडच्या राजघराण्यानें आपलें हानोअर हें नांव टाकून विंडसर हें नांव धारण केलें आहे.

लढाईला कंटळून तह करण्याची फ्रेंच लोकांची इच्छा असली तर त्यांनीं फ्रान्सच्या नांवाला कलंक लाविला असें मी समजेन असें फ्रेंच प्रधान मॉ० रिबो यांनीं सेनेटच्या सभेंत मोठ्या धिटाईनें सांगितलें.

पूर्व आफ्रिकेंत जर्मन मागें हटत आहेत, व बेलज्यन त्यांचा पाटलाग करीत आहेत असा चमत्कारीक देखावा गेल्या आठवड्यांत पाहण्यास मिळाला.

इंग्लंडच्या औद्योगिक अस्वस्थतेच्या संबंधांत तपास करण्यासाठीं नेमिलेल्या कामिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ह्मटलें आहे कीं, ही अस्वस्थता दूर करण्याचे उपाय ह्मणजे खाद्य पदार्थांचे भाव सरकारनें थोडी बहुत नुकसान पत्करून उतरविणें, अन्नाच्या वाटणीची योग्य व्यवस्था लावणें, मजुरांना राष्ट्रीय कार्यांत नोकरीसारखे न वागवितां बरोबरीचे भागीदार समजणें, पेनशनची व्यवस्था करणाऱ्या कमिटीला अधिक अधिकार देणें, आणि पश्चिमेकडील भागांत शेतावरच्या मजुराचे दर आठवड्याचे २५ शिलिंग करणें हे आहेत.

**तोफेच्या तोंडीं**— नव्या रशियन सरकारचा लढाई संबंधाचा विचार इतका ठाम आहे कीं तोफखान्या कडील कांहीं पथकांतील लोकांमध्यें बेदिली दिसतांच त्यांस त्यांच्याच तोफखान्यांनीं गिंळकृत केलें. सोशालिस्ट पंथांतला हा अतिक्रम होय.

**प्रायोपवेशन**— तीस हजार रोमॅनियन कैद्यांची जर्मनीनें इतकी दशा केली कीं यांनीं एकदम मृत्यूचे दरबार पाहिले.

**अग्निवृष्टी**— मॉंचीक्रेप्राजवळ जर्मनी तोफखान्यानें एवढा भडिमार केला कीं कांहीं वेळ माघार घेतल्याशिवाय गती नव्हती. आणि तसें करण्यांत दोस्तराष्ट्रांच्या ३ तुकड्यांचा तोफखानाही शत्रूच्या हातीं गेला असें कांहीं तारा सांगतात. युद्धामध्यें हार जीत ही क्षणोक्षणीं बदलत असते.

## राजकीय शास्त्रें.

### ( मुंबईच्या सभांचा दृष्टीकोन )

लढाईचा प्रोग्राम ठरवितांना प्रधान जशीं मंडळें आपलें चातूर्य एकत्र करितात तसाच आणिबाणीचा प्रसंग सध्या आमच्या स्वराज्याच्या मोहिमेंत उभा आहे. गेल्या शनवारीं व रविवारीं मुंबईस आमच्या हिंदी राष्ट्रांतील धुरंधर लोकाग्रणी एकत्र जमले आहेत आणि त्यांच्या विचारावर सर्व राष्ट्र आपलें पाऊल पुढें टाकणार आहे. बंगालचे बाबू सुरेंद्रनाथ, मोतीलाल घोष, चौधरी इत्यादि थोर गृहस्थ मुंबईस गेले आहेत. वायव्य प्रांताचे पंडित मदन मोहन, तेज बहादर सुप्रू, मिर्जा सलिमुल बेग, लीडरचे चिंतामणी इत्यादि गृहस्थ आपल्या उदात्त व तेजस्वी विचारांचा विनिमय करण्यासाठीं मुद्दाम हजर आहेत. मद्रासचे सर सुब्रह्मण्यन् आयर आपल्या कांहीं मंडळीसह तेथें जमले आहेत. वऱ्हाडचे राजश्री दादासाहेब खापर्डे, रावसाहेब महाजनी व चिपळूणकर हे याच कार्यानिमित्त तेथें गेले आहेत. ऑल इंडिया कांग्रेसची बैठक परवा शनवारीं असून काल रोजीं स्वराज्य संघाची बैठक होती. प्रस्तुतच्या सरकारी दडपशाहीच्या संकटांना हार न जातां ही राष्ट्रीय मंडळी आपल्या विचारसृष्टींत भावी मार्ग आखून देतील आणि वरील गृहस्थ ह्मणजे राष्ट्राचे विश्रामस्थान असल्यामुळें त्यांच्या ज्या स्वैरकथा मुंबईच्या बैठकींत होतील, तीच हिंदी राष्ट्राची भावी राजकीय शास्त्रें बनणार आहेत आणि ह्मणूनच त्यांच्या अखेरच्या निर्णयाकडे सर्व राष्ट्राचे डोळे लागले आहेत.

## भारत सेना.

आलिशान सर बेंजामिन राबर्टसन मध्यप्रांत व वऱ्हाडमध्यें भारतसेना उभारीत आहेत. कायदेकौंसिलच्या सिंहासनावरून त्यांनीं मोठ्या कळकळीनें सर्व प्रजाजनांस आव्हान केलेलें आहे. ब्रिटिश राज्याच्या शांततेचा मोबदला ह्मणून या वेळीं एकदिलानें सेनेंत शिरा असे ते उपदेश करितात आणि त्यांची ती वाणी लोकांस ईर्षा व वीरश्री आणीत आहे. आजपर्यंतचे प्रयत्न नीटसे सफळ झाले नाहींत. कां कीं लोकांच्या आकांक्षाप्रमाणें सरकारी अभिवचनें मिळालीं नाहींत. सर बेंजामिन म्हणतात कीं राजसेवा करा आणि मग त्या आकांक्षा आपोआपच पूर्ण होतील. जेथें साहस नाहीं तेथें कांहींच फळही नाहीं. साहसाअंतींच परमेश्वर प्रसन्न होत असतो. लढाई निमित्त लोकांनीं जवळ जवळ १॥। कोटी युद्धकर्ज दिलें ही गोष्ट अत्यंत प्रशंसनीय होय. पण यापुढें पैशापेक्षां शारीरिक सेवा पाहिजे आणि हीच मागणी सर बेंजामिन लोकांपाशीं करीत आहेत.

## अनौचित्य.

सेवाधर्म परम गहन आहे, आणि त्याची जाणीव ज्यास नसते ते लोक कधीं कधीं त्यांच्या वर्तनासंबंधानें भलताच दोष दाखवितात. तसाच प्रकार टिळकजयंतीच्या दिवशीं अकोले येथील जाहीर सभेंत घडला. वंदेमातरमचें राष्ट्रीयगीत चालू असतांना सरकारी रिपोर्टवाले अधिकारी इतर सभाजनां बरोबर उभे राहिले नहींत ह्मणून पुष्कळ लोकांस ती गोष्ट आवडली नाहीं आणि 'शिष्टाचार' या त्रोटक लेखाखालीं आह्मी लोकांच्या या भावनेचा निर्देश केला होता. नोकरीच्या पेशाला ही भावनादृष्टी चालत नाहीं आणि प्रस्तुतच्या क्रांतीच्या काळीं मनोवेगानें ही सरकारी मंडळी उभी राहिली असती तरी टिळकजयंतीच्या दिवशीं त्यांच्या उत्थापनाचा गैर अर्थ होण्याचा संभव होता. जोंपर्यंत मनुष्य चाकरीच्या मागें आहे आणि चाकरी त्याच्या मागें धाव घेत नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थानच्या वातावरणांत मनाला तें उच्च स्वातंत्र्य असणें शक्य नाहीं. सारांश असा कीं जो शिष्टाचाराचा भंग ह्मणून आह्मांस कळला तो तसा कांहीं ह्मणतां येत नाहीं आणि ह्मणूनच आह्माला आमच्यांतलि या नेटिव्ह रिपोर्टर अधिकाऱ्यां संबंधानें काढलेला कडक उद्गार अनुचित वाटतो.

## कालाचा सद्व्यय.

"आकोला रेल्वे युनीअन क्लब" च्या २०।२५ सभासदांनीं आपल्या रेल्वेच्या चक्राकार कामाला विनोद, करमणूक व उत्साह यांनीं नवेपणा आणण्यासाठीं "मत्स्यगंधा" खेळ बसविला आणि तीन महिन्याच्या परिश्रमानंतर तो खेळ गेल्या ९ तारखेला त्यांनीं येथील रंगभूमीवर करून दाखविला. हा खेळ फार चांगला झाला ह्मणून तो पुनः क्लबवाले मंडळी करणार आहेत. त्यांनीं आपल्या पहिल्या खेळाच्या उत्पन्नांतून १०० रुपये वॉर फंडाला दिले हें त्यांचें राष्ट्रीय सौजन्य स्तुत्य होय. "चंद्रगुप्त" हा खेळ आतां या क्लबांत नव्यानें बसविण्यांत येणार आहे. या सर्व कामामध्यें रा. रा. दिगंबर लक्ष्मण काळवीट असिस्टंट स्टेशन मास्तर व माधव नारायण पागे गुड्स् क्लार्क या दोघांनीं मोठा पुढाकार घेतला आणि चांगलें यश संपादलें हें त्यांच्या क्लबाला भूषणास्पद होय.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— एकंदर पर्जन्य १२ इंचावर झाला. सध्या खुली हवा पाहिजे आहे आणि तसा उघाडीचा रंग ही दिसत आहे. आर्द्रा नक्षत्रा नंतरचे कापसाचे पेरे चांगलेसे साधले नाहींत ह्मणून हाकाटी ऐकूं येते. क्वचित् क्वचित् प्लेग व सर्वत्र किरकोळ दुखणीं यांनीं डोकें वर केलें आहे.

**उच्छाद**—गेल्या शुक्रवारीं सायंकाळीं एक गोरी पलटण स्पेशल गाडीनें गेली. त्यांतील कांहीं दुष्ट सोल्जरांनीं गाडी चालू असतांना आजू बाजूच्या लोकांवर दगड मारल्याच्या गोष्टी आह्मी ऐकतों. त्यांतला प्रसाद आमच्या एका कंपॉझिटरला व एका महाराच्या मुलाला एवढा मिळाला कीं त्या मुलाच्या पायाची नळी फुटली आहे. ही गोष्ट डापकीच्या पुलाजवळ घडली. असाच प्रकार इतर ही घडल्याचे ऐकतों. तेव्हां आमचे जिल्ह्याचे अधिकारी या बाबतींत कांहीं विशेष चौकशी करून लष्करी अधिकाऱ्याकडे योग्य दाद मागण्यांत येईल.

**पतपेढ्यांचें स्वराज्य**— मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतांतील पतपेढ्यांच्या यशाचें सर्व श्रेय राजश्री क्रॉस्थवेट यांचेकडे आहे. गेल्या आदित्यवार सोमवारच्या जबलपूर येथील सभेंत पतपेढ्यांचीं कार्यें सर्व अष्टाधिकारासह लोकांच्या हातीं देण्यांत आलीं आहेत; किंबहुना स्वराज्याची मागणी कबूल करून या बाजूनें लोकांच्या इच्छा पुरविण्याचा हा पहिला श्रीकारच होय. सहकारी पतपेढ्यांचे एक गव्हरनर व त्याच्या हाताखालीं एक कौंसिल देण्यांत आलें आहे. असे हे पहिले गव्हर्नर ह्मणजे देशसेवेला अर्पण करून घेणारे ना. रा. ब. नारायण कृष्ण केळकर बालाघाट हे होत. या नव्या स्थानीं आह्मी त्यांचें अभिनंदन करितों आणि त्यांच्या हातून हा स्वराज्याचा सहयोग चांगल्या ऊर्जित दशेला येवो असें इच्छितों.

## पत्रव्यवहार

### वऱ्हाड प्रांतांतील वैद्यांस जाहीर विनंती.

पुणें येथें भरलेल्या निखिल भारतवर्षीय आठवे वैद्य संमेलनांत जे ठराव पास झाले त्यांत प्रांतानिहाय वैद्य मंडळें स्थापन करण्यांत यावींत असा नववा ठराव झाला असून वऱ्हाड मध्यप्रांताचे अशा तऱ्हेचें वैद्य मंडल स्थापन करण्यासाठीं चिटणीस ह्मणून काम करण्याची मजला संमेलनाची आज्ञा झाली आहे. हे वऱ्हाड मध्यप्रांतीय वैद्य मंडळ स्थापन करण्यासाठीं वऱ्हाड प्रांतांतील वैद्याची जाहीर सभा शके १८३९ च्या श्रीकृष्ण जयंतीच्या दिवशीं ह्मणजे गुरुवार तारीख ९ माहे आगष्ट सन १९१७ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां आकोला येथें श्रीकृष्ण चिकित्सालयांत भरविण्याचे ठरविलें आहे तरी सदर्हू प्रसंगीं सर्व वैद्यांनीं अगत्य येण्याचें करावें अशी विनंती आहे. कांहीं कार्यामुळें ज्यास येण्याची सवड नसेल त्यांनीं खालील गोष्टी विषयीं मत कळवावें.

(१) अध्यक्षांची निवडः—वऱ्हाड मध्य प्रांतीय वैद्य मंडळाचे अध्यक्षस्थानीं लोकप्रिय डॉ. नरहर शिवराम उर्फ बाबासाहेब परांजपे यवतमाळकर यांचें नांव सुचविण्यांत आले आहे.

(२) उपाध्यक्षांची निवडः—उपाध्यक्षाचे जागेकरितां वऱ्हाड प्रांतांतील ५ वैद्यांची नांवें सुचविलें.

(३) चिटणीसाची निवडः—चिटणीसाचे जागे करितां ४ वैद्यांचीं नांवें सुचविलें.

(४) वर्गणी व सभासदः—जे एक रुपया वार्षिक वर्गणी देतील त्यांस वऱ्हाड मध्य प्रांतीय वैद्य मंडळाचे सभासद करावे असें सुचविण्यांत आलें आहे तरी सभासद होण्याची इच्छा प्रदर्शित करणें.

वरील सर्व गोष्टींचा विचार करून वऱ्हाड मध्यप्रांतांतील सर्व वैद्यांनीं आपलें मत सभेच्या दिवशीं तरी कळेल अशा रीतीनें पाठवावें व आपलें नांव व पत्ता (पूर्ण) कळवावा. अथवा आपण स्वतः हजर रहावें अशी विनंती आहे.

आकोला (वऱ्हाड) } आपला
ता. २९-७-१७ } हरिशास्त्री पराडकर वैद्य
चिटणीस वऱ्हाड मध्य-
प्रांतीय वैद्यमंडळ

---

## नोटीस.

वि. सीनीयर सबजज साहेब आकोला
कि. मु. नं १३ सन १९१७
अर्जदार

जीवणी जवजे जयनारायण मारवाडी ब्राह्मण रा. सांगवीबाजार ता. आकोला

सर्व लोकांस जाहीर करण्यात येते कीं मयत जयनारायण रामकुवार हा सन १९१४ चे सप्टेंबर महिन्यांत मुकाम सांगवी येथें मयत झाला आहे. त्याचा वारस या नात्यांनीं मयताची बायको जीवणी इनें वारसाचे सर्टिफीकीट मिळण्याकरितां आमचे कोर्टांत ता. ९-६-१७ रोजीं अर्ज दिला आहे. त्याची चौकशीची ता० ४-८-१७ इसवी ची नेमली आहे. तरी या विरुद्ध कोणाची कांहीं तक्रार असेल त्यांनीं हजर राहावे ता० २३-७-१७ इ

सही
N. G. Subhedar
Senior Sub Judge
Akola

N. N. 332

---

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विक त बडतोब दूर होतात किं रु. १॥८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला में. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय
## कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-मोड, गुलाबाचींफुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें सार्या व बाळ्यांचीं वगैरे स जातीचा माल-तसेंच चांदीच्या मासोळ्या चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्या माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सो न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर व्हाईट निवण्याची भीति बाळगण्या चें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

---

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमर्शियल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि. मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशीयन कमर्शियल अशूअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग.
फोर्ट, मुंबई.

नो. नं. ८

---

मराठी भाषेंत अशा प्रकारचें हें
पहिलेंच अपूर्व साहस !

वा. वर्गणी १२ आणे व्ही.पी. नें १४ आ.

# पूर्णानंद

स्वस्त आणि उपयुक्त सचित्र
मासिक पुस्तक.

अत्यंत अल्प किंमतीत इतकें उपयुक्त, इतकें मनोरंजक, इतकें चित्रपूर्ण मासिक आजपर्यंत कोणीही दिलेलें नाहीं. नमुन्याचा अंक २ आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

पत्ताः—पूर्णानंद-कार्यालय,
बेळगांव.

नो. नं. २९९

---

## रोल्डगोल्ड सोन्याचे
### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. ४, ३–४; गोट जोडी २–२॥; पाटल्या जडी २–२॥; वज्रटीका ३–४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४–५. शिंप्याचें मोतीं व्हान मोठें वाटेल तसें. साखळी २–३–४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २–२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता– मगनलाल के आणि कंपनी
गिरगांव- मुंबई

नो० नं० ९

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्मासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह. जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व अडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितीहि घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु० १६१ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्राची लाळा, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका वटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० बे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० दर्पे, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

नो. नं. २२२ Akola. [हजार हजारांचा कवन दिला. तो आमचे । [illegible]